सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ३१ जुलै २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २६२ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



**सोलापूर – भवानी पेठ** – राठी सिमेंट, **नई जींदगी** – एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** – वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** – हारूण स्टील, **होटगी रोड** – एम.आर.सेल्स, **शेळगी** – शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** – बेसकर ॲण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** – श्री.गणेश स्टील, **सांगोला** – महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** – तांबोळी स्टील ॲण्ड हार्डवेअर, **पिंपळनेर** – डिमांड ट्रेडर्स, **नातेपुते** – पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** – दुर्गा स्टील, **मांडवे** – बालाजी ट्रेडर्स, **टेंभुर्णी** – श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** – भराडीया स्टील, **करमाळा** – शिवम स्टील, **अक्कलकोट** – माशाळे स्टील, **मोहोळ** – तलफदार स्टील, **कुरूल रोड** – श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** – चकेश्वरा स्टील, **वैराग** – गांधी एजन्सी, **दहिटने** – एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **जेऊर** – तांबोळी सिमेंट ॲण्ड मार्बल, **मरवडे** – सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** – शिवाई ट्रेडर्स, **करकंब** – लक्ष्मी स्टील, **मंगळवेढा** – महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** – सिध्दनाथ ट्रेडर्स, **वेळापूर** – रॉयल बिल्डींग सोल्युशन, **टाकळी** – गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** – श्री.केदारेश्वर हार्डवेअर ॲण्ड सिमेंट, **मुळेगाव** – आदित्य ट्रेडर्स, **महुद** – शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** – लक्की ट्रेडर्स, **साळमुख** – त्रिमूर्ति स्टील, **माळशिरस** – अभिनंदन टाईल्स्, **मैंदर्गी** – खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** – पूजा स्टील, **श्रीपुर** – शक्ती स्टील अँड किसान मॉल, **भोसे (क)** – पटेल स्टील, **कुरुल** – जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** – ओम ट्रेडर्स, **तडवळ** – स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** – लक्ष्मी टाईल्स, **नरखेड** – राहुल एंटरप्रायझेस, **जवळा**– आंद्रेश्वर स्टील सेंटर, **तांदुळवाडी**– साईराज ट्रेडींग कंपनी, **कोंडी**– तिरूपती बिल्डींग मटेरियल्स, **बाळे**– वर्धान ट्रेडर्स.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

## विचारपुष्प



जसा गंगेचा प्रचंड प्रवाह पंचानन श्री शंकरांनी आपल्या प्रचंड जटांमध्ये धारण करून तिला पृथ्वीवर भगीरथा पाठोपाठ प्रवाहित केले, तसेच हिंदुत्वाच्या गंगेला विश्वात प्रवाहित करण्यासाठी हा हिंदू समाज समरसता, संपन्नता, सन्नधता, शिक्षा व संस्कार या पंच गुणांनी युक्त व्हावयास पाहिजे.

- **सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## युद्ध थांबवण्यात ट्रम्प यांची भूमिका नाही

**नवी दिल्ली :** पाकिस्तानविरुद्ध भारताने सुरू केलेले 'ऑपरेशन सिंदूर' थांबवण्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची कोणतीही भूमिका नव्हती, याचा पुनरुच्चार 'ऑपरेशन सिंदूर'वर राज्यसभेत सुरू असलेल्या चर्चेत सहभागी होताना जयशंकर परराष्ट्र व्यवहारमंत्री जयशंकर यांनी राज्यसभेत केला.

# वाटाघाटींपूर्वीच ट्रम्प उलटले



### १ ऑगस्टपासून अतिरिक्त दंडासह २५ टक्के शुल्काची घोषणा

◆ **वॉशिंग्टन, ३० जुलै**

भारत आमचा मित्र देश आहे आणि दोन्ही देशांसाठी फायदेशीर असणारा व्यापारी करार लवकरच होणार असल्याचा दावा करणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प उलटले असून, त्यांनी बुधवारी भारतावर एकतर्फी २५ टक्के शुल्क लादण्याची घोषणा केली. १ ऑगस्टपासून भारतावर अतिरिक्त दंडासह व्यापारी शुल्क लावणार असल्याचे ट्रम्प यांनी त्यांच्या समाज माध्यमावरील पोस्टमध्ये नमूद केले.

व्यापार करारासंदर्भात भारताच्या वाटाघाटी सुरू असून, २५ ऑगस्टला अमेरिकेचे शिष्टमंडळ भारतात येणार आहे. तत्पूर्वी, ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के व्यापार शुल्कासह अतिरिक्त दंड आकारण्याची घोषणा केली. त्यांनी समाज माध्यमावर म्हटले की, रशियाकडून तेल आणि संरक्षण सामग्री खरेदी करणे आणि भारताच्या त्रासदायक व्यापारी अटी अमेरिकेच्या धोरणाशी सुसंगत नाही.

**रशियासोबत व्यापार वाढविणे चिंताजनक**

भारत रशियाकडून सातत्याने लष्करी उपकरणे खरेदी करीत आहे, जे योग्य नाही. रशियाने युक्रेनवर हल्ला करणे थांबवावे अशी प्रत्येकाची इच्छा आहे. परंतु, भारत रशियासोबतचा व्यापार सतत वाढवून त्यांना अप्रत्यक्षपणे मदत करीत आहे. सर्व बाबींचा विचार करून अमेरिकेने भारतावर शुल्क लादण्याचा निर्णय घेतला आहे.

**निर्णय मागे घेतील : खंडेलवाल**

भाजपा खासदार प्रवीण खंडेलवाल म्हणाले, भारत सरकार यावर निश्चितच निर्णायक पावले उचलणार आहे. केंद्र सरकार अमेरिकेच्या प्रशासनाशी चर्चा करणार आहे आणि त्यानंतर ट्रम्प निर्णय मागे घेतील याची पूर्ण शाश्वती आहे. ◀(वृत्तसंस्था)

### देशहितासाठी आवश्यक ती पावले उचलणार

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी भारतीय वस्तूंवर २५ टक्के शुल्काची घोषणा केल्याच्या काही तासांतच भारत सरकारच्या वतीने प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. वॉशिंग्टन डीसी सोबत वाणिज्यविषयक चर्चा सुरू राहणार असून, शेतकरी, उद्योजक आणि लघू-सूक्ष्म व मध्यम उद्योगांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी भारत सरकार कठोर निर्णय घेईल, असे भारताच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. सरकारसाठी आपले शेतकरी आणि लहान उद्योजक यांचे हित हिच भारत सरकारची प्राथमिकता असल्याचे सांगण्यात आले. इंग्लंडसोबत भारताने केलेल्या आर्थिक आणि व्यापार कराराचा दाखला देऊन राष्ट्रीय हितांच्या रक्षणाची भूमिका स्पष्ट केली आहे. ■

# निसार उपग्रह अंतराळात झेपावला

## इस्रो-नासाचा संयुक्त उपक्रम

### नैसर्गिक आपत्तीची आधीच माहिती मिळणार

◆ **श्रीहरीकोटा, ३० जुलै**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात् इस्रो आणि अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने बुधवारी जीएसएलव्ही-एफ १६ रॉकेटद्वारे बुधवारी सायंकाळी ५.४० वाजता आंध्रप्रदेशच्या श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून २,३९३ किलो वजनाचा निसार अर्थात् 'नॅशनल एरोनॉटिक्स ॲण्ड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन' उपग्रह अवकाशात यशस्वी प्रक्षेपित करण्यात आला. या उपग्रहामुळे भूकंप-त्सुनामीपूर्वी माहिती मिळणार आहे आणि पृथ्वीवरील विविध नैसर्गिक बदलांचे निरीक्षण शक्य होईल.

हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन, शेतीसाठी संशोधन आणि समुद्रकिनाऱ्यांवरील बदल यांचा अभ्यास या उपग्रहामुळे अधिक अचूकपणे करता येणार आहे. यशस्वी प्रक्षेपणानंतर इस्रोने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, निसार उपग्रह पृथ्वीवरील नैसर्गिक बदल, भूकंप, जमिनीवरील हालचाली यांच्यावर लक्ष ठेवेल आणि यातून मिळणाऱ्या डेटाचा वापर हवामान बदलाच्या प्रभावांचा अभ्यास करण्यासाठी तसेच आपत्ती व्यवस्थापनात वेगवान निर्णय घेण्यासाठी होणार आहे. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातच नव्हे, तर जागतिक हवामान निरीक्षण, पर्यावरण संवर्धन आणि मानवी जीवनाच्या सुरक्षेसाठीही नव्या शक्यता निर्माण होणार आहेत. पृथ्वीचे उच्चस्तरीय अद्यावर नकाशे घेणारा हा जगातील पहिलाच उपग्रह आहे. प्रक्षेपणानंतर सुमारे १९ मिनिटांनी जीएसएलव्ही-एफ १६ रॉकेटने उपग्रहाला एका विशेष कक्षेत यशस्वीरीत्या स्थिर केले.

**१२,५०० कोटींचा खर्च**

निसार उपग्रहासाठी १२,५०० कोटींचा खर्च आला असून, यात इस्रोचे योगदान ७८८ कोटी रुपये आहे. या उपग्रहाद्वारे मिळणारा डेटा जगभरातील शास्त्रज्ञ, सरकार आणि सामान्य लोकांना मोफत उपलब्ध असेल. आजपासून बारा दिवसांनी तो प्रत्यक्षात काम करणे सुरू करेल. ◀(वृत्तसंस्था)

## आकाशातील अंतराळ स्थानाचे दर्शन

**अकोला :** आकाशात ढगांची गर्दी काहीशी कमी झाल्याने ग्रहताऱ्यांसोबतच मानव निर्मित आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधन केंद्र ३१ जुलै, १ व ३ ऑगस्ट रोजी नुसत्या डोळ्यांनी दर्शन घेता येणार आहे. या आगळ्यावेगळ्या घटनेचा आनंद सामान्यजनांनी घ्यावा, असे आवाहन येथील खगोल अभ्यासक प्रभाकर दौड यांनी केले. अवकाशात महाकाय आकाराचे, ४३० टन एवढ्या वजनाचे, अंतराळस्थानक पृथ्वीपासून सुमारे चारशे कि.मी अंतरावरून ताशी २८,००० कि.मी. एवढ्या प्रचंड वेगाने फिरत आहे. ■







MAHARASHTRA: Solapur: Rajyog Toyota, Ph: 0217-2626262, 9607944404; Ahmednagar: Wasan Toyota (Nagar-Pune Road, Kedgaon) Ph: 9604038234; Akola: Murli Toyota, Ph: 9028029881; Amravati: Murli Toyota, Ph: 9028029880; Aurangabad: Sharayu Toyota, Ph: 0240-6640888, 8888893524; Baramati: Sharayu Toyota, Ph: 02112-239827, 8380037071; Barshi: Rajyog Toyota, Ph: 8956161078, 9607944409; Beed: Brijyog Toyota (Jalna Road) Ph: 7030023023, 7391095300, 7391095301, Bhandara: Sequel Toyota, Ph: 8956880548; Chandrapur: JSM Toyota, Ph: 7770017043, 7770017040; Chiplun: Sonak Toyota, Ph: 9607963069; Dhule: Chaudhari Toyota, Ph: 0257-2229993; 7798882028; 8552000111; Gondia: Sequel Toyota, Ph: 9172333905; Jalgaon: Chaudhari Toyota, Ph: 0257-2229993; 7798882028; 8855961005; Jalna: Sharayu Toyota, Ph: 8888893524; Kolhapur: Sonak Toyota, Ph: 7030248181; Latur: Rajyog Toyota, Ph: 7507994994; Manchar: Sharayu Toyota, Ph: 9130009996; Nagpur: Patni Toyota (MIDC Hingna) Ph: 7796699166; Patni Toyota (Great Nag Road) Ph: 7796614802; Sequel Toyota (Kamptee Road), Ph: 7230018818, 9850395105; Nanded: Rajyog Toyota, Ph: 7757030989; Nandurbar: Chaudhari Toyota, Ph: 0257-2229993; 7798882028; 8855961005; Nashik: Wasan Toyota, Ph: 0235-6649999, 8888847191; Pune: Rajyog Toyota, Ph: 8669503333, 8956175300, 020 69503333; Sharayu Toyota (PCMC) Ph: 020-40764046, 7888012701, 9766275703, 8888826487, 8956762870; Shaw Toyota (SB Road/Wagholi/Shirur) Ph: 020-67499555, 8669958955, 9226046457, 9370904545; Sonak Toyota (Bavdhan) Ph: 7030969696, 9607969460/464; Ratnagiri: Sonak Toyota, Ph: 7030249292; Sangli: Sonak Toyota, Ph: 7030258181; Satara: Digvijay Toyota (NH4 Wadhe), Ph: 8799926161; Sindhudurg: Sonak Toyota, Ph: 7030239292; Wardha: Patni Toyota, Ph: 7796614831; Yavatmal: Patni Toyota, Ph: 7767002261.
HAKUHODO.LYNC/07/25

# उद्योगांच्या सर्व परवानग्या मैत्री पोर्टलवर मिळणार

**मुंबई, दि. ३० जुलै :**

महाराष्ट्र हे उद्योग क्षेत्रांमुळे १ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे यशस्वीपणे वाटचाल करत आहे. त्यामुळे उद्योगांना पाणीपुरवठा, वीज, रस्ते व कनेक्टिव्हिटी, पर्यावरण मंजुरी, वन परवानग्या, मजूर कायदे, जमीनचे वाटप या सर्व सोयी सुविधा तात्काळ उपलब्ध करून दिल्या पाहिजे. उद्योगधंद्यांना सर्व परवानग्या ऑनलाईन मिळाल्या पाहिजे, यासाठी मैत्री पोर्टल एकिकृत करून त्यावरच सर्व परवानग्या द्याव्यात. त्याचबरोबर, उद्योजकांना शासकीय विभागांसदर्भात काही अडचणी असतील, तर त्यासंदर्भात निनावी तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या विविध विषयांशी संबंधित मुद्यांवर बैठक झाली. या बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेशकुमार, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, उद्योग विभागाचे सचिव डॉ.पी.अन्बळगन, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंग कुशवाह आदी उपस्थित होते.


# नियमबाह्य गर्भपात केल्याप्रकरणी आशा वर्करवर कठोर कारवाई होणार

## आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे स्पष्टीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

सोलापूर महापालिकेतील प्रसूतीगृहाकडील रुग्ण खाजगी नर्सिंग होम कडे पाठविल्या प्रकरणी चौकशी अंती दोषी आढळणाऱ्या संबंधित आशा वर्करवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान, याप्रकरणात नियमबाह्य गर्भपात केल्याची प्राथमिक माहितीही प्राप्त झाली असल्याचे स्पष्टीकरण महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहे.

याप्रकरणी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अधिक माहिती दिली. ते पुढे म्हणाले, गेल्या दोन दिवसांपूर्वी सोलापूर शहरात दोन नर्सिंग होम मध्ये असा प्रकार घडल्याचे माहिती मिळाली. यासाठी व्हाट्सअप ग्रुप बनविला आहे. त्यानुसार रुग्ण त्यांच्यामार्फत रेफरल केले जात. कट प्रॅक्टिस केली जाते. त्यासाठी पैसे देण्याची बाबही निदर्शनास आली आहे. महापालिका आरोग्य विभागाकडून संबंधित नर्सिंग होमची तपासणी करण्यात आली. यामध्ये काही आशा वर्कर्सना काही रक्कम ट्रान्सफर केल्याचेही दिसत आहे. या संदर्भात महापालिका आरोग्य विभागाच्या मार्फत प्राथमिक अहवाल तयार करण्यात येत आहे.



दरम्यान, या प्रकरणात गर्भपात (अबॉर्शन) संदर्भात माहिती पुढे आले आहे. नियमानुसार २४ आठवड्यानंतर गर्भपात करता येत नाही. तरीसुद्धा अशाप्रकारे गर्भपात केल्याची प्राथमिक माहिती प्राप्त झाली आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.याप्रकरणी प्राथमिक अहवाल तीन दिवसात प्राप्त होणार आहे. पुराव्याच्या आधारावर संबंधित आशा वर्करवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे. तसेच संबंधित प्रसूतीगृहातील नर्सवर कारवाई होईल. नॅशनल मेडिकल कौन्सिलच्या नियमानुसार अनइथिकल प्रॅक्टिसच्या संदर्भात कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. त्याचबरोबर कायदेशीर सल्ला घेऊन फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले. भविष्यात असे प्रकार होणार नाहीत यासंदर्भात आवश्यक ती दक्षता घेण्यात येणार असल्याचेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.



# एसव्हीसीएस प्रशालेत नागपंचमी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

एस.व्ही. सी. एस. प्रशाला एमआयडीसी येथे नागपंचमीचा सण विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते वारुळास दूध अर्पण करून पूजा करण्यात आली. याप्रसंगी उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोषकुमार तारके यांची उपस्थिती होती.

वारुळाचे पूजन झाल्यानंतर प्रशालेतील विद्यार्थिनींनी मंगळागौरी गीतावर पारंपारिक नृत्य सादर केले विद्यार्थिनींना नागपंचमी सणाचा मनसोक्त आनंद घेता यावा यासाठी प्रशालेच्या क्रीडांगणात झोका बांधण्यात आला होता. मुलींनी झोक्यावर बसून झोका खेळण्याचा आनंद घेतला. लहान व मोठ्या गटात मेहंदी स्पर्धा घेण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील महिला शिक्षिकेनी विशेष परिश्रम घेतले. अनिता बंडगर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

# बेशुध्द झालेल्या महिलेचा मृत्यू

**सोलापूर :** झोपेत बेशुध्द झालेल्या महिलेचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. ही घटना कुमठा नाका परिसरातील स्वागत नगरात मंगळवारी रात्री ७.५० वाजता घडली. विलास गायकवाड (वय ५१) असे महिलेचे नाव आहे. मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास यातील सुमन या घरात झोपी गेल्या होत्या. दिवसभ्र झोपलेल्या सुमन या उठल्या नसल्याने त्यांना नातेवाईकांनी उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या उठत नसल्याने तसेच प्रतिसाद देत नसल्याने पुतण्या सुहास सावंत याने रात्री ७.५० च्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वी त्या मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

# ७० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम

**मुंबई, दि. ३० जुलै-**

केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या प्रशिक्षण महासंचालक यांनी राज्यातील ७० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिक), व ईव्ही मेकॅनिक (इलेक्ट्रिक व्हेईकल) हे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. तसेच चेंबूर येथे शासकीय उच्चस्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापनेसाठी मान्यता देण्यात आली आहे. काळानुरूप बदलत्या अभ्यासक्रमामुळे रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होईल, असा दावा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी बुधवारी केला.



पर्यावरण संवर्धनावर आधारित योजना राबविण्यार राज्य शासनाचा भर असून राज्यात सौर ऊर्जाशी निगडीत तंत्रज्ञानांची व सोलर टेक्निशियन तसेच मेकॅनिक इलेक्ट्रिक व्हेईकलची गरज लक्षात घेवून या क्षेत्रातील टेक्निशियन मागणी वाढणार आहे. त्यानुषंगाने दोन नवीन अभ्यासक्रमाची मागणी व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाने केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या प्रशिक्षण महासंचालक यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास विभाग नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.रघुनाथ माशेलकर आणि मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या सूचना व सल्ल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये काळानुरूप अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. सध्या राज्यातील ७० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये हा अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहे. ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रमांची मागणी करतील त्यांना मंजूरी देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असेही मंत्री लोढा यांनी सांगितले. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या प्रशिक्षण महासंचालक यांनी अनसूचित जातीतील व नवबौध्द घटकातील प्रशिक्षणार्थ्यींचे सामाजिक सक्षमीकरण व उन्नतीसाठी चेंबूर येथे शासकीय उच्चस्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापनेसाठी मान्यता देण्यात दिली आहे. या संस्थेत सन २०२५-२६ साठी रेफ्रिजरेशन ॲण्ड एअर कंडिशनिंग टेक्निशीयन, इलेक्ट्रिशियन, वायरमन, आय. ओ. टी. टेक्निशियन, इलेक्ट्रीक मेकॅनिक हे अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत.

# सिंचन प्रकल्प पूर्ण करून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक भरभराट आणा : मुख्यमंत्री

## जलसंपदा प्रकल्पांच्या भूसंपादनाचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० जुलै**

शेतीला सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सिंचन प्रकल्पांची कामे सुरू आहेत.काही प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी १८ वर्षानंतर निविदा प्रक्रिया जारी करण्यात आली आहे. जलसंपदा विभागाने रखडलेले प्रकल्प पूर्ण करीत शेतीला कायमस्वरूपी सिंचन उपलब्ध करून देत शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक भरभराट आणावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी देत पुनर्वसित गावठाणांमध्ये सर्व नागरी सुविधांची कामे दर्जेदार करून तेथील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी नवीन कार्यप्रणाली तयार करावी, अशा सूचनाही दिल्या.



राज्यातील जलसंपदा विभागांतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित बैठकीत घेतला. यावेळी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा (विदर्भ, कोकण व तापी खोरे विकास महामंडळ) मंत्री गिरिश महाजन, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ठाणे जिल्ह्यातील काळू नदी प्रकल्प हा महानगरांच्या पाणीपुरवठा योजनांसाठी महत्त्वाचा प्रकल्प आहे. या प्रकल्पाचे काम गतीने पूर्ण करावे. प्रकल्प पूर्ण झाल्यास महानगरांसाठी शाश्वत पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पामध्ये जाणाऱ्या वनांसाठी पर्यायी जमिनींचे प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी सादर करावे. झाडांच्या नुकसानीचा सर्वे करून त्याबदल्यात संबंधित जिल्ह्यात वनीकरण करावे.

पुनर्वसन गावांमध्ये अंतर्गत रस्त्यांची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी गावांमधील अंतर्गत रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे करण्यात यावे. सांडपाणी वाहून नेण्यासाठी बंद नाल्या असाव्यात. पुनर्वसित गावामध्ये भविष्यात पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही, अशाप्रकारे पाण्याचा उद्भव शोधून योजना पूर्णत्वास न्यावी, असेही निर्देश फडणवीस यांनी दिले.



# पाच शाळेमध्ये सर्प पोस्टर प्रदर्शन व माहिती सत्र

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

वाईल्डलाईफ कॉंझर्वेशन असोसिएशन तर्फे नागपंचमी सणाचे औचित्य साधून सोलापुरातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये पर्यावरण जनजागृतीसाठी सर्प पोस्टर प्रदर्शन व माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

बाळे येथील आदी जांबमुनी मराठी शाळा, भवानी पेठेतील एसव्हिसीएस हायस्कुल, सिद्धेश्वर प्रशाला, एसव्हिसीएस प्रशाला बोरामणी, विवेकानंद पब्लिक स्कूल गुळवंची या प्रशालेत नागपंचमी सणानिमित्त सर्प जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आला. यामध्ये प्रोजेक्टर वर पीपीटी द्वारे सोलापुरात आढळणाऱ्या विविध सापांची सचित्र माहिती देण्यात आली. या शाळेतील विद्यार्थ्यांनी पॉडकास्ट या एका आगळावेगळा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची समाधानपूर्वक उत्तरे देण्यात आली. या कार्यक्रमासाठी संगीता सारडा, मुख्याध्यापिका आयेशा इनामदार इतर शिक्षक वर्ग व कर्मचारी उपस्थित होते. या सर्प प्रदर्शनाची माहिती देताना संस्थेचे मार्गदर्शक शिवानंद हिरेमठ , अध्यक्ष अजित चौहान, सुरेश क्षीरसागर, संतोष धाकपाडे यांनी सोलापूर जिल्ह्यात आढळणाऱ्या बिनविषारी, निमविषारी तर प्रमुख पाच विषारी साप सापांची ओळख व माहिती याबद्दल मार्गदर्शन केले.

तसेच यावेळी सापांबद्दल असलेल्या गैरसमजुती, अंधश्रद्धा याबद्दल माहिती देऊन सर्पदंश झाल्यास कोणतेही तंत्रमंत्र, झाडपाला, साधू मांत्रिक यांच्या आहारी न जाता उपचारासाठी तात्काळ सरकारी रुग्णालयात भरती होण्याचे आवाहन करण्यात आले.

शेवटी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विद्यार्थ्यांनी सापांबद्दल कुतूहलापोटी विचारलेल्या शंका-कुशंका व प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. सर्व शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमास भरभरून प्रतिसाद दिला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सदस्य प्रविण गावडे, लखन भोगे, दिपाली भोगे यांनी परिश्रम घेतले.

# निवडणूक आयोगाकविरुद्ध उच्च न्यायालयात जाणार

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची पत्रकार परिषदेत माहिती

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० जुलै**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०20 साली सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदार संघात आदर्श आचार संहितेचे उल्लंघन केले पण त्याविरोधात केलेल्या तक्रारीवर कारवाई करण्यास राज्य निवडणूक आयोगाने टाळाटाळ केली आहे. आचारसंहितेचा भंग केल्याचे आयोगाने मान्य करत केवळ रेल्वे प्रशासनाला समज दिली पण मोदींवर कारवाई केलेली नाही. याप्रकरणी उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी बुधवारी सांगितले.



> **प्रदेश कॉंग्रेसची कार्यकारिणी जाहीर..**
> प्रदेश कॉंग्रेसच्या कार्यकारिणीत ३३ टक्के ज्येष्ठ व अनुभवी नेते आहेत तर ६६ टक्के नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आलेली आहे. ४१ टक्के ओबीसी, १९ टक्के एससी एसटी तर ३३ महिलांना संधी देण्यात आली आहे. कार्यकारिणीत भौगोलिक व सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे, असे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.
>
> **खा. प्रणिती शिंदे सैनिकांचा अपमान केला नाही**
> खा. प्रणिती शिंदे यांनी संसदेत केलेल्या विधानावर बोलताना प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले की, त्यांनी ऑपरेशन सिंदूर वा सैनिकांचा अपमान केलेला नाही, त्यांच्या विधानाचा चुकीच्या पद्धतीने अर्थ लावला आहे. सैनिकांच्या पराक्रमाचा आम्हाला अभिमानच आहे पण त्याचे श्रेय लाटण्यासाठी भाजपाने मोदींचे लष्करी गणवेशातील होर्डींग देशभर लावले. भाजपा नेत्यांने एका महिला अधिकाऱ्यांवर अत्यंत खालच्या पातळीवर वक्तव्य केले,

टिळक भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, २८ डिसेंबर २०२० रोजी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदार संघात पंतप्रधान नरेंद्र मोदी, तत्कालीन रेल्वे मंत्री, कृषी मंत्री यांनी सांगोला ते पश्चिम बंगालमधील शालिमार या किसान रेल्वेच्या १०० व्या गाडीचा प्रारंभ केला होता. तेव्हा महाराष्ट्रात ग्रामपंचायत निवडणुका व पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका सुरु होत्या. हा कार्यक्रम देशभर टीव्हीवर प्रसारित करण्यात आला. त्यासाठी कार्यक्रमासाठी निवडणूक आयोग व जिल्हा प्रशासन यांची कोणतीही परवानगी घेतली नव्हती. याविषयी प्रफुल्ल कदम या कार्यकर्त्याने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असता सुरुवातीला वेळकाढूपणा करण्यात आला पण शेवटी आचारसंहिता भंग झाल्याचे मान्य करत केवळ रेल्वे प्रशासनाला समज देण्यात आली.

या प्रकरणी सरळ सरळ कायदा धाब्यावर बसवण्यात आलेला आहे हे स्पष्ट दिसत असतानाही नरेंद्र मोदी यांच्यावर कारवाई केली जात नाही, असे सांगितले. या प्रकरणी तक्रार करणारे प्रफुल्ल कदम यांनी आचारसंहिता भंग कशी झाली याची माहिती सर्व नियम व कायद्यानुसार दिली. निवडणूक काळात मतदारांवर प्रभाव पाडण्याचा हा प्रयत्न असून आदर्श आचारसंहितेचा उघड भंग केलेला असल्याने नरेंद्र मोदी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. पत्रकार परिषदेला माजी खा. कुमार केतकर, प्रदेश कॉंग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, अनंत गाडगीळ आदी उपस्थित होते.

# सीईओंच्या नावाने बनावट व्हॉटस्अ‍ॅप अकाउंट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांच्या नावे फेक व्हाट्सअप अकाउंट तयार करण्यात आले आहे. अशा बनावट व्हाट्सअप अकाउंटवरून येणाऱ्या मेसेजपासून सावध राहावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी पदभार घेतल्यापासून प्रशासकीय कामकाजाला गती दिली आहे. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या, पदोन्नती, कर्मचाऱ्यांचे दीर्घकाळांपासून प्रलंबित अनेक प्रशासकीय प्रश्न सोडवले आहेत. नुकतीच आषाढी वारीत त्यांनी जोमाने काम करून मुख्यमंत्र्यांची प्रशंसा मिळवली आहे. त्यानंतर अनुकंपा भरती पारदर्शकपणे करून राज्यात हा चर्चेचा विषय ठरला आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे नुकतेच प्रदीर्घ रजेवर गेले आहेत. त्यामुळे त्यांचा पदभार ही जंगम यांच्याकडे देण्यात आला आहे. त्यांचे वाढलेली लोकप्रियता पाहून हॅकर्सनी सोशल मीडियावर प्रसिद्ध झालेला त्यांचा फोटो वापरून फेक अकाउंट तयार केले आहे. या अकाउंट वरून जंगम यांच्या परिचयातील लोकांना मेसेज टाकून फसविण्याचा डाव हॅकर्सनी टाकला आहे. याची माहिती मिळताच सीईओ जंगम यांनी आपल्या व्हाट्सअप क्रमांकावरून लोकांना सावध केले आहे. एक अकाउंट वरून करण्यात आलेले चॅटींग प्रसिद्ध करत संबंधित नंबरवरून येणाऱ्या मेसेज वरून सावध राहावे असे आवाहन केले आहे.

सायबर हॅकर्सनी यापूर्वी व्हाट्सअप, फेसबुक व मोबाईलवरील मेसेजच्या आधारे लोकांना बनावट मेसेज पाठवून चॅटिंग करून फसवले आहे. त्यामुळे असे बेनामी येणारे संदेश कॉलची खात्री करूनच नागरिकांनी आपला व्यवहार ठेवावा असे सायबर ब्रांचतर्फे वारंवार आवाहन करण्यात येत आहे.

# आरोग्य विभागाचे दोन राष्ट्रीय संस्थांसोबत सामंजस्य करार

**मुंबई, दि. ३० जुलै-**

महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम व प्रशिक्षित करण्याच्या दृष्टीनेतसेच आरोग्य क्षेत्रातील दर्जा व क्षमता वृद्धीसाठी बुधवारी एक महत्त्वाचे पाऊल पढले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आरोग्य विभाग आणि पब्लिक हेल्थ फाउंडेशन ऑफ इंडिया (पीएचएफआय) आणि इन्स्टिटट्यूट ऑफ मेडिकल ॲन्ड मिनिमल ॲक्सेस सर्जरी ट्रेनिंग (आयएमएमएएसटी) या दोन जागतिक दर्जाच्या राष्ट्रीय संस्थासमवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, वैद्यकीय शिक्षण सचिव धीरज कुमार, आरोग्य सेवा आयुक्त डॉ.कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक तसेच दोन्ही संस्थांचे प्रमुख पदाधिकारी, प्रतिनिधी यावेळी उपस्थित होतें. या सामंजस्य करारामुळे राज्यातील सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील प्रशिक्षण, संशोधन आणि धोरण निर्मितीचा नवा अध्याय सुरु झाला आहे. या करारामुळे आरोग्य क्षेत्रात तांत्रिक सहकार्य आणि धोरण पातळीवर दीर्घकालीन परिणाम होणार आहेत. या दोन करारांमुळे महाराष्ट्राची सार्वजनिक आरोग्य यंत्रणा तांत्रिकदृष्ट्या अधिक सशक्त होणार आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# अण्णा डांगेची अडीच दशकानंतर पुत्रासह भाजपात घरवापसी!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० जुलै**

सांगलीतील ज्येष्ठ धनगर नेते आणि राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांचे समर्थक माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांनी बुधवारी आपले दोन्ही पुत्र व कार्यकर्त्यांसह सुमारे २३ वर्षांनी भारतीय जनता पार्टीत पुन्हा घरवापसी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत डांगे यांनी पुत्र चिमण डांगे आणि विश्वनाथ डांगे यांचेही भाजपात प्रवेश केला. करण्यात आले.

विशेष म्हणजे आरएसएसच्या मुशीत तयार झालेले आणि शिवसेना-भाजप युतीमध्ये मंत्री राहिलेल्या अण्णासाहेब डांगे हे २३ वर्षांनी स्वगृही परतल्याचे दिसून येत आहे. भाजपमध्ये असताना दिवंगत गोपीनाथ मुंडेच्या शिफारसीवरुन त्यांना मंत्रीपद मिळाले होते. या पक्षप्रवेश सोहळ्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी डांगे यांच्या जुन्या काळातील राजकीय आठवणींना उजाळा दिला.



अण्णासाहेब डांगे यांनी यापूर्वी राज्यात कॉंग्रेसला सत्तेपासून रोखण्यात युतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली होती. नंतरच्या काळात महाविकास आघाडी सरकार असताना त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला होता. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्या नेतृत्वात त्यांनी घड्याळ हाती बांधलं होते. मात्र, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी आता ते पुन्हा भाजपात परतले. यावेळी अण्णा डांगे म्हणाले, आजचा दिवस माझ्या भाग्याचा दिवस आहे, २० मार्च २००२ ला मी पक्षाचा राजीनामा दिला होता. आज पुन्हा घरी परतत आहे. आता जे हयात नाहीत. त्यांचच्याबद्दल बरे वाईट बोलणं बरोबर नाही. पक्षांमध्ये चुरस निमर्ण झाली आहे. अटलजींनी नाव घेतले प्रमोद महाजन यांचे उत्तराधिकारी होतील आणि गोपीनाथ मुंडे यांना मुख्यमंत्री करायचं होते, म्हणून माझ्यावर अन्याय झाल्याची भावना यावेळी अण्णासाहेब डांगे यांनी बोलून दाखवली.

चिमण डांगे म्हणाले, मी देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो, या दिवसाची वाट ८००० दिवसांपासून मी बघतोय. २३ वर्षे आम्ही भाजपापासून दूर होतो पण आमचा कोणी विचार केला नाही. पण तुम्ही आला आणि आमचा विचार केला. तुमच्यामुळे मला आज हा दिवस बघायला मिळाला, असेही त्यांनी सांगितले.

> **मी महापौर असताना अण्णांसोबत काम केलं : फडणवीस**
> आमच्या सर्वांसाठी आज आनंदाचा दिवस आहे, अण्णांनी पक्ष वाढवण्यासाठी मोठं काम केलं, त्यांचा मोठा वाटा या सगळ्यामध्ये आहे. आम्ही लहान कार्यकर्ते असल्यापासून प्रमोदजी, गोपीनाथजी अण्णा या सगळ्यांनी खूप कष्टातून या पक्षाला मोठा केलं आणि शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवलं. अण्णांनी महत्त्वाचे वर्ष हे जनसंघासाठी आणि भारतीय जनता पार्टीसाठी दिले. मी महापौर असताना अण्णांनी जी घोषणा केली, टँकरमुक्त महाराष्ट्र त्यावेळेस मला अण्णांबरोबर काम करायची संधी मिळाल्याची आठवण मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितली. आम्ही युवा मोर्चाचे लहान कार्यकर्ते असताना मी बघायचो अण्णांचं स्थान खूप मोठं होतं, गोपीनाथजी पण अण्णांबरोबर चर्चा करून मग निर्णय घ्यायचे. माझे संघ जीवन गाथा हे पुस्तक अण्णांनी लिहिलं, प्रकाशनाला मी देखील उपस्थित होतो, अशीही आठवण फडणवीसांनी सांगितली.



सभागृहात तब्बल १८ ते २२ मिनिटे पत्ते खेळणाऱ्या कृषिमंत्र्यावर हे सरकार कारवाई करणार नसेल, तर स्व. अटलजींच्या आणि स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांचा वारसा सांगण्याचा नैतिक अधिकार उरतो का?

**रोहित पवार**, राकाँशप आमदार

**तरुण भारत**
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, गुरुवार, ३१ जुलै २०२५



माझा वैयक्तिक विश्वास आहे की देवाने तुमच्या नशिबात जे काही लिहिले आहे, ते तुमच्यापर्यंत आपोआप पोहोचते. तुम्ही फक्त एकाच ठिकाणी बसा आणि धीराने वाट पाहा. जर योग्य ठिकाणी वाट पाहिली आणि धीर धरला तर प्रगती होते.

**आशुतोष राणा**, अभिनेता



# रशिया-जपान भूकंपाने हादरला

**रिश्टल स्केलवर ८.८ तीव्रता**

**प्रशांत महासागर प्रदेशातील या देशांना इशारा**
रशिया, जपान, अमेरिका, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, चीन, तैवान, चिली, पेरू, मेक्सिको आणि पनामा या देशांना त्सुनामीचा इशारा जारी करण्यात आला आहे.

## प्रशांत महासागरात पाच फुटांपर्यंत त्सुनामीच्या लाटा

## अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, चीनला तडाखा

## किनारपट्टीवरील लोकांना सुरक्षित स्थळी हलविले



क्यूआर कोड स्कॅन करा आणि बघा विशेष व्हिडीओ

रशियात आलेल्या प्रचंड मोठ्या भूकंपानंतर आलेल्या त्सुनामीत कुरिल द्वीपकल्पाच्या सेवेरो-कुरिलस्कच्या किनारी भागात समुद्राचे पाणी कित्येक किलोमीटर खोलवर शिरले आणि असा विद्ध्वंस घातला. येथील भाग पूर्णतः जलमय झाला

◆ **मॉस्को, ३० जुलै**

रशियाचा पूर्व भाग असलेल्या कुरील बेट, कामचटका आणि जपानच्या उत्तर भागातील होक्काईडो भागात भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे ४.५४ वाजता काही मिनिटांत भूकंपाचे ३० धक्के बसले. भूकंपाची तीव्रता रिश्टल स्केलवर ८.८ इतकी नोंदविण्यात आली. रशियाच्या भूकंप प्रभावित भागात अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या, अद्याप जीवित आणि मालमत्तेच्या नुकसानीची आकडेवारी समोर आली नाही. भूकंपानंतर प्रशांत महासागरात पाच फुटांपर्यंत त्सुनामीच्या लाटा आल्या.

रशिया, जपान, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि चीनच्या समुद्र किनाऱ्यावर आलेल्या उंच लाटांमुळे या भागातील लाखो लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. अमेरिकेच्या भूकंपशास्त्र विभागाने म्हटले की, भूकंपाची खोली प्रशांत महासागराच्या समुद्राखाली १९.३ किलोमीटर नोंदवली गेली. भूकंपाचे धक्के इतके तीव्र होते की, रशियाच्या पूर्वेतील कुरील बेट, कामचटका भाग आणि जपानच्या उत्तर भागातील अनेक इमारती कोसळल्या. जीव वाचविण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर धाव घेतली. भूकंपानंतर अमेरिका आणि जपानच्या हवामान शास्त्र केंद्राने प्रशांत महासागराच्या किनारपट्टीवर त्सुनामीचा इशारा दिला होता आणि यानंतर काही तासांतच जपान, रशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि चीनच्या किनाऱ्यावर चार ते पाच फुटांपर्यंतच्या लाटा आल्या. जपानच्या प्रशांत किनाऱ्यावरील होक्काईडो आणि ओकिनावा येथील नऊ लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले.

**विमानांची उड्डाणे रद्द, रेल्वेसेवा प्रभावित**

शक्तिशाली भूकंपामुळे काही तासांसाठी रशिया आणि जपानची विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली, तर रेल्वेसेवादेखील प्रभावित झाली होती. जपानच्या हवाई येथील किनाऱ्यावर सहा फूट उंच समुद्राच्या लाटा दिसल्याचे गव्हर्नर जोश ग्रीन यांनी सांगितले. पॅसिफिक समुद्रकिनाऱ्यांच्या इतर भागात तीन मीटर उंचीच्या लाटा येण्याची शक्यता वर्तविण्यात आली.

**भारताला धोका नाही**

इंडियन नॅशनल सेंटर फॉर ओशन इन्फॉर्मेशन सर्व्हिसेसने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावर आलेल्या तीव्र भूकंपामुळे भारत आणि हिंद महासागराला त्सुनामीच्या धोक्याची शक्यता नाही. रशियाच्या कुरिल कोस्टल आयलंड, जपानच्या होक्काईडो आणि अमेरिकेला त्सुनामीचा धोका आहे.

**कामचटका भूकंप प्रवण क्षेत्र**

कामचटका द्वीपकल्प भौगोलिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आहे. हा प्रदेश पॅसिफिक प्लेट आणि उत्तर अमेरिकन प्लेटच्या सबडक्शन झोनवर (जिथे एक प्लेट दुसऱ्या प्लेटखाली सरकते) स्थित आहे. यामुळे येथे सातत्याने भूकंप आणि ज्वालामुखी उद्रेकासारख्या घटना घडतात. कामचटका हा 'रिंग ऑफ फायर'चा भाग आहे, जो प्रशांत महासागराभोवती पसरलेला आहे आणि जिथे जगातील ७५ टक्क्यांपेक्षा जास्त ज्वालामुखी आणि ९० टक्के भूकंप होतात. कामचटकामध्ये ४ नोव्हेंबर १९५२ रोजी ९.० तीव्रतेचा भूकंप आला होता, यामुळे या भागात सुमारे ३० फूट उंचीच्या त्सुनामी लाटा निर्माण झाल्या होत्या. १५ जुलै २०२५ रोजी या परिसरात पाच मोठे भूकंपाचे धक्के नोंदवले गेले. (वृत्तसंस्था)



सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणारी बस जम्मू-काश्मिरातील गंदेरबाल जिल्ह्याच्या कुल्लन नदीत कोसळली. नदीचा प्रचंड वेगात वाहणारा प्रवाह बचाव कार्यात अडथळा ठरत होता. सुरक्षा दलाच्या जवानांनी येथे बचावमोहीम राबवून आपल्या सहकाऱ्यांना सुरक्षित बाहेर काढले.

# भारताच्या आणखी एका भागात चीनची घुसखोरी

## शक्सगाम खोऱ्यात रस्त्यांचे जाळे

◆ **नवी दिल्ली, ३० जुलै**

चीनने लडाखच्या उत्तर भागात असलेल्या शक्सगाम खोऱ्यात रस्त्यांचे नवे जाळे उभारल्याचे उपग्रहाच्या माध्यमातून समोर आले आहे. त्यामुळे भारताच्या सुरक्षेला भविष्यात धोका निर्माण झाला आहे. या रस्त्यांच्या माध्यमातून चीन हा भारतीय लष्कराच्या हालचालीवर नियंत्रण ठेवू पाहतो आहे. चीनची ही चाल पाकिस्तानसाठीही लाभदायक ठरणार आहे.

हे क्षेत्र मूळतः भारताचा भाग असले तरी, १९६३ मध्ये पाकिस्तानने अनधिकृतरीत्या चीनला हस्तांतरित केले होते. भारताने याला कधीही मान्यता दिलेली नाही आणि आजही या भागावर आपला सार्वभौमत्वाचा दावा कायम ठेवला आहे.

भारताची भूमिकाभारतीय परराष्ट्र मंत्रालयाने २०२४ मध्ये पुन्हा एकदा स्पष्टपणे सांगितले की, शक्सगाम खोऱ्यावर भारताचा सार्वभौम हक्क आहे आणि चीन-पाकिस्तान यांच्यात झालेला सीमा करार भारत अमान्य करतो. (वृत्तसंस्था)

**उपग्रह छायाचित्रांमधून उघड झाले बांधकाम**

ओपन-सोर्स इंटेलिजन्स विश्लेषक नेचर देसाई या 'एक्स' अकाऊंटवर यासंबंधी उपग्रह छायाचित्र फोटो शेअर करण्यात आले आहेत. चीनच्या २१९ महामार्गापासून निघणारा रस्ता अघिल पास मार्गे शक्सगाम खोऱ्यात प्रवेश करतो. हा मार्ग अक्साई चीन आणि शिनजियांग या संवेदनशील क्षेत्रांमधून जातो.

**शक्सगामविषयी थोडक्यात...**

शक्सगाम खोऱ्याचे स्थान हे लडाखच्या उत्तर टोकाला, सियाचिन ग्लेशियरच्या पुढे वसले आहे. भारताने १९८४ मध्ये ऑपरेशन मेघदूतद्वारे सियाचीनवरील नियंत्रण मिळवले. पाकिस्तानचा बेकायदेशीर करार : १९६२ च्या युद्धानंतर लगेच काही महिन्यांत, मार्च १९६३ मध्ये पाकिस्तानने हे क्षेत्र चीनला दिले होते. हा तथाकथित सीमा करार भारताने कधीच मान्य केलेला नाही.

# मुसळधार पावसामुळे अमरनाथ यात्रा स्थगित

◆ **श्रीनगर, ३० जुलै**

काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे बुधवारी अधिकाऱ्यांनी पहलगाम आणि बालटाल दोन्ही मार्गांवरील अमरनाथ यात्रा स्थगित केली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. पहलगाम आणि बालटाल बेस कॅम्पवरून ३० जुलैला अमरनाथ यात्रा स्थगित करण्यात आली आहे, अशी पोस्ट जम्मू-काश्मीरच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने त्यांच्या 'एक्स'वर केली.

बुधवारी पहाटेपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बालटाल आणि नुनवान/चंदनवारी बेस कॅम्पवरून यात्रेला परवानगी देण्यात आली नाही. आतापर्यंत ३.९३ लाखांहून अधिक यात्रेकरूंनी पवित्र गुहेत दर्शन घेतले आहे. गुरुवारी भगवती नगर बेस कॅम्पवरून ही यात्रा स्थगित राहील. यात्रा परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे, बेस कॅम्पमधून येणाऱ्या यात्रेकरूंच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे, ३१ जुलै २०२५ रोजी भगवती नगर जम्मूहून बालटाल आणि नुनवान बेस कॅम्पकडे कोणत्याही काफिल्याला जाऊ दिले जाणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे, असे काश्मीरचे विभागीय आयुक्त विजय कुमार बिधुरी यांनी सांगितले. यात्रा यावर्षी ३ जुलैला सुरू झाली असून, ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन दिवशी समाप्त होणार आहे. यंदा आतापर्यंत जवळपास चार लाखांहून अधिक भाविकांनी अमरनाथ गुहेचे दर्शन घेतले आहे. याआधी देखील १७ जुलै रोजी खराब हवामानामुळे यात्रा थांबवण्यात आली होती. पावसामुळे रस्ते आणि ट्रॅक स्लिप होण्याचा धोका असल्याने भाविकांनी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. (वृत्तसंस्था)

## दोन वर्षांपासून वास्तव्य करणाऱ्या ११ बांगलादेशींना अटक

◆ **नादिया, ३० जुलै**

पश्चिम बंगालच्या नादिया जिल्ह्यात चार मुलांसह सात बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. मंगळवारी जिल्ह्यातील धंतला पोलिस स्टेशन परिसरातील बारानबेरिया निरालापारा येथून त्यांना अटक करण्यात आली.

हे सर्व जण बांगलादेशच्या खुलना जिल्ह्यातील बटियाघाटा पोलीस स्टेशन परिसरातील बलियाडांगा गावातील आहेत. हा गट दोन वर्षांपूर्वी भारतात शिरला होता आणि अहमदाबादमध्ये राहत होता. नादिया येथील सीमेवरून बांगलादेशला परतण्याचा प्रयत्न करत असताना त्यांना पकडण्यात आले.

या प्रकरणी धंतला पोलिस स्थानकामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्या इतर साथीदारांचा शोध घेण्यासाठी छापे टाकण्यात येत आहेत, असे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)



वाळवंटी प्रदेश समजल्या जाणाऱ्या राजस्थानात पावसाचे धूमशान सुरू आहे. येथील भरतपूर जिल्ह्यातल्या सवाई माधोपूर येथे निर्माण झालेल्या पूर परिस्थितीमुळे रेल्वे स्थानकाला असे नदीचे स्वरूप आले



# गडकरी यांची लोकप्रियता सर्वपक्षीय खासदारांमध्ये

## शरद पवार यांचे गौरवोद्गार सी.डी. देशमुख पुरस्कार प्रदान

**नवी दिल्ली, ३० जुलै**

देशाचा खऱ्या अर्थाने विकास पायाभूत सुविधांच्या विकासाने होतो, याची जाणीव असल्यामुळे गडकरी आपल्याकडे येणारा खासदार कोणत्या राजकीय पक्षाचा आहे, याचा विचार न करता त्याच्या मतदारसंघातील कामांना मंजुरी देतात, यामुळे ते सर्वपक्षीय खासदारांमध्ये लोकप्रिय असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी काढले.

सरहद या पुण्यातील संस्थेतर्फे दुसरा चिंतामणराव देशमुख (सी. डी.) पुरस्कार केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना शरद पवार यांच्या हस्ते मंगळवारी प्रदान करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. एक लाख एक हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह आणि गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शरद पवार यांनी गडकरी यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाची आणि कार्यशैलीची मुक्तकंठाने प्रशंसा केली. दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनात झालेल्या या कार्यक्रमाला सरहदचे संजय नहार, खा. धैर्यशील मोहिते पाटील, वनराई फाउंडेशनचे गिरीश गांधी आणि एबीपी माझाचे कार्यकारी उपाध्यक्ष राजीव खांडेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार धनंजय बिजले यांच्या महामुद्रा या पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी पवार आणि गडकरी यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र हा भारतामध्ये आहे आणि मराठीइतकाच आम्हाला हिंदीचाही अभिमान असल्याचे सत्काराला उत्तर देतांना गडकरी यांनी म्हटले. जात, पंथ, धर्म, भाषा आणि लिंग यांच्या आधारावर भेदभाव करायला नको, असे ते म्हणाले. दिल्लीत असणारा प्रत्येक मराठी नेता हा मराठी माणसाचा आणि महाराष्ट्राचा दूत आहे, असे स्पष्ट करीत गडकरी म्हणाले की, शरद पवार यांच्यासारख्या दिग्गज नेत्याच्या हाताने हा पुरस्कार स्वीकारताना मला अतिशय आनंद होत आहे. सी. डी. देशमुख यांच्यासारख्या अतिशय मोठ्या नेत्याच्या नावाचा पुरस्कार स्वीकारण्याएवढा मी मोठा नाही, त्यामुळे हा पुरस्कार शरद पवार यांच्या हस्ते स्वीकारताना मला अतिशय अवघडल्यासारखे वाटत आहे, असे कृतज्ञतापूर्वक उद्गार गडकरी यांनी काढले.

# आता स्मार्टफोन करणार क्षयरोगाचे निदान

## ● संशोधकांनी विकसित केले पोर्टेबल उपकरण ● ३०० ग्रॅमपेक्षाही कमी वजन

◆ **गुवाहाटी, ३० जुलै**

आता स्मार्टफोनच्या मदतीने क्षयरोगाचे निदान करणे शक्य आहे. आसाममधील तेजपूर विद्यापीठातील संशोधक पथकाने स्मार्टफोनच्या मदतीने क्षयरोगाचे निदान करणारे एक पोर्टेबल उपकरण विकसित केले आहे.

भौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक पवित्रा नाथ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ते विकसित केले आहे. या नवीन उपकरणाला कोणत्याही रसायनांची किंवा रंगांची आवश्यकता नाही. क्षयरोगाच्या जीवाणूंमधून जी नैसर्गिक चमक (ऑटोफ्लोरेसेन्स) बाहेर पडते. त्याचा शोध घेण्यासाठी हे उपकरण वापरण्यात येते. या उपकरणात स्वयंचलित उष्णता प्रणाली आहे, असे नाथ म्हणाले. हे किफायतशीर देखील आहे. याची किंमत २५ हजार रुपयांपेक्षा कमी आहे. उपकरणाचे वजन ३०० ग्रॅमपेक्षा कमी आहे. यामुळे ते पोर्टेबल आणि मर्यादित आरोग्यसेवा पायाभूत सुविधा असलेल्या ठिकाणी योग्य आहे.



क्षयरोग ही भारतातील एक प्रमुख सार्वजनिक आरोग्य समस्या आहे. याचा प्रसार रोखण्यासाठी लवकर आणि अचूक निदान अत्यंत महत्वाचे आहे, असे ते म्हणाले.

जागतिक आरोग्य संघटना आणि भारताचा राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमात क्षयरोग तपासणीसाठी एलईडी फ्लोरोसेन्स मायक्रोस्कोपी हे सुवर्ण मानक असल्याचे सांगितले. एलइडी-एफएम पारंपरिक ऑप्टिकल मायक्रोस्कोपीपेक्षा जास्त संवेदनशील आहे, परंतु त्याचे अनेक तोटे आहेत. ऑप्टिकल मायक्रोस्कोपी ही महागड्या उपकरणांवर, ऑरामाईन-ओ सारख्या रासायनिक द्रव्यरंगावर तसेच नमुना तयार करण्यासाठी आणि अर्थ लावण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांवर अवलंबून असते. याशिवाय प्रयोगशाळेच्या पायाभूत सुविधांवर अवलंबून राहिल्याने ते अनेक ग्रामीण भागात अव्यवहार्य ठरते, असे नाथ म्हणाले.

टीयू येथे विकसित केलेले हे उपकरण ऑटोफ्लोरेसेन्सच्या तत्त्वाचा वापर करते. ते मायक्रोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसिस (एमटीबी) पेशींसह काही सूक्ष्मजीव पेशींचा नैसर्गिक गुणधर्म आहे. ते प्रकाशाच्या विशिष्ट तरंगलांबीमुळे उत्तेजित झाल्यावर फ्लोरोसेन्स संकेत उत्सर्जित करतात. सेन्सरमध्ये हीटिंग एलिमेंटचे एकत्रीकरण करणे ही मुख्य नवोपक्रमाची संकल्पना आहे. क्षयरोग जीवाणूच्या नमुन्याचे तापमान वाढवून, ही प्रणाली टीबी पेशींमधून नैसर्गिक फ्लोरोसेन्स संकेत वाढवते. यामुळे डाग किंवा रंगांचा वापर न करता ट्रेस-लेव्हल शोधणे शक्य होते, असे नाथ म्हणाले. (वृत्तसंस्था)

**ग्रामीण भागात क्रांतीची शक्यता**

या पथकाने या उपकरणासाठी पेटंट आधीच दाखल केले आहे आणि त्याचे निष्कर्ष बायोसेन्सर्स अॅण्ड बायोइलेक्ट्रॉनिक्स या आंतरराष्ट्रीय नियतकालिकेमध्ये प्रकाशित झाले आहेत. या नवोपक्रमात क्षयरोगाविरुद्धच्या लढाईत, विशेषतः ग्रामीण भागात मोठा परिणाम घडविण्याची क्षमता आहे, असे टीयूचे कुलगुरू शंभूनाथ सिंह म्हणाले.

# हिंदू असल्यास द्यावा लागेल कर

## बांगलादेशात जिझिया?

◆ **ढाका, ३० जुलै**

बांगलादेशात अल्पसंख्याक आणि विशेषतः हिंदूंची स्थिती दिवसेंदिवस खालावत आहे. मोहम्मद युनूस सरकारच्या कार्यकाळात हिंदूंना जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात आहे. येथील स्थिती आता पूर्वीपेक्षा अधिक चिंताजनक बनली असून, गैर-मुस्लिमांवर विशेषकरून हिंदूंवर जिझिया कर लादण्याचा घाट घातला जात आहे.

आता बांगलादेशात वास्तव्यास असणाऱ्या हिंदूंना अर्थातच सर्व गैर-मुस्लिमांना जिझिया कर द्यावा लागणार आहे. युनूस सरकारचा सहकारी पक्ष असणाऱ्या जमाते इस्लामीने हा प्रस्ताव आणला आहे. या पक्षाच्या प्रमुखांनी खुलेआम जिझिया कराची घोषणा केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, जर गैर-मुस्लिमांना समान अधिकार हवा असेल, तर त्यांना जिझिया कर द्यावा लागेल. कारण, मुसलमान जकात देतात. हाच शरिया कायदा आहे.



हे करण्यासाठी पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयचीही मदत घेतली जात असल्याचे समजते. या सर्व कट-कारस्थानांचा उद्देश बांगलादेशात गैर-मुस्लिमांना लक्ष्य करणे आणि त्यांना आर्थिक तसेच सामाजिक स्तरावर कमकुवत करणे हा आहे. बांगलादेशात हिंदू, ख्रिश्चन आणि बौद्ध या समुदायाच्या लोकांना मुख्य प्रवाहापासून वेगळे करण्यासाठी आणि दुय्यम दर्जा देण्यासाठी हा सर्व प्रकार केला जात आहे. यावर बांगलादेशात युनूस सरकारने कोणतेही खंडन न केल्याने या सर्व प्रकारांना त्यांचे समर्थन असल्याचे स्पष्ट दिसत आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# जराही लाज नाही..!

महाराष्ट्र सरकारने जून २०२४ मध्ये सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत गैरप्रकार झाल्याबद्दल बोंबा मारल्या जात आहेत. पण या गैरप्रकारांचे वैशिष्ट्य असे की ते या योजनेची अंमलबजावणी करणारे कर्मचारी, प्रशासन किंवा सरकार यापैकी कोणीही केलेले नाहीत. काही ठिकाणी संगनमत निश्चित असू शकते. पण जो काही गैरप्रकार आहे जवळपास तो साराच जनतेने, या राज्यातील लोकांनी केलेला आहे, अगदी निलाजरेपणाने..! सामाजिक भान, जाणीव, कर्तव्य, नैतिकता वगैरे सारेकाही धाब्यावर ठेवून केलेला आहे.

'लाडकी बहीण' ही महिलांचे किंचित आर्थिक सक्षमीकरण आणि विकासासाठी एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा उद्देश २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपयांचे आर्थिक साहाय्य प्रदान करणे हा आहे. ज्यामुळे त्यांचे आरोग्य, पोषण आणि कुटुंबातील निर्णायक भूमिका मजबूत होईल. त्यात लाभार्थी महाराष्ट्राची कायमस्वरूपी रहिवासी असावी. तिचे वय २१ ते ६५ वर्षे असावे. तिच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाखांपेक्षा कमी असावे, आधार संलग्न बँक खाते असावे, विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, निराधार महिलांना प्राधान्य आणि प्रत्येक कुटुंबातील एका अविवाहित महिलेला लाभ, अशा यातील प्राथमिक तरतुदी आहेत. या योजनेसाठी राज्य सरकारने ४६,००० कोटींचा निधी मंजूर केला आहे, आणि आतापर्यंत २.५० कोटींहून अधिक महिलांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. मात्र, या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसोबतच अनेक गैरप्रकार आणि अनियमितता उजेडात येत आहेत. या 'लाडक्या बहिणी'ने लाखो महिलांना लाभ दिला असला, तरी त्यातील गैरप्रकारांनी प्रशासकीय कमकुवतपणा उघड केला आहे. योजनेतील सर्वांत मोठा गैरप्रकार म्हणजे अपात्र व्यक्तींनी घेतलेला लाभ हा आहे. यातील नुकतीच उघडकीस आलेली सर्वांत गंभीर आणि लाजिरवाणी बाब म्हणजे चक्क १४,२१८ 'पुरुषांनी' स्वत:ला स्त्री दाखवून आतापर्यंत २१.४४ कोटी लाटले आहेत. यात काही प्रकरणांमध्ये पुरुषांनी महिलांच्या नावाने अर्ज केले, तर काहींनी बनावट कागदपत्रांचा वापर करून योजनेचा लाभ उचलला आहे. यामुळे आणि सरकारी यंत्रणेतील त्रुटींमुळे सरकारी निधीचा गैरवापर झाला. आतापर्यंत एकूण अडीच कोटी महिला लाभार्थींपैकी सुमारे २६ लाखांहून अधिक अपात्र व्यक्तींनी, म्हणजेच अपात्र महिला आणि पुरुष या दोघांनीही या योजनेचा लाभ घेतला. यामध्ये प्रामुख्याने ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे अशा महिला आहेत. त्या आयकरदाता कुटुंबातील आहेत किंवा सरकारी नोकरीत आहेत. काही प्रकरणांमध्ये बनावट उत्पन्न प्रमाणपत्रे सादर केली गेली आहेत. विशेषत: गोंदिया आणि भंडारा नगर परिषदांमध्ये हजारो अपात्र महिलांची यादी जाहीर झाली आहे, ज्यामध्ये उत्पन्न मर्यादा ओलांडणाऱ्या महिलांचा समावेश आहे.

या अपात्र बहिणींमध्ये निवृत्त महिला कर्मचाऱ्यांसह ९,५२६ सरकारी महिला कर्मचाऱ्यांचा समावेश होता, ज्या सर्वच या योजनेच्या निकषांनुसार अपात्र होत्या. या महिलांनी त्यांचे सरकारी कर्मचारी असल्याचे तथ्य लपवले आणि पूर्णपणे अपात्र असूनही लाभ उचलला. यातील संतापजनक बाब म्हणजे नोकरीत असणाऱ्यांसोबतच बहुतांश सेवानिवृत्त महिला उत्तम निवृत्तिवेतन घेणाऱ्या असल्याचे आढळून आले आहे. सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याने योजनेच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला आणि सामान्य महिलांमध्ये असंतोष निर्माण झाला. योजनेसाठी अर्ज करताना आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला आणि बँक खात्याचा तपशील यांचा समावेश आहे. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये बनावट कागदपत्रांचा वापर करून अर्ज सादर केले गेल्याची चीड आणणारी बाब उघड झाली आहे. काही अर्जांमध्ये बनावट उत्पन्न प्रमाणपत्रे सादर केली गेली, ज्यामुळे अपात्र व्यक्तींना लाभ मिळाला. याशिवाय, आधार कार्ड आणि बँक खात्याच्या तपशिलात फेरफार केल्याचेही आढळले. याबाबत स्पष्ट आकडेवारी उपलब्ध नसली, तरी एकाच गोंदिया नगर परिषदेने चक्क २७,००० अपात्र महिलांची यादी जाहीर केली, ज्यामध्ये बनावट कागदपत्रांच्या वापराचे स्पष्ट संकेत आहेत. यावरून अशा काही गावांमध्ये एखादी अशी कामे करणारी यंत्रणाच तर अस्तित्वात आली नव्हती, अशा संशयालाही वाव आहे. लाडकी बहीण योजनेच्या सुरुवातीला अर्ज तपासणी प्रक्रिया कठोर नव्हती. त्यामुळेच अपात्र अर्ज मंजूर झाले. यामागे प्रशासकीय यंत्रणेची अपुरी तयारी आणि कमकुवत तपासणी यंत्रणा कारणीभूत आहे. काही प्रकरणांमध्ये, राजकीय दबावामुळे अपात्र अर्जांना मंजुरी देण्यात आल्याचीही बाब समोर आली आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत काही प्रमाणात का होईना गैरप्रकारांना प्रोत्साहन मिळाले. विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर योजनेला गती देण्यासाठी तपासणी प्रक्रिया सौम्य करण्यात आली, ज्यामुळे अनेक अपात्र लाभार्थींना आणि त्यांना घुसवणाऱ्यांना मोकळे रान मिळाले. लाडकी बहीण योजनेतील गैरप्रकारांमुळे २१.४४ कोटींचा निधी अपात्र 'पुरुष' लाभार्थींपर्यंत पोहोचला आहे. तर दुसरीकडे एकूण २६ लाखांहून अधिक अपात्र व्यक्तींनी लाभ घेतल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. अशा योजनाबद्ध 'अपात्रां'मध्ये प्रामुख्याने महिलाच आहेत, हे दुर्दैव. अपात्र व्यक्तींनी लाभ घेतल्याने खऱ्या गरजू महिलांना लाभ मिळण्यात विलंब झाला किंवा काहींना लाभ मिळालाच नाही. गैरप्रकार उघड झाल्याने प्रशासकीय यंत्रणेच्या उरावर तपासणी व दुरुस्तीचे काम येऊन पडले आणि योजनेची गती मंदावली.

महाराष्ट्र सरकारने काय उद्देश डोळ्यांसमोर ठेवून ही 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली हे स्पष्ट आहे. महिलांना काहीतरी रक्कम स्वत:ची वाटावी, ती खर्च करण्याचे अधिकार आपल्याला असावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. या योजनेतील २.५ कोटी लाभार्थींपैकी अक्षरश: लाखो बहिणींना आयुष्यात कधीही 'बँक खाते आणि त्यात आपले दीड हजार रुपये' असा अनुभव नव्हता. एका दृष्टीने विचार केला तर सुमारे ४० हजार कोटी रुपयांचा सरकारी तिजोरीतून खर्च आणि त्यात कवडीचाही भ्रष्टाचार नाही, अशी ही योजना आहे. कारण बहिणीच्या खात्यात पूर्ण १५०० रुपये थेट जात होते. त्यासाठी त्यांना कोणालाही काहीही द्यावे लागत नव्हते. ४० हजार कोटी रुपयांच्या कामांमध्ये ३४ हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होतो, एक रुपयापैकी फक्त पंधराच पैसे कामी लागतात, असे आपले पंतप्रधान राजीव गांधी यांनीच सांगितले होते. त्या पृष्ठभूमीवर तर ४० हजार कोटी रुपयांच्या व्यवहारात एका रुपयाचाही भ्रष्टाचार नाही, अशी ही एकदम 'स्वच्छ' योजना होती. पण लोकांची मानसिकताच पाहा कशी पार रसातळाला गेली आहे. अडीच कोटींपैकी ३६.३४ लाख बहिणी अपात्र ठरणे, १५ हजार पुरुषांनी 'बहीण' असल्याचा बनाव करणे, एका योजनेची लाभार्थी असताना हीसुद्धा लाटणे, वय आणि उत्पन्नमर्यादा धाब्यावर बसवून, सरकारी पगार, निवृत्तिवेतन घेत असणाऱ्या महिलांनीही विविध लांड्यालबाड्या करून हे सारे केल्याचे आता उजेडात आले आहे. हे सारे केले किती रुपयांसाठी, तर फक्त १५०० रुपये महिन्यासाठी. जराही लाज नाही. ज्यांचे कवडीचेही उत्पन्न नाही किंवा कुटुंबाचे मर्यादित उत्पन्न आहे अशांसाठीच, असे वारंवार सांगितल्यानंतरही २५ लाखांपेक्षा जास्त 'लबाड बहिणी' आणि पंधरा हजार 'निर्लज्ज पुरुष' सापडावेत यापेक्षा लाजिरवाणे आणि किळसवाणे काय असू शकते..? या सर्वांना योजनेबाहेर काढण्यात तर येणारच आहे. पण जवळपास १० हजार सरकारी कर्मचारी महिलांनीही स्वत:बद्दल खोटी आणि सरकारची दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल त्यांना एका फटक्यात घरी बसवायला हवे आहे. दुसरीकडे स्वत:ला महिला दाखवून बहीण म्हणवणाऱ्या तथाकथित केविलवाण्या पुरुषांचेही 'वस्त्रहरण' करून फौजदारी झटके द्यायला हवे आहेत, ही साऱ्या महाराष्ट्राचीच इच्छा आहे आणि त्यात अनपेक्षित असे नक्कीच काहीही नाही..!

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# कौशल्यवाद अंगीकारण्याचे आव्हान

आजघडीला देश संक्रमणावस्थेतून जात आहे. सध्या विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत; ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रीतीने चिरंतन किंवा शाश्वत काहीही नसते आणि म्हणूनच या मंदीचा जास्त बाऊ करू नये. कारण या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी आणि देदीप्यमान यश मिळवण्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात केलेली माणसे ऊर्फ 'स्किल्ड मॅनपॉवर' आपल्याकडे उपलब्ध आहे. २०३५ पर्यंत आपण एका विकसित देशाचे नागरिक असू हे नक्की आणि त्यातून आपण एका वेगळ्या मार्गाने जगावर राज्यही करू शकू. माझ्या दृष्टीने आयटी या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट! आपल्या देशाची वाढती लोकसंख्या ही पहिलेपासून एक मोठी समस्या मानली गेली आहे आणि त्यानुसार लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी विविध उपायही योजले गेले. इतक्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन जागतिक पातळीवर आर्थिक सत्ता मिळवण्यासाठी वापरता येईल हे फारसे कोणाला सुचले नाही. केवळ कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लोक सामावून घेतले जाऊ शकत नाहीत. त्यामुळे औद्योगिक विकास महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी उत्पादन आणि सेवाक्षेत्रांना कुशल आणि कार्यक्षम लोक आवश्यक असतात. देशातील तरुणांना उत्तम शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची नितांत गरज आहे. आज मात्र वेगळ्या दिशेने विचार करून आपल्याकडे भरपूर प्रमाणात असलेल्या या मनुष्यबळाचा योग्य वापर करण्याची वेळ आली आहे.

मोठा तरुणवर्ग उपलब्ध असलेले फारच थोडे देश जगात आहेत. जगातील बहुसंख्य देशांमधल्या नागरिकांचे सरासरी वयोमान वाढत चालले आहे. झपाट्याने मध्यमवयीन बनणाऱ्या या जगातला तरुणाईचा फार मोठा साठा आपल्याकडे आहे, ही फार महत्त्वाची जमेची बाजू आहे. या वर्गाला योग्य प्रशिक्षण दिले गेले की त्यांच्याकडून देशाच्या अर्थकारणात मोठे सकारात्मक बदल घडवून आणता येतीलच, शिवाय हे तरुण-तरुणी जागतिक पातळीवर काम करतील तेव्हा भरपूर पैसा कमावतील आणि त्यापैकी मोठा हिस्सा बचतीच्या रूपाने भारतातच परत पाठवतील. यामुळे भारताचे सकल उत्पन्न तसेच उत्पादकता वाढेल आणि इथल्या तरुणवर्गाच्या निर्मितिक्षम मनाला संधीही उपलब्ध होतील. आज देशात दिसणाऱ्या परिवर्तनांमध्ये या मानवी भांडवलाचा मोठा हिस्सा तर आहेच, परंतु गेल्या काही वर्षांमधल्या एकंदर अस्थिर स्थितीमधून पुन्हा जोमाने वर येण्यासाठी देशाला या जोमदार, चळवळ्या लोकांचाच उपयोग



होणार आहे. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, जैवतंत्रज्ञान, आरोग्य या पूर्णपणे कात टाकलेल्या किंवा नव्याने वर आलेल्या क्षेत्रांकडे नजर टाकल्यास हा फरक नक्कीच जाणवेल. याखेरीज प्रस्थापित उद्योगक्षेत्रांमध्येही धडाडीचे नवे उद्योजक येऊन अभूतपूर्व यश मिळवत आहेत. मुख्य म्हणजे आजच्या या उद्योजकांना जागतिकीकरण, स्पर्धा इत्यादींची भीती वाटत नाही. उलट, पूर्वजांच्या सुरक्षित कोशांमधून आणि बंद किल्ल्यांमधून बाहेर पडून ते आज जगातल्या विविध कंपन्या धडाक्याने विकत घेत आहेत किंवा त्यांच्याशी आर्थिक-तांत्रिक सहकार्य करून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. आज येथील आयटी उद्योगाच्या विस्तारामुळे भारताला आशियातील सिलिकॉन व्हॅली मानले जाते ते उगीच नाही. यानंतर आपल्याकडे बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल सायन्स तसेच तंत्रज्ञानाच्या इतर बाबींमध्ये या नवीन ज्ञान आणि उद्योगशाखांचे विस्तारीकरण सुरू होईल. यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक क्षमता वाढेल आणि शिकलेल्या तरुण पिढीला रोजगाराची मोठी संधी निर्माण होईल. दर्जेदार व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रमाण वाढल्यास आणि सरकारी पातळीवरही पुरेसे प्रयत्न आणि वचनबद्धता दिसल्यास २०३० पर्यंत सर्वांना रोजगार मिळणेही शक्य होईल. अर्थात या फार मोठ्या संधीचा फायदा मिळवण्यासाठी मनोवृत्ती बदलावी लागेल. तसे न झाल्यास धोरणांच्या अंमलबजावणीतल्या संथपणामुळे लोकसंख्या हे देशापुढचे फार मोठे संकट ठरेल. एकीकडे शिकलेल्या लोकांना रोजगार मिळत नाही तर दुसरीकडे उद्योग-व्यापाराला योग्य माणसे मिळत नाहीत. हा आपल्या शिक्षणपद्धतीचा दोष आहे. आपल्या शिक्षणाचा ऱ्हास व्हायला कारण आहे ती इंग्रजांनी लादलेली व आपण अंगीकारलेली मेकॉलेची शिक्षणपद्धती. सांगकामे नोकर तयार करणाऱ्या या पद्धतीचा विकास इंग्रज राज्यकर्त्यांना या देशावर पिढ्यान्‌पिढ्या राज्य करता यावे यासाठी केला गेला. पाठांतरावर आधारित 'घोका आणि ओका' अशी ही पद्धत परीक्षार्थी विद्यार्थी आणि मर्यादित शिक्षण या पायावर उभी राहिली. पाठांतर न जमणारा या पद्धतीत मागे पडतो. यात कौशल्यविकासाला बिलकूल स्थान नाही.

गुगलच्या जमान्यात या पद्धतीला बिलकूल स्थान नाही. अधिक गुण म्हणजे उत्तम भविष्याची खात्री, या समीकरणाने गुणांचे कारखाने उघडले. मात्र, कौशल्यविकास तिथेच संपला. संकल्पना समजून घेणे मागे पडले. इंग्लंडची शिक्षणपद्धती मुख्यत्वे व्यावसायिक-कौशल्यकेंद्रित आहे. अमेरिकेतील शिक्षण विद्यार्थ्यांची चौकस मनोवृत्ती तयार करते. विद्यार्थ्याला तंत्रज्ञाच्या हाताखाली प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यामुळे त्याचे कौशल्य उच्च दर्जाचे असते. त्याला चांगले उत्पन्न आणि प्रतिष्ठा मिळते. जर्मन मालाच्या उच्च दर्जासाठी जर्मन डिझाईन आणि तंत्रज्ञान जितके कारणीभूत आहे, तितकेच तेथील कामगाराचे कौशल्य, कसब महत्त्वाचे आहे. अमेरिकन शिक्षणपद्धती कष्टाळू, बुद्धिमान आणि कर्तबगार लोकांना वाव देणारी आहे. कौशल्यप्राप्त कामगार मिळत नसल्यामुळे भारतातील मोठमोठे उद्योग, आऊटसोर्सिंग करून आणि सब-कॉंट्रॅक्ट देऊन आपले काम करून घेतात. या पृष्ठभूमीवर आता विद्यार्थी नोकरीला लागणारे सर्व ज्ञान आणि कौशल्य संपादन करूनच नोकरीत शिरला पाहिजे. उद्योगसमूहांनी आपले तज्ज्ञ, शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पाठवले पाहिजेत. त्यांनी आपल्या गरजा आणि आवश्यकता निर्देशित केल्या पाहिजेत. उच्च ज्ञान आणि कौशल्य अवगत करण्यासाठी त्या क्षमतेचे आणि ध्येयवादाचे शिक्षक नेमले पाहिजेत. अमेरिकन विद्यापीठातील शिक्षकांचा ६० ते ८० टक्के वेळ संशोधनात, संशोधन निबंध प्रकाशित करण्यात, नवीन अभ्यासात, पुस्तके लिहिण्यात जातो. ते उरलेला वेळ वर्गात शिकवण्यासाठी वापरतात.

शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र पुसण्याची आणखी एक पायरी आपल्याला ओलांडावी लागेल. शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झाल्यास शिक्षणाची किंवा शिक्षकाच्या दर्जाबाबतची फार मोठी चिंता तर मिटेलच, शिवाय शिक्षण देण्या-घेण्याच्या वेगामध्येही बदल होतील. येत्या काळात संगणकीकृत दूरशिक्षणाला मोठी मागणी येणार असून देशभरातल्या दूरदूरच्या हजारो विद्यार्थ्यांना वाजवी किमतीत उच्च शिक्षणाकडे वळणे शक्य येईल. शिकलेल्या लोकांचे आणि रोजगारांचे प्रमाण वाढले आणि त्यातून सर्वांना पैसा मिळू लागला की भारतातल्या एकंदर सामाजिक वातावरणात फरक पडेल. एकंदरीत, बदलत्या काळानुसार सर्व पातळ्यांवर नवी धोरणे ठरवून अंमलबजावणी केली तरच आपल्या देशाची वाढती लोकसंख्या संकट न ठरता वरदान बनेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

नंदकिशोर काथवटे

# जिओ-पॉलिटिक्स आणि भारत

भारत-पाकिस्तानमधील तणावाला पुन्हा एकदा उधाण आले आणि काही दिवसांतच लष्करी कारवायांच्या पृष्ठभूमीवर दोन्ही देशांमध्ये युद्धविरामाची घोषणा झाली. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' या मोहिमेद्वारे पाकिस्तानला कठोर संदेश दिला. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भारताने पाकिस्तानची शेकडो क्षेपणास्त्रे, ड्रोन्स निष्प्रभ केले. हे यशस्वी अभियान ठरले हे मान्य करावेच लागेल. परंतु, अचानक युद्धविरामाचा निर्णय घेतल्यावर राजकीय पातळीवर चर्चा सुरू झाली. या निर्णयामागे नेमके कारण काय? जागतिक दबाव, आर्थिक वास्तव, की भारताची स्वतंत्र सामरिक रणनीती? हाच आजच्या वादाचा केंद्रबिंदू आहे. जिओ-पॉलिटिक्स म्हणजे केवळ भूगोलावरून होणारी सत्ता-स्पर्धा नव्हे, ती म्हणजे अर्थकारण, संरक्षण, आंतरराष्ट्रीय आघाड्या आणि राजकीय हेतूंचा गुंता. भारतासारख्या उदयोन्मुख महासत्तेला प्रत्येक पाऊल मोजून टाकावे लागते. कारण एकीकडे चीन-पाकिस्तानची जवळीक वाढतेय, तर दुसरीकडे अमेरिका आणि पाश्चिमात्य देश भारताकडून शांततेची अपेक्षा ठेवत आहेत. त्यामुळे भारत कितीही सक्षम असला, तरी युद्ध लांबवणे म्हणजे स्वत:च्याच अर्थव्यवस्थेला घाव घालणे. या पृष्ठभूमीवर युद्धविराम अपरिहार्य ठरल्याचे स्पष्ट दिसते. तथापि, देशांतर्गत राजकारण वेगळ्याच पटावर खेळले जात आहे.



काँग्रेससह विरोधी पक्षांनी सरकारवर टीकेची झोड उठवली. प्रियांका गांधींनी संसदेत थेट प्रश्न विचारला, युद्धविरामाची घोषणा भारतीय पंतप्रधानांनी न करता अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी का केली? तसेच पहलगाम हल्ल्यात झालेल्या सुरक्षेच्या त्रुटींवर त्यांनी सरकारला धारेवर धरले. मरण पावलेले हे फक्त हिंदू किंवा मुस्लिम नव्हते, ते भारतीय होते, असे सांगत पीडितांच्या धर्मानुसार वर्गीकरण केल्याचा आरोपही त्यांनी केला. सरकारने या आरोपांना ठाम उत्तर देण्याचा प्रयत्न केला. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी स्पष्ट केले की युद्ध थांबवण्याचा निर्णय पूर्णपणे भारताचा होता आणि तो सामरिक उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर घेतला गेला. पंतप्रधान मोदींनीही या कारवाईतील यश संसदेत मांडले आणि शेकडो पाकिस्तानी क्षेपणास्त्रे व ड्रोन्स नष्ट केल्याची माहिती दिली. सरकारचा सूर स्पष्ट होता. भारत कोणत्याही परकीय दबावाखाली झुकणार नाही. मात्र प्रश्न उरतो जागतिक राजकारणाचा प्रभाव खरंच नव्हता का? या संदर्भात वास्तव सांगते की युद्ध म्हणजे केवळ रणांगणातील लढाई नसते. ती आर्थिक, कूटनीतिक आणि तांत्रिक स्तरावरील स्पर्धा असते. लांबलेले युद्ध भारतासाठी चलनवाढ, गुंतवणूकदारांचा विश्वास, आंतरराष्ट्रीय प्रतिमा यावर गंभीर परिणाम करू शकले असते. त्यामुळे अमेरिकेसह जगातील शक्तिशाली देशांकडून आलेल्या आवाहनांकडे भारताने दुर्लक्ष केले नसावे. हे मान्य केले, तरी अंतिम निर्णय हा भारतीय नेतृत्वाचाच होता, हे नाकारता येत नाही. काँग्रेसची टीका काही बाबतीत रास्त आहे. पहलगाम हल्ल्यात गुप्तचर यंत्रणा कुठे अपयशी ठरली याचा शोध घ्यावा लागेल. कारण अशा त्रुटी राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करतात. मात्र अमेरिकेच्या घोषणेवरून राजकीय वातावरण पेटवणे, हा विरोधकांचा थोडा अतिरेक वाटतो. कारण युद्ध केवळ देशभक्तीचा विषय नाही; तो वास्तववादी कूटनीतीचा भाग आहे. या संपूर्ण प्रकरणातून एक गोष्ट स्पष्ट झाली. भारत कितीही सक्षम झाला, तरी जिओ-पॉलिटिक्सच्या छायेतून कोणीही सुटू शकत नाही. जागतिक समीकरणे, सामरिक हितसंबंध आणि आर्थिक परिणाम लक्षात घेऊनच निर्णय घ्यावे लागतात. सरकारनेही विरोधकांच्या आरोपांवर फक्त प्रत्युत्तर देण्यापेक्षा पारदर्शक संवाद साधणे गरजेचे आहे. कारण शेवटी प्रश्न हा कोण जिंकले याचा नाही, तर देश सुरक्षित राहिला का, हे ठरवणे महत्त्वाचे आहे. युद्धात विजय आणि राजकारणात यश दोन्ही तात्पुरते असतात. परंतु दीर्घकाळ टिकणारा घटक म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा. म्हणूनच या घटनेतून धडा घेऊन भारताने भविष्यातील धोरण अधिक सशक्त करणे हेच खरे देशहित होय.

विरोधकांचा आवाज लोकशाहीत आवश्यक आहे, पण तो वास्तवावर आधारित असावा. सरकारनेही प्रश्न टाळू नयेत, तर स्पष्ट आणि ठोस पावले मांडण्याची गरज आहे. भारतातील जनतेसाठी सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा आणि त्यावर कुठलीही तडजोड नक्कीच देशाला परवडणारी नाही. हे देखील विरोधकांनी व सत्ताधाऱ्यांनी ध्यानात ठेवायला हवे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# आता तरी काँग्रेसचे डोळे उघडतील का?

संसदेत अखेर पहलगाम येथील अतिरेकी हल्ला तसेच त्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवणाऱ्या ऑपरेशन सिंदूरवर चर्चा झाली. संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी लोकसभा आणि राज्यसभेत या चर्चेला प्रारंभ केला. लोकसभेत या चर्चेचे उत्तर अपेक्षेप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले. मोदी यांनी आपल्या जवळपास दोन तासांच्या घणाघाती भाषणात विरोधकांच्या सर्व आक्षेपांचे आणि आरोपांचे मुद्देसूद निराकरण करत त्यांच्या आरोपातील हवा काढून घेतली. ऑपरेशन सिंदूरबाबत 'दुध का दुध पानी का पानी झाले'.

लोकसभेत गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्यासह सर्व वक्त्यांनी काँग्रेस आणि गांधी घराण्याचे शब्दश: वाभाडे काढले. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंपासून इंदिरा गांधी यांच्यासह आतापर्यंत झालेल्या काँग्रेसच्या सगळ्याच पंतप्रधानांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले, ते पाहता कुठून आपण ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी करत हात दाखवून अवलक्षण केले, असे आता काँग्रेस नेत्यांना वाटत असेल.

लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि प्रियांका वढेरा यांनी काँग्रेसचा किल्ला लढवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यांना गौरव गोगोई आणि अन्य काँग्रेस नेत्यांनी तशीच लेचीपेची साथ दिली. लोकसभेत राजनाथसिंह यांनी चर्चेची सुरुवात केल्यानंतर काँग्रेस पक्षातर्फे विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांनी बोलायला हवे होते, पण काँग्रेसने ती संधी गौरव गोगोई यांना दिली. काँग्रेसची पहिली चूक येथेच झाली. राहुल गांधी बोलले, पण त्याला उशीर झाला. राज्यसभेत राजनाथसिंह यांनी चर्चेला सुरुवात केल्यानंतर काँग्रेसतर्फे पहिले भाषण विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांचे झाले, तसे लोकसभेतही व्हायला हवे होते.

गौरव गोगोई यांच्या पत्नीला एका पाकिस्तानी एनजीओकडून वेतन मिळत असल्याचा तसेच त्यांची पत्नी आणि मुले भारतीय नागरिक नसल्याचा आरोप आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा यांनी करत खळबळ उडवली होती. तुम्ही १५ दिवसांसाठी पाकिस्तानात गेला होता का, अशी विचारणाही त्यांनी गौरव गोगोई यांना केली होती. त्यामुळे भाजपाला गोगोई यांना खिंडीत गाठण्याची आयतीच संधी मिळाली. गौरव गोगोई यांनी हिमंता बिस्व सर्मा यांचे आरोप फेटाळले. मी आणि माझी पत्नी पाकिस्तानी एजंट नसल्याचे सिद्ध झाले तर तुम्ही राजकारण संन्यास घेणार का, असे प्रतिआव्हान गोगोई यांनी दिले होते. या आरोप-प्रत्यारोपाचा संदर्भ देत तुमच्यासारखा मी वारंवार पाकिस्तानात जात नाही, असा टोला गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांना आपल्या भाषणात लगावला. गौरव गोगोई यांना या विषयावर भाषणाची पहिली संधी देत काँग्रेसने आपली बाजू कमकुवत करून घेतली, असे म्हणायला हरकत नाही.

खरं म्हणजे काँग्रेसकडे परराष्ट्र व्यवहार विषयातील तज्ज्ञ असलेले शशी थरूर आणि अन्य अनेक नेते होते. पण काँग्रेसने थरूर आणि मनीष तिवारी आदी नेत्यांना बोलण्याची संधी दिली नाही, म्हणण्यापेक्षा नाकारली, असे म्हणणे अधिक योग्य ठरले असते. काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी राज्यसभेत या विषयावर बोलल्या नाहीत. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी काँग्रेसची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. खडगे काँग्रेसमधील सर्वांत अनुभवी नेते आहेत, त्यांच्या भाषणात अनेक मुद्दे असतात, पण ते बोलताना अडखळतात, वक्तृत्व नसल्यामुळे त्यांना ते प्रभावीपणे मांडता येत नाही. त्यामुळे काँग्रेसची दोन्ही सभागृहांत गोची झाली. ऑपरेशन सिंदूरवर काँग्रेसचे मुख्य लक्ष्य पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह होते. पहलगाम अतिरेकी हल्ल्यासाठी जबाबदार असल्याचा आरोप करत काँग्रेस नेत्यांनी अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धबंदी मी घडवून आणली, असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेकवेळा केला. ट्रम्प यांच्या या दाव्याचा आधार घेत काँग्रेसचा मोदी यांना खिंडीत गाठण्याचा प्रयत्न होता. ट्रम्प यांच्या दबावात मोदी यांना युद्धबंदीची घोषणा करावी लागली, असा काँग्रेसचा आरोप होता. इंदिरा गांधींमध्ये होती, त्याच्या ५० टक्केही हिंमत पंतप्रधान मोदी यांच्यात असती, तर त्यांनी ट्रम्प यांना खोटारडे ठरवले असते, असे राहुल गांधी म्हणाले होते. मोदी सरकारमध्ये राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याचा आरोपही गांधी यांनी केला होता.

मोदी यांनी आपल्या भाषणात डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेता, अतिशय सफाईने त्यांचा दावा खोडून काढला. जगातील कोणत्याच नेत्याने ऑपरेशन सिंदूर थांबवण्यासाठी आपल्यावर दबाव आणला नाही, असे मोदी यांनी लोकसभेत स्पष्ट करत राहुल गांधी यांना त्यांची जागा दाखवली. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी काय असते, हे राहुल गांधी यांना समजत नाही, आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर बोलताना संयम आणि मर्यादा बाळगायची असते, हे राहुल गांधींना समजले असते, तर त्यांचा पक्ष मागील ११ वर्षांपासून विरोधी पक्षात बसला नसता.

मुळात राहुल गांधी आपल्या आजीचा जो दाखला देत आहे, त्या इंदिरा गांधींनी १९७१ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केल्यानंतर अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांना पत्र पाठवून पाकिस्तानवर आक्रमण थांबवण्यासाठी दबाव आणण्याची विनंती केली होती, अशी माहिती पुढे आली आहे. ३ डिसेंबर १९७१ ला पाकिस्तानने भारताच्या पश्चिमी सीमांवर हल्ला चढवला होता, त्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे ५ डिसेंबर १९७१ ला तेव्हा पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधींनी अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन यांना पत्र पाठवून संकटाच्या या परिस्थितीत हस्तक्षेप करण्याची विनंती केली होती. भारतातील सरकार आणि जनता आपल्याला विनंती करत आहे की, पाकिस्तानची अनियंत्रित आक्रमकता आणि दुस्साहसच्या भूमिकेपासून मागे येण्यासाठी अमेरिकेने आपल्या प्रभावाचा उपयोग केला पाहिजे. इंदिरा गांधी आणि रिचर्ड निक्सन यांच्यातील हा पत्रव्यवहार राष्ट्रीय अभिलेखागारात 'निक्सन प्रेसिडेन्शियल मटेरियल' या नावाने आजही उपलब्ध आहे. काँग्रेस नेत्यांना त्यांची लायकी दाखवण्यासाठी भाजपाने हा पत्रव्यवहार देशासमोर आणला आहे. काँग्रेस नेत्यांचे विशेषत: राहुल गांधींचे आरोप म्हणजे उचलली जीभ लावली टाळूला या प्रकारातील आधीही होते आणि आताही आहे. नेता तोच असतो, ज्याला युद्ध कधी थांबवावे, याचा अंदाज असतो. युद्धात तुम्ही जिंकले तरी अंतिमत: तुमचेही नुकसान होतच असते. कौरव आणि पांडवाच्या युद्धात पांडव जिंकले तरी शेवटी त्यांना आपले सर्वस्व गमावूनच विजय मिळाला होता. त्यामुळे कोणतेही युद्ध सुरू करताना आधी आपले उद्दिष्ट ठरवायचे असते, ते उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर युद्ध थांबवण्यात काही गैर नसते. उलट त्यातच देशाचे आणि देशातील जनतेचे व्यापक हित असते. यावेळी तर युद्धबंदीसाठी पाकिस्तानी लष्करच भारतीय लष्कराजवळ गयावया करत होते. भारताची ही लढाई पाकिस्तानातील अतिरेक्यांविरुद्ध आणि त्यांच्या नेत्यांविरुद्ध होती. भारताने पाकिस्तानातील अतिरेक्यांचे सर्व अड्डे आणि प्रशिक्षण शिबिरे उद्ध्वस्त केली. यात शंभरावर अतिरेकी मारले गेले, हे लक्षात घेतले पाहिजे.

९८८१७१७८१७

## तुळशीचे अनन्यसाधारण महत्त्व

तुळस ही हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानली जाते. भगवान विष्णू आणि इतर देवतांना तुळस प्रिय आहे त्यामुळे तिच्या पूजेला विशेष महत्त्व आहे. तुळशीत रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे गुणधर्म आहेत. तुळस घराच्या अंगणात किंवा परसबागेत तसेच आजकाल बाल्कनीत लावली जाते. ती लावल्याने घरात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते. या व्यतिरिक्तही तुळस हा आयुर्वेदात अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. याचे अनेक औषधी उपयोग आहेत. याच पृष्ठभूमीवर तरुण भारतच्या शताब्दीनिमित्त एक उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आपणही या सत्कार्याचा आदर करूया. आपल्या परिसरातील किंवा कोठेही मंदिर, मठ इत्यादी स्वच्छता मोहीम आणि तुळस लागवड उपक्रम राबविला जात आहे. त्यासाठी आपल्या घरात जास्तीत रोपे लावून मंदिर किंवा मठ येथे नेऊन द्यावीत. तेथे अधिक लागवड करण्यास प्रवृत्त करावे. हा उपक्रम पर्यावरण पूरक, धार्मिक आणि संस्कृतीची जपणूक करणारा आहे. तसेच नुसतीच लागवड करणे पुरेसे नाही तर त्याची काळजी घेणे आणि संवर्धन करणेही आवश्यक आहे. त्यायोगे आपण स्वच्छ, निरोगी वातावरण निर्मिती करूया तसेच सामाजिक कर्तव्य पार पाडू.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## सेलिब्रेशन असावे, अवडंबर नको!

भारतीय संस्कृतीत उत्सवांना विशेष महत्त्व आहे. प्रदेशानुसार वर्षभर निरनिराळे उत्सव, व्रतवैकल्ये करण्यात येतात. या सगळ्यांमध्ये चातुर्मासाला विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्रात आषाढी एकादशीपासून पांडुरंगाचे दर्शन घेऊन सुरू झालेला व्रतवैकल्यांचा महोत्सव पांडुरंगाला प्रिय असलेल्या तुळशी विवाहापर्यंत सुरू असतो. या सगळ्यांमध्ये भारतीय संस्कृतीचे उच्चतम दर्शन होते. आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, पोळा, गौरी-गणपती, महालय श्राद्ध, आश्विन नवरात्र, दसरा-दिवाळी इत्यादी सगळ्यांमध्ये ऋतू परिवर्तनासोबत होणाऱ्या मानवी जीवनाचा तसेच, निसर्गात होणाऱ्या बदलांचा विचार करून सणांची गुंफण केलेली आहे. या निमित्ताने मानवी स्वास्थ्य आणि नैसर्गिक स्वास्थ्य याचे संतुलन टिकून राहण्यासाठी अनेक निरनिराळ्या पद्धतीचे व्रत सांगितलेले आहे. परंतु, हल्ली या सगळ्यांकडे एका निराळ्या दृष्टिकोनातून बघण्यात येते. कोणी याला थोतांड समजून ते करू नका, यासाठी प्रपोगंडा करतात, तर कोणी आधुनिकतेचा आव आणून आरास, वेशभूषा, केशभूषा, अलंकार, याकडे फॅशनच्या दृष्टिकोनातून बघतात आणि उत्सवातील पारंपरिक पद्धती केवळ औपचारिकता म्हणून राहतात.

आपल्या व्रतवैकल्यांमध्ये खूप गहन आशय आहे. त्याचा अभ्यास करून त्यानुसार आचरण करण्याची गरज आहे. याचा अर्थ असा नाही की, आरास आणि अन्य गोष्टींकडे दुर्लक्ष करा, परंतु मूळ उद्देशापासून भरकटू नका. शास्त्र जाणून घ्या आणि शास्त्राला धरून आवश्यक ती प्रत्येक कृती करा, सेलिब्रेशन असावे, अवडंबर नको. एवढेच सांगणे आहे!

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

## वाचक पत्रे

## नरभक्षी वाघाने घेतला सहावा बळी

२९ जुलैच्या तरुण भारतात उपरोक्त बातमी वाचण्यात आली. गावातील नागरिकांचा वाघाने बळी घेतला अशा बातम्या पेपरमध्ये सातत्याने सध्या दिसतात. वाघाला जेरबंद करण्याकरिता वनविभागाने ठोस उपाययोजना केल्या नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. ग्रामस्थांना शेतात काम करणे व तेंदुपत्ता इत्यादी कामांकरिता जंगलात जावे लागते. तथापि, ग्रामस्थांमध्ये सध्या नरभक्षी वाघांमुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये पर्यटकांची वाढती गर्दी दिसते. मात्र त्याचवेळी तेथे मानव-वन्यप्राणी संघर्षही अत्यंत गंभीर होत आहे, असेही दिसते. मे महिन्यात एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यात १५ बळी गेले. तेंदुपाने तोडणाऱ्या महिलांपासून गुराख्यांपर्यंत अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. व्याघ्र संवर्धनाच्या यशाखाली दडलेली मानवी वेदना, सुरक्षिततेच्या अपुऱ्या उपाययोजना यामुळे ग्रामस्थांचा संताप वाढतो आहे.

चंद्रपूर हा व्याघ्र संरक्षण क्षेत्रात देशात आदर्श ठरलेला ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा जिल्हा. याची ही दुसरी बाजू मात्र दु:खद व अस्वस्थ करणारी आहे. एका बाजूला लाखो रुपये खर्च करून वाघ बघण्यासाठी येणारे पर्यटक आणि दुसऱ्या बाजूला वाघांचा बंदोबस्त करा अशी कळकळीची मागणी करणारे स्थानिक हा विरोधाभास चंद्रपूरचे वास्तव अधोरेखित करतो. वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या कुटुंबीयांना वनविभागाने आता दोन कोटी रुपये नुकसान भरपाई द्यावी अशी रोखठोक भूमिका माजी मंत्री राजेंद्र मुळक त्यांनी मांडली आहे. केवळ २५ लाख रुपये देत वनविभाग गरिबांची व शेतकऱ्यांची एकप्रकारे थट्टा करीत आहे असेही त्यांचे म्हणणे आहे. यावरून असे वाटते की व्याघ्र संवर्धनाचे फलित चुकलं का? माणूस चुकतोय की वाघ? की व्यवस्था? वाघाला दोष देणं सोप आहे, पण प्रश्न खोल आहे. कोण जबाबदार आहे या मृत्यूसाठी? वन उपजाचा अतिरेक होतोय का? आणि किती मृत्यूंची वाट बघायची? हे असे सुरू राहणार? की आपण काही शाश्वत उपाययोजना करू शकतो? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधून फक्त जंगलांच नव्हे तर माणसांचही रक्षण करणं, ही खरी व्याघ्र संवर्धनाची कसोटी आहे. वाघांची संख्या वाढली की माणसाने जंगलावर अतिक्रमण केले? की वाघांनी शहरावर अतिक्रमण केले. याचा विचार होऊन वाघांकडून नरबळींवर आळा बसला पाहिजे असे वाटते.

**शशिकांत दलाल**/ ९८२२३६५१९०

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लोकमंगल बँक, नाभिक संघटनातर्फे शनिवारी कर्ज विषयक मार्गदर्शन शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

लोकमंगल सहकारी बँक, श्री संत सेना नाभिक दुकानदार संघ सेवाभावी संस्था आणि नाभिक समाजातील सर्व संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नाभिक समाजातील व्यवसायिक व तरुणांसाठी शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात कर्ज विषयक योजना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले आहे, अशी माहिती अध्यक्ष अभयकुमार कांती यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी लोकमंगल बँकेचे मार्गदर्शक आ. सुभाष देशमुख, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापिका वृषाली लहारे, पर्यटन संचालनालयाचे प्रकल्प अधिकारी मयूर नांद्रे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. पंधरा लाख रुपयांपर्यंत कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या व्यवसायिकांसाठी आ. सुभाष देशमुख यांच्या वतीने लोकमंगल बँकेच्या माध्यमातून सोय केली आहे. या योजनेबाबत आ. देशमुख हे मार्गदर्शन करणार आहेत. नाभिक समाजातील तरुणांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत सेना नाभिक दुकानदार संघ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अभयकुमार कांती यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस शेखर कोंडापुरे, पांडुरंग पवार, मोहन जमदाडे, राजू शुक्लवार, भारत क्षीरसागर, सिद्राम रुद्रार आदी उपस्थित होते.



## महत्वाचे...

### मध्यवर्ती गणेश मंडळाच्या ट्रस्टीपदी मुधोळकर, फुटाणे

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

सार्वजनिक मध्यवर्ती श्री गणेशोत्सव मंडळाच्या नूतन ट्रस्टी पदी विष्णू मुधळकर आणि लता फुटाणे यांची निवड करण्यात आली. सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाच्या ट्रस्टींची बैठक सावरकर मैदान येथील वसंत पैलवान रसपान गृह येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली व मंडळाच्या दिवंगत झालेल्या सदस्यांच्या ठिकाणी नुतन ट्रस्टींची निवड करण्यात आली. लता विजयकुमार फुटाणे आणि विष्णु मुधोळकर यांचेही अनेक वर्षे मंडळास योगदान असल्याने त्यांची सर्वानुमते ट्रस्टीपदी निवड करण्यात आल्याची माहिती ट्रस्टी संजय शिंदे यांनी दिली. याप्रसंगी ट्रस्टी सुनिल रसाळे, दास शेळके, श्रीशैल बनशेट्टी, अनिल गवळी, गौरव जक्कापुरे, नंदकुमार उपाध्ये, मल्लिनाथ याळगी, सोमनाथ मेंडके यांची उपस्थिती होती




### सेवानिवृत्त प्राचार्य, प्राध्यापकांची शनिवारी सहविचार सभा

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

देशभरातील प्राचार्य व प्राध्यापक तसेच सरकारी कर्मचारी यांच्या पेन्शन विरोधात केंद्र सरकारने संसदेत फायनान्स अँक्ट २०२५ बहुमताने संमत केला आहे त्या कायद्यावर चर्चा करण्यासाठी असोसिएशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अँन्यूएड टीचर्स या संघटनेची सहविचार सभा शनिवार दिनांक २ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता संगमेश्वर कॉलेज सात रस्ता सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे सहविचार सभेत अन्यायकारक कायद्याचे स्वरूप तरतुदी या विषयावर संघटनेचे मार्गदर्शक प्राचार्य के एम जमादार अध्यक्ष प्राचार्य एम ए शेख केंद्रीय सहसचिव प्रा डॉ रवींद्र बीडकर डॉ तायडे मार्गदर्शन करणार आहेत तरी सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विभागीय सचिव प्रा उत्तमराव चौगुले यांनी केले आहे

### ८६ शिक्षकांना डॉ. चटोपाध्याय वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

जिल्हा परिषद सोलापूर मध्ये सध्या कर्मचारी यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम हे वेळेत काम करीत असल्यामुळे कर्मचाऱ्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे . सर्व संवर्गाची पदोन्नती वेळेत होत आहेत त्याचप्रमाणे अनुकंपा भरती प्रक्रीया उत्कृष्ट राबविले. बारा वर्षे झालेल्या ८६ शिक्षकांना डॉक्टर चटोपाध्याय वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर केल्याने शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नियमानुसार वेतनश्रेणी मंजूर केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील व शिक्षणाधिकारी कादर शेख यांचे शिक्षकांमधून कौतुक होत आहे.



# पंढरपुरातील पालवी संस्थेच्या मंगलताई शहा यांना सोलापूर विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर

## विद्यापीठ वर्धापनदिनानिमित्त विविध पुरस्कारांचे उद्या वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा यंदाचा प्रतिष्ठेचा व मानाचा जीवनगौरव पुरस्कार पंढरपूर येथील पालवी संस्थेच्या संस्थापिका श्रीमती मंगलताई शहा यांना जाहीर झाल्याची घोषणा कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वर्धापनदिनी दरवर्षी विविध पुरस्कार दिले जातात. यात सोलापूर ही जन्मभूमी, कर्मभूमी व ऋणानुबंध असणाऱ्या महनीय व्यक्तीस जीवनगौरव हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला जातो. यंदाच्या या जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी श्रीमती मंगलताई शहा या ठरल्या आहेत.

सामाजिक क्षेत्रात दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. पालवी संस्थेच्या माध्यमातून एचआयव्ही एडसग्रस्त अनाथ बालकांचे संगोपन व त्यांना शिक्षण देण्याचे महत्वपूर्ण कार्य मंगलताई शहा यांच्याकडून होत आहे. यानिमित्त विद्यापीठाच्या अधिकार मंडळाकडून जीवनगौरव पुरस्कार स्वीकारण्यासाठी त्यांना विनंती करण्यात आली, त्यांनी सदरील विनंती स्वीकारली आहे. रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शुक्रवार, दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यापीठाचा २१ वा वर्धापन दिन समारंभ साजरा होणार आहे. सकाळी आठ वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम कुलगुरू प्रा. महानवर यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या समारंभास मुख्य अतिथी म्हणून नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम, नवी दिल्लीचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे तर प्रमुख अतिथी म्हणून एचएसएनसी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला, आमदार श्री गोपीचंद पडळकर हे उपस्थित राहणार आहेत. तसेच यावेळी विद्यापीठाचेप्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिवडॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याचबरोबर विद्यापीठाच्या विविध पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते, त्यानुसार तज्ञ समितीने विविध पुरस्कारांची देखील निवड केली आहे. या ही पुरस्कारांचे वितरण शुक्रवारी होणार आहे. विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या सोहळ्याला विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, मंडळाचे सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेसाठी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, परीक्षा संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, सहाय्यक कुलसचिव सोमनाथ सोनकांबळे, जनसंपर्क अधिकारी राहुल वंजारे, डॉ. अंबादास भासके आदी उपस्थित होते.



**श्रीमती मंगलताई शहा**
सामाजिक क्षेत्रात योगदान

## शिवदारे सर्वोत्कृष्ठ महाविद्यालय



**डॉ.विजय आठवले**
(प्राचार्य पुरस्कार महाविद्यालय)



**डॉ.भाग्येश देशमुख**
(शिक्षक पुरस्कार महाविद्यालय)



**राजीव खपाले**
(शिक्षकेत्तर अधिकारी विद्यापीठ)



**डॉ.शिरीष बंडगर**
(शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यापीठ)



**डॉ. नवनाथ ताटे**
(शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यापीठ)



**राजेंद्र शंकर गिड्डे**
(शिक्षकेत्तर कर्मचारी महाविद्यालय)



**दत्ता भोसले**
(शिक्षकेत्तर कर्मचारी महाविद्यालय)



**डॉ. रेवप्पा कोळी**
(शिक्षकेत्तर कर्मचारी महाविद्यालय)




**व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स**
**(उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार)**

### जीवनगौरव पुरस्कार प्राप्त मंगलताईविषयी...



एचआयव्ही एडसग्रस्त अनाथ बालकांच्या संगोपनाकरता मंगलताई शहा यांनी २००१ मध्ये पंढरपूरमध्ये 'पालवी' नावाची संस्था स्थापन केली. दोन मुलांच्या प्रवेशापासून सुरू झालेली ही संस्था आता बहू अंगांनी विस्तारली आहे. संस्थेने या मुलांकरता स्वत:ची शाळा, गोशाळा सुरू केली आहे. एडसग्रस्त अनाथ बालकांबरोबरच अत्याचार पीडित कुमारी माता, मनोरुग्ण माता, विवंचनेने पीडित स्त्रिया यांचा तात्पुरता किंवा कायमस्वरूपी सांभाळ केला जातो. परित्यक्ता, विधवा, वृद्ध, मनोरूग्ण यांना आधार दिला जातो. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शिलाई काम, शेती काम, प्लंबिंग इत्यादी कामे त्यांना शिकवली जातात. याखेरीजही संस्थेतर्फे वंचितांकरता अनेक प्रकल्प राबवले जातात. मंगलाताईंनी प्रभा–हिरा प्रतिष्ठानच्या अंतर्गत 'पालवी' या संस्थेची स्थापना केली आहे. संस्थेचा असा विश्वास आहे की, जन्माला आलेली सर्व बालके समान आहेत आणि आरोग्य, शिक्षण, सुरक्षित आणि कलंकमुक्त वातावरणासह प्रेमळ, आनंदाने भरलेले बालपण हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे.

# सोलापूर काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी सातलिंग शटगार

● जिल्ह्यात काँग्रेस पक्ष बळकट करण्याचा मानस

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला बळकट करणार आहे. संघटना बांधणी व बूथ लेवलचे काम करून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे जास्तीत जास्त जागा निवडून आणणार असल्याची माहिती सातलिंग शटगार यांनी बोलताना दिले.

ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी के.सी.वेणुगोपाल यांनी महाराष्ट्रातील १३ अध्यक्ष पदांच्या निवडी जाहीर केल्या आहेत. त्यामध्ये सोलापूर जिल्हाध्यक्षपदी सातलिंग अण्णाराव शटगार यांची निवड करण्यात आली आहे. वर्षभरापासून काँग्रेस जिल्हाध्यक्ष पदाचा सुरू असलेला गोंधळ आता संपला आहे. जिल्हाध्यक्ष पदावर काँग्रेस पक्षाने लिंगायत चेहऱ्याला संधी दिली आहे. ज्येष्ठ नेते आणि मागील अनेक वर्ष जिल्हा प्रसिद्धी प्रमुख म्हणून काम पाहणारे सातलिंग शटगार यांच्या गळ्यात पक्षाने जिल्हाध्यक्ष पदाची माळ घातली आहे.




या पदासाठी नंदकुमार पवार यांच्यासह पंढरपूरचे प्रकाश पाटील, उत्तर तालुक्यातील सुदर्शन आवताडे, विजयकुमार हत्तुरे हे होते. पण पक्षाने सातलिंग शटगार यांना संधी दिली आहे. शटगार हे अक्कलकोट तालुक्यातील आहेत. आगामी जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी मोठी जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे.

# महापालिकेचे रुग्ण खासगी रुग्णालयात वळविल्याप्रकरणी दोन डॉक्टरांना नोटीस

- संबंधित आशा वर्करवरील कारवाईकडे आता लक्ष
- महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. माने यांची बेधडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

सोलापूर महापालिकेच्या प्रसूतिगृहांमध्ये तपासणीसाठी येणाऱ्या महिलांना प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयात वळविण्याचा प्रयत्न आशा वर्कर्स कडून होत असल्याचे उघडकीस आला आहे. याप्रकरणी दोन खाजगी डॉक्टर्सना नोटीस बजावण्यात आली आहे. या संबंधित आशा वर्कर्स यांच्यावरील कारवाईकडे आता लक्ष लागले आहे.

याप्रकरणी नवी पेठेतील श्रेयस हॉस्पिटलचे सुमित सुरवसे आणि श्रद्धा सुरवसे यांना रुग्णालयाची मान्यता रद्द करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. चार दिवसात त्याचा खुलासा देण्याची सूचना केली आहे. सोलापूर शहरातील सरकारी प्रसूतिगृहांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या महिलांना प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयात वळविणारी एक टोळी सक्रिय आहे. या टोळीने आशा वर्कर यांना विविध आमिषे दाखवून एक व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केला. या ग्रुपमधील काही आशा वर्कर्स कडून महिला रुग्णांना खाजगी रुग्णालयाकडे वळवण्याचा प्रयत्न झाला आहे.



नवी पेठेतील एक डॉक्टरांनी एक व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केला होता. या ग्रुपच्या माध्यमातून महिलांना खासगी रुग्णालयात आणण्याचे काम सुरू होते. या संदर्भात माहिती मिळताच महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी बेधडक कारवाई केली. या कारवाईतून कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. त्यानुसार डॉ. सुमित सुरवसे आणि श्रद्धा सुरवसे यांना नोटीस बजावली आहेत. त्यांचा खुलासा समाधानकारक नसेल तर त्यांची वैद्यकीय मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव सादर करणार येणार आहे. यात सहभागी असलेल्या आशा वर्करना नोटिसा देण्यात येणार असल्याचे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या कारवाईत आशा वर्करच्या नावे तयार केलेली पाकिटे, मनपा रुग्णालयात उपचार घेऊन खासगीत आलेल्या महिलांची तपासणीची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत उपचार मिळतात. माता आणि बालकांसाठी विविध योजना राबिवल्या जातात. अनुदान दिले जाते. खासगी रुग्णालयांत वारेमाप खर्च दाखवून गोरगरिबांचे आर्थिक शोषण होते. सरकारी वैद्यकीय सेवा गोरगरिबांपर्यंत पोहोचविण्याचे काम आशा वर्करच्या माध्यमातून केले जाते. या आशा वर्करला हाताशी धरून हा प्रकार सुरू आहे, असे डॉ. राखी माने यांनी सांगितले.

### २५ ते ३० आशा वर्करवर कारवाई होणार : डॉ. माने

महापालिकेचे एकूण ४०० अशा वर्कर आहेत. त्यापैकी २९४ आशा वर्करचा एक व्हाट्सअप ग्रुप आहे. त्यापैकी २५ ते ३० आशा वर्कर्स यांचा या प्रकरणाशी संबंध असल्याचा संशय आहे. या आशा वर्कर्स यांच्यावर महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे, असे डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जीवनाची व्यथा घालविणारी भागवत कथा होय: हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० जुलै-**

यथा, तथा ,सर्वथा, कथा या शब्दांचा विचार करताना इथे कथा हा शब्द फक्त कथा नसून कथामृत आहे, असे श्रीगुरु डॉ जयवंत महाराज बोधले यांनी श्रावणमास प्रवचनमालेच्या ५ सत्रामध्ये सांगितले. भागवत कथेमध्ये श्रवण भक्ती खूप महत्वाची असते. हे श्रवण करताना गुरुवाक्यावर विश्वास पाहिजे, स्वतःच्या ठिकाणी दिनता भावना पाहिजे, मनातील दोषांवर विजय मिळविता आला पाहिजे तसेच कथा श्रवण करताना बुद्धी स्थिर असली पाहिजे, असे महाराजांनी या प्रवचनात सागितले.



**श्रावणमास प्रवचनमाला**
**भाग - ५**

श्रवण करताना ३ प्रकारचे सांगितले जाते. एक 'अपातत; श्रवण' दुसरे 'अंग श्रवण' व तिसरे 'अंगी श्रवण' होय. यामध्ये अपातत; श्रवण म्हणजे सहज श्रवण घडणे होय. वास्तविक अध्यात्मामध्ये कोणतीही गोष्ट वाया जात नाही. त्यामुळे भागवताचे सहज श्रवण केले तरी फलदायी आहे. दुसरे अंग श्रवण म्हणजे लय,विक्षेप, कशाय, रसास्वाद या दोषांना घालवून केलेले श्रवण होय आणि अंगी श्रवण म्हणजे ऐकल्याबरोबर तत्स्वरुप होऊन जाणे. तुकाराम महाराज म्हणतात

**तुका म्हणे कानी ऐकली मात ।**
**तोचि झाला घात जीवपणा ।।**

ब्रह्मदेवांनी कथा ऐकली, देवर्षी नारदांनी कथा ऐकली, व्यास महर्षीनी कथा ऐकली, शौनकानी कथा ऐकली, पण या सर्वामध्ये राजा परीक्षितीने केवळ परम तत्वानुभूतिकरिता कथा श्रवण केली आहे. प्रारंभी भागवत महातम्यांमध्ये भगवान श्री कृष्णाला नमस्कार केला आहे. तो नमस्कार न मे इति नमः असा आहे म्हणजे हे माझे नाही असा भाव येणे हाच खरा नमस्कार होय. भगवान श्री कृष्ण हे विश्वाची उत्पत्ती ,स्थिती व लय करणारे आहेत. तसेच तिन्ही तापाचा त्रास नष्ट करणारे असे हे भगवान श्री कृष्ण आहेत, असे श्रीगुरु जयवंत महाराज यांनी स्पष्ट विचार मांडले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष- |
| दि. ३१ जुलै २०२५ | सीतला सप्तमी |
| विक्रम संवत् २०८२ | गोस्वामी तुलसीदास जयंती |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्‍वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. सप्तमी (२८.५७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - चित्रा (२४.४०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - साध्य (२८.३०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (१५.४७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल.

**वृषभ** : आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे.

**मिथुन** : आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल.

**कर्क** : आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

**सिंह** : महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या** : कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**तुळ** : जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे.

**वृश्चिक** : व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**धनु** : बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**मकर** : नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** : चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन** : उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# 'फॅबटेक'च्या राहुल मोरेची क्रोमवेल्ड कंपनीत निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३० जुलै-**

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील राहूल बापू मोरेची क्रोमवेल्ड इंडस्ट्रीज प्रा.लि. या कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट मधून निवड झाली असल्याची माहिती संस्थेचे सचिव डॉ.अमित रूपनर यांनी दिली. सदर कंपनी रासायनिक, औषधनिर्माण, कागद, जीवजंतू विज्ञान, तेल आणि वायू, वेस्ट वॉटर ट्रीटमेंट तसेच पॉवर क्षेत्रात कार्यरत आहे. ही निवड झाल्याबद्दल फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा. प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ. विद्यारणी क्षीरसागर, ट्रेनिंग अॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.धनंजय शिवपुजे, मेकॅनिकल इंजिनिअरींग विभाग प्रमुख प्रा. राहुल आवताडे यांनी राहुल मोरेचे अभिनंदन केले.

# बालकाच्या अपहरण प्रकरणी महिलेसह रिक्षाचालकास अटक

## आठ तासात शोधले बालकास; फौजदार चावडी पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

सिध्दरामेश्वर मंदीरासमोरील सिध्देश्वर प्रशालेजवळील स्टेशनरी दुकानासमोर आईच्या कुशीमध्ये झोपलेल्या चार महिन्याच्या बालकाचे अपहरण करणाऱ्या महिलेसह रिक्षाचालकास फौजदार चावडी पोलिसांनी अवघ्या आठ तासात शोधून अटक केली. शोध मोहिमेतील फौजदार चावडी पोलिसांचे पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी कौतुक केले.

मुन्ना अलीसाब शेख (वय २७, रा. हत्तुरे वस्ती, सोलापूर) आणि शबाना अमीन शेख (वय ३५, रा. हत्तुरे वस्ती, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत समिना निजाम शेख (वय ३०, रा. मस्साजोग, ता. केज, जि. बीड सध्या रा. सिध्देश्वर मंदीर परिसर फुटपाथ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रियान (वय ४ महिने) असे अपहरीत बालकाचे नाव आहे.

समिना ही फिरस्ती महिला तिची आई श्रीमती नौशाद, मुलगा सुलतान व लहान मुलगा रियान यांच्यासह सिध्देश्वर मंदीर परिसरातील फुटपाथवर राहते. समिना शेख फिरस्ती महिला असून मिळेल ते खाऊन पिऊन तिचा व तिच्या मुलांचा उदरनिर्वाह चालविते, २८ जुलै रोजी रात्री ११ च्या सुमारास सिध्देश्वर प्रशालेजवळील स्टेशनरी दुकानासमोरील फुटपाथवर समिना ही मुलांबाळासमवेत झोपली होती. तिचा चार महिन्याचा मुलगा रियान हा तिच्या कुशीत झोपला होता. परंतु, २९ जुलै रोजी सकाळी सहाच्या सुमारास रियान हा तिच्याजवळ नसल्याचे दिसून आले. त्यामुळे समिना हिने तिच्या मुलाचा मंदीर परिसरात सर्वत्र शोध घेतला. त्यावेळी तो मिळून आला नाही. त्यामुळे समिना शेख हिने फौजदार चावडी पोलिस ठाणे गाठून याबाबत पोलिसांना माहिती दिली.



त्यावेळी पोलिसांनी तात्काळ रियानच्या अपहरणाबाबत गुन्हा दाखल करून घटनास्थळावरील तसेच आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणाची तपासणी केली. त्यामध्ये एक संशयित व्यक्ती व महिला असे दोघे चार महिन्याच्या बालकास पळवून नेत असताना दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी चित्रीकरण जप्त करून चित्रीरणातील संशयितांचा शोध सुरू केला. पोलिसांनी खबऱ्यांना कामाला लावल्यानंतर चित्रीकरणातील दोन्ही व्यक्तींची माहिती मिळाली. त्यावरुन पोलिसांनी संशयित मुन्ना अलीसाब शेख (वय २७, रा. हत्तुरे वस्ती, सोलापूर) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने अपहरण केलेल्या चार महिन्याच्या रियानला शबाना अमीन शेख (वय ३५, रा. हत्तुरे वस्ती, सोलापूर) हिच्या घरामध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी लागलीच शबाना हिस ताब्यात घेऊन रियानला ताब्यात घेतले. फौजदार चावडी पोलिसांनी गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून तात्काळ तपासाची चक्रे फिरवून केवळ आठ तासामध्ये अपहरीत बालकाचा शोध लावून आरोपींना अटक केली. मुलगा रियान यास समिनाला दाखवताच तिचे अश्रु अनावर झाले व तिने पोलीसांचे शतशः आभार मानले. संशयित आरोपींनी बालक रियान यास कोणत्या कारणास्तव पळवून नेले आहे, याचा तपास पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त प्रताप पोमण, वरिष्ठ पोलिस निरीक्षक महादेव राऊत, पोलिस निरीक्षक तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शना खाली सहायक पोलिस निरीक्षक संजय क्षिरसागर, विजय जाधव, हवालदार प्रविण चुंगे, बडुरे, विनोद पुजारी, होटकर, खरटमल, तलवार, दराडे, घोडके, गळाकाटे यांनी केली.



# रक्तदानात सामाजिक सहभाग महत्त्वाचा

## राष्ट्रीय प्रचारक पद्मकुमार : डॉ. हेडगेवार रक्तपेढीस सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया तसेच अपघातग्रस्त रुग्णांना वेळेत रक्त मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी रक्तसाठा पुरेशा प्रमाणात असणे तितकेच गरजेचे आहे, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त रक्त संकलन शिबिराचे आयोजन करावे व गरजूंना मदत करावी असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा भारतीचे राष्ट्रीय प्रचारक पद्मकुमार यांनी केले. येथील डॉ. हेडगेवार रक्तपेढीस पद्मकुमार, वैभवश्री विषयाचे राष्ट्रीय विषय प्रमुख जी. पी. भद्रदास यांनी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी संपर्कप्रमुख धिरेन गाडा, उद्योगवर्धिनीचे मयंक चव्हाण व्यवस्थापक रंगनाथ जोशी उपस्थित होते. यावेळी जी. पी. भद्रदास यांनी डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या प्रत्येक विभागाला भेट देऊन पाहणी केली. अत्यंत उच्च प्रतीची सेवा तसेच आधुनिक तंत्रज्ञान आणि मशिनरीजमुळे रक्तपेढीचा नावलौकिक वाढला आहे असे त्यांनी सांगितले. रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी संगीता कोरे, रवी कोटा आणि सुशांत कुलकर्णी यांनी यावेळी प्रत्येक विभागाची माहिती दिली. जनसंपर्क अधिकारी सुनील हरहरे यांनी आभार मानले.

# श्री कपिल सिद्ध मल्लिकार्जुन पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**



पहिला श्रावण सोमवारी रात्री ०७:३० वाजता श्री मल्लिकार्जुन मंदिर मध्ये पालखी मिरवणूक उत्साहात पार पडण्यात आली श्री मल्लिकार्जुन मंदिरमध्ये संबळ, झांज, दिवुटगी, श्री मल्लिकार्जुन महाराजांची मूर्ती पालखी मध्ये ठेवून पुजारी हिरेहब्बू यांनी आरती केली आणि पालखी प्रदक्षिणेस सुरुवात करण्यात आली.

श्री मल्लिकार्जुन मंदिरास पाच फेरी मारून महाआरती करण्यात आली त्यानंतर प्रसाद वाटप करण्यात आले. सदर प्रसंगी राजशेखर हिरेहब्बू, धनेश हिरेहब्बू, मनोज हिरेहब्बू, विनोद हिरेहब्बू, जगदीश हिरेहब्बू, निलप्पा साबणे, बसवराज स्वामी, राजशेखर स्वामी, जयप्रकाश आमणगी, बसवराज उळाकडे, सुभाष सरसंबी,अशोक म्हेत्रे, अँड तिवाडी, बाळासाहेब दर्गोपाटील, गुरुनाथ कुदळे, प्रकाश पटणे, नागनाथ अवजे, राजा म्हेत्रे, ओंकार पाटील, बोराडे, विद्याधर कोंपल, गंगाधर कुडल, भैरोपाटील, मल्लिनाथ कुंभार, इरप्पा वस्त्रद, नागराज उणकी, निगफोडे, संजय साबणे इत्यादी भक्तगण उपस्थित होते.




# सिंहगड स्कूलमध्ये मेहंदी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

नागपंचमी निमित्त केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेजमध्ये महिला पालकांसाठी मेहंदी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला महिला पालक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेमध्ये विविध पारंपरिक व आकर्षक नक्षीकामाच्या मेहंदी डिझाईन्स सादर करण्यात आल्या. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. नागपंचमीनिमित्त वारुळाची पूजा केली. महिला पालकांसह मुलांच्या मनोरंजनासाठी संगीत खुर्चीसह झोक्याचे आयोजन केले होते. याचा मनमुराद आनंद घेतला. यावेळी परीक्षक म्हणून सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रा. मोहिनी नवले आणि अमृता रुईकर यांनी काम पाहिले. यातून तीन पालकांची निवड केली. विजेत्या स्पर्धकांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच व्याघ्र दिन आणि पर्यावरण जागृती निमित्ताने फेस पेंटींगचे आयोजन केले होते. झाडे लावा, पर्यावरण वाचवा, पाणी आडवा, पाणी जिरवा असे संदेश देत फेस पेंटींग करण्यात आले होते. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# निसर्ग संवर्धन दिनानिमित्त जिजामाता प्रशालेत 'एक पेड माँ के नाम' वृक्ष संवर्धनाचा प्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

इनरव्हील क्लबच्या माध्यमातून वृक्ष लागवड जिल्ह्यातील कोंडी या गावात जिजामाता प्रशाला येथे प्रत्येक विद्यार्थ्यांना एक झाड देऊन तसेच परिसरात वृक्ष लागवड करून एक पेड मा के नाम वृक्ष संवर्धनाचा प्रचार व प्रसार करण्यात आला.

यासाठी इको नेचर क्लबचे मुख्य प्रवर्तक व पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर यांनी देशी औषधी वृक्षाचे सहकार्य करून तसेच तेथील विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे धडे ही शिकवले व पर्यावरणाची शपथ उपस्थित व विद्यार्थी वर्ग यांनी घेतली तसेच सर्व मुलांना शैक्षणिक साहित्य पेन हे इनर व्हील क्लबच्या माध्यमातून वाटप करण्यात आले.




या शाळांना मोठ्या प्रमाणात मदत करत आलेली आहे. पर्यावरणासाठी झटणारे पर्यावरणदूत डॉ. मनोज देवकर हे सातत्याने प्रयत्नशील असतात इनरव्हील क्लबचे अध्यक्ष भारती पटेल व सेक्रेटरी दीप्ती देसाई यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी परिश्रम घेतले तसेच उपस्थित मुख्याध्यापक शिक्षक वर्ग यानेही वृक्ष संवर्धनाची जबाबदारी हाती घेतलेली आहे. यावेळी डॉ. अस्मिता पटेल, प्रतिभा कलंत्री, राजश्री कलंत्री, सुचिता थोबडे, नेहादरगड जय शाळा हेमा पटेल, सुनंदा शेंडगे, प्रीती राठी, शकुंतला मालपाणी, मीना शहा, शालिनी शर्मा, मंजुषा तोष्णीवाल सर्व इनरव्हील क्लब पदाधिकारी, मुख्याध्यापक चंद्रकांत कंटेलु, राजश्री धवन, अर्पणा चव्हाण, ज्योती प्रकाश गुंजले, विजयकुमार राजपुरे उपस्थित होते.



# मंगळागौर स्पर्धेत संस्कृती महिला मंडळाला द्वितीय क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.३० जुलै-**

श्रीपूर येथील संस्कृती महिला मंडळाच्या संघाने जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, सराटी (ता. इंदापूर) या संस्थेच्या वतीने श्रावण महिना व नागपंचमी उत्सव सणचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या नागपंचमी महोत्सव २०२५ उत्सवामध्ये मंगळागौरीची गाणी व खेळामध्ये उल्लेखनिय यश मिळवत द्वितीय कमांकाचे ११ हजारांचे बक्षिस व पारितोषीक पटकावले.

यामध्ये अनुपमा पंडीत, मंदा सावंत, पुजा पेंडसे, रोहीणी कुलकर्णी, गौरी मोकाशी, वर्षा पन्हाळे, मृदुला आगाशे, जयश्री सुतार, वैशाली देशपांडे, शुभांगी सुर्वे, वर्षा पाठक, मनिषा पाठक यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे परिक्षक म्हणून गीता कुलकर्णी यांनी काम पाहिले.

# हत्तूरच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही : आ. देशमुख

## ग्रामपंचायत कार्यालयाचे लोकार्पण व हत्तूररत्न पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

हत्तुर गावातील गुणीजणांचे कौतुक करून त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी हत्तूररत्न पुरस्काराने गौरव करणे, यामुळे ग्रामपंचायतीचे गुणिजनांबद्दल आपुलकी दिसून येते. शिवाय पुरस्कारामुळे गुणिजनांचेही समाजाप्रती उत्तरदायित्व निर्माण होते. म्हणून हत्तूर ग्राम पंचायतीच्या सरपंच ज्योती कुलकर्णी व त्यांच्या पदाधिकार्यांचे कार्य कौतुकास्पद आहे . भविष्यात हत्तूरच्या विकासासाठी निधींची कमतरता पडू देणार नाही. असे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.



हत्तूर येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण, गावातील गुणीजनांचा हत्तूर रत्न पुरस्काराने सत्कार व अंगणवाड्यांना कपाटाचे वाटप करताना आमदार देशमुख बोलत होते.

यावेळी शिलसिद्ध महाराज, सरपंच ज्योतीताई कुलकर्णी, बाजार समितीचे संचालक रामप्पा चिवडशेट्टी, माजी सभापती डॉ. चनगोंडा हविनाळे, जिल्हा चिटणिस यतिन शहा, भाजपाचे ज्येष्ठ नेते हणमंत कुलकर्णी, समर्थ पतसंस्थेचे संस्थापक राजेंद्र कुलकर्णी, सदस्य सर्जेराव बन्ने, मारुती कुंभार, तात्यासाहेब कुलकर्णी, विश्वनाथ पाटील, सुनंदा पाटील, विजय राठोड, चांदभाई चव्हाण, साहिरा अत्तार, सूर्यकांत सावंत, बनसिद्ध पट्टेवडियर, प्रशांत सलगरे, भीमाशंकर सतूबर, राजशेखर सलगरे, भीमाशंकर कनपवडियार उपस्थित होते. राजेंद्र कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सिद्राम म्हेत्रे यांनी केले. तेजस्विनी पाटील यांनी आभार मानले.

**यांचा हत्तूररत्न पुरस्काराने सन्मान**

डॉ. शिलसिद्ध महाराज, सिद्राम गुरव, शांतप्पा सलगरे, भीमाशंकर व्हनमाने, अॅड. केदार डोळ्ळे, बासू राठोड, बाबू चव्हाण, सोमनाथ कोळी, राघवेंद्र पाटील, बापूराव उपासे, शिवशंकर म्हेत्रे, महादेव बोळ्ुरे, महांतप्पा सीताफळे, सुनील पाटील, सिद्राम नाईकवाडे, रुक्मिणी सिनेवडियार, भाग्यश्री जनगे, कांचन कुंभार, रेखा नाईकवाडे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### एकता महिला मंचच्या वतीने भांडेगाव येथे नागपंचमी साजरी

**वैराग, दि. ३० जुलै-**

एकता महिला मंचच्यावतीने भांडेगाव येथे नागपंचमीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन एकता महिला मंचच्या प्रभावती साबळे, पूजा भोसले, स्वाती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार एकता महिला मंचच्या वतीने करण्यात आला यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाग्यश्री शिंदे, मनीषा मंडलिक, सोनाली शिंदे, भाग्यश्री सौदागर, शीतल काकडे, सुप्रिया सौदागर, उषा काकडे, आशा पवार, रुपाली पवार, स्वाती काकडे, पूजा मंडलिक,आशा मंडलिक, अर्चना जाधव, सुमन जाधव, वर्षा सावंत, प्रतीक्षा जाधव,चंद्रकला शिंदे, शामल आवटे, हिराबाई मंडलिक, विमल पवार, निर्मला नवले, मीरा शिंदे, वैशाली डिसले, रुंदावणी शिंदे, निर्मला सवार, सोनाली मंडलिक, दिलषाद सय्यद, अनिता शिंदे, मंगल घायाळ उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक स्वाती शिंदे यांनी केले तर आभार आशा मंडलीक यांनी मानले.




### एकरुख जि.प. शाळेत वह्या वाटप

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप माने यांनी उत्तर सोलापूर तालुक्यास विकासाच्या शिखरावर नेले. बळीराजाच्या न्यायासाठी ते सदैव पुढे असतात.त्यांचा वाढदिवस हा विधायक उपक्रमातून साजरा केला जात असून, एकरुख येथील कार्यकर्त्यांनी शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करून वाढदिवस उपक्रमाचा श्रीगणेशा केल्याचे माजी उपसभापती संभाजी भडकुंबे यांनी सांगितले. एकरुख येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना लहू भोरे,अभिजीत भोरे, नवनाथ चव्हाण व मित्र मंडळाचे वतीने वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मार्डी सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब पाटील होते.यावेळी राळेरास सरपंच नागनाथ माने, चेअरमन नेताजी डांगे उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक श्याम पाटील यांनी केले.



### वीरशैव व्हिजनतर्फे सूर्यकांत भुजबळ यांचे स्वागत

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी नुकतेच सूर्यकांत भुजबळ रुजू झाले त्यानिमित्त वीरशैव व्हिजनतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. ते धाराशिव जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत होते. तेथून त्यांची सोलापूर जिल्ह्यात बदली झाली आहे. यापूर्वीही त्यांनी सोलापूर जिल्ह्यात सेवा बजावली आहे. यावेळी वीरशैव व्हिजन उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांचे चरित्र भेट देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी वीरशैव व्हिजन संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, सहसचिव संजय साखरे, विश्वस्त सोमेश्वर याबाजी, सहकार्याध्यक्ष राजेश नीला, सोशल मीडिया प्रमुख अमित कलशेट्टी, कार्यकारणी सदस्य श्रीमंत मेरू, धानेश सावळगी व गंगाधर झुरळे उपस्थित होते.



### प्रमोद कापसेंची राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती

**वैराग, दि. ३० जुलै-**

सामाजिक, शैक्षणिक व कृषी क्षेत्रात कार्यरत प्रमोद कापसे यांची जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील कृषी पदवीधरांच्या संघटनेचीही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांचे आभार मानले असून, उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या दृष्टिकोनातून ठसा उमटवण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल जिल्ह्यातून अभिनंदन केले जात असून जवळगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# विंचूर-भंडारकवठे शिवरस्त्यावर शेतकऱ्यांचा कब्जा?

## महसूल विभागाची बघ्याची भूमिका; काहींचा आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील विंचूर-भंडारकवठे शिवरस्त्यावर काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण करून इतर शेतकऱ्यांची वाट बंद केली आहे. त्या शेतकऱ्यांनी शेतजमीनींकडे जाणारा शिवरस्ताच गिळंकृत केला आहे. शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, उपविभागीय अधिकाऱ्यांपासून ते थेट तहसिलदारांपर्यंत सर्वांकडे लेखी व तोंडी तक्रारी केल्या, पण त्याचा काहीही फायदा झाला नाही. सरकारी यंत्रणेच्या हलगर्जीपणामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी आता मंद्रूप अप्पर तहसिल कार्यालयासमोर कुटुंबासह आत्मदहनाचा इशारा दिला आहे.



दक्षिण तालुक्यातील भंडारकवठे, शंकर नगर तांडा , विंचूर ते तेलगावच्या शिवेवर ३३ फुटांचा रस्ता होता. गेल्या ५० वर्षांपासून शेतकरी या रस्त्याचा वापर करीत होते. हा रस्ता या भागातील इतर शेतजमीनींकडे जातो. मात्र, गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून काही शेतकऱ्यांनी हा शिवरस्ता नांगरून रस्त्याचे शेतात रुपांतर करून पिक पेरणी सुरू केली आहे. काही शेतकऱ्यांनी रस्ताचा कब्जा केल्याने इतर शेतजमीनींकडे जाणारी वाटच बंद केली आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांना शेतात जाणे अवघड झाल्याने शेती पडीक पडली आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यावर काही शेतकऱ्यांनी कब्जा केल्याने इतर शेतकऱ्यांच्या मूलभूत अधिकारावर गदा येत आहे. हा रस्ता शेतकऱ्यांच्या सोयीसाठी बनवण्यात आला होता. 'आमचा रस्ता आम्हाला द्या' म्हणत अनेक शेतकरी चार वर्षांपासून विविध कार्यालयात चकरा मारत आहेत. सार्वजनिक वापराचा हा रस्ता काही शेतकरी ताब्यात घेऊन मालकी हक्क गाजवत आहेत. मुळात हा रस्ता शासनाच्या मालकी हक्काचा आहे. शासनाने अशा रस्त्यांच्या देखभालीची जबाबदारी महसुल व्यवस्थापनाकडे सोपवली आहे. ग्रामस्थांच्या सुविधेसाठी असलेल्या अशा रस्त्यांवरील अतिक्रमणे तत्काळ काढण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाने महसूल विभागाला दिले आहेत; मात्र या प्रकरणात तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, मंडळ अधिकारी व तलाठी मूग गिळून गप्प आहेत. यामुळे शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे.

### वीज खंडित झाल्याने शहराचा पाणीपुरवठा एक दिवस उशिरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

पाकणी जलशुद्धीकरण केंद्राचा वीजपुरवठा बुधवारी खंडित झाल्याने शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. शहराचा पाणीपुरवठा एका रोटेशनसाठी एक दिवस उशिरा होणार आहे, अशी माहिती

महापालिकेचे प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता सतीश एकबोटे यांनी दिली. सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या पाकणी जलशुद्धीकरण केंद्रास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून होणारा विद्युत पुरवठा दि. ३० जुलै रोजी सकाळी ११ ते रात्री ७ वाजेपर्यंत खंडित झालेला होता. त्यामुळे उजनी व पाकणी येथून पाण्याचा उपसा होऊ शकला नाही. या कारणामुळे उजनी पाईप लाईनवरील व भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्र वरून अवलंबून असलेल्या परिसराचा पाणीपुरवठा एका रोटेशनसाठी एक दिवस पुढे जाणार आहे. त्यामुळे नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे प्रभारी सार्वजनिक आरोग्य अभियंता सतीश एकबोटे यांनी केले आहे.

### भैय्या चौक येथे अलदर यांनी पकडला विषारी नाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

एन. जी. मिल कंपाऊंड येथील गांधी कॉलनी, भैय्या चौक येथे दुपारी दीड वाजता वैभव निंबाळकर यांच्या घराच्या पायरीवर नागाच्या पिल्याने दर्शन दिले.



वैभव निंबाळकर यांच्या मुलाने चप्पल सोडताना पायरीवर फुस्कन असा आवाज आला त्यावेळेसच अचानक कुठून आवाज आला पाहताच विषारी नागाचे पिल्लू दिसले. आजूबाजूला कॉलनीतले लोकांनी बघायचे गर्दी केली लगेच तात्काळ निंबाळकर यांनी नाग फाउंडेशनचे अध्यक्ष व सर्पमित्र अनिल अलदर यांना फोन केला सर्पमित्र अनिल अलदर यांनी तात्काळ पाच मिनिटात धाव घेऊन विषारी नागास पकडले. विषारी नागाच्या पिल्ला जमलेल्या महिलांनी हळद-कुंकू घेऊन पूजन करण्यासाठी आले होते. पण अलदर यांनी सापाबद्दल गैरसमज व अंधश्रद्धा दूर केली. उपस्थित जमलेल्या महिलांना व लोकांना नागपंचमीच्या दिवशी जिवंत नागाचे दर्शन झाले.

सर्पमित्र आलदर तुम्ही आलात व सापास पकडून जीवदान दिले. व अभार व्यक्त केले. अलदर यांनी पकडलेल्या सापास निसर्गाच्या साधनात सोडून देण्यात आले.




### लोटेवाडी ग्रामपंचायतच्या सरपंचपदी नकुसा लवटे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२९ जुलै-**

लोटेवाडी, ता.सांगोला ग्रामपंचायतच्या दिपाली लवटे यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त जागेसाठी निवडणूक पार पडली. यावेळी शिवसेनेच्या नकुसा मधुकर लवटे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली.

यावेळी नामदेव लवटे, हिराबाई सरगर, दिपाली लवटे, विजय खांडेकर, सत्यवान देशमुख, शांताबाई चव्हाण हे सदस्य उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मंडल अधिकारी विकास जाधव, ग्रामसेवक समाधान आदाटे यांनी काम पाहिले. याप्रसंगी सागर लवटे, सुनील देशमुख, दादासाहेब लवटे, आबासाहेब माने, राजू हजारे, बिरुदेव हजारे, चैतन्य जावीर, ऋषिकेश गवळी, देवदास लवटे, भगवान शेंबडे, अगतराव देशमुख, प्रकाश देशमुख, तानाजी सरगर, सुरेश सावंत, अण्णा मोरे, नीरज ढेरे, विलास विभुते, सदाशिव सावंत, अनिरुद्ध गवळी, पांडुरंग मोटे, अशोक सातपुते, दादासाहेब सातपुते, बापूसाहेब लवटे, नवनाथ कुंभार, गणेश कोळेकर, शशिकांत लवटे, ज्ञानू लवटे, सुधाकर लवटे, संतोष कोळेकर, बाळाराम लवटे, रमेश लवटे, विक्रम सातपुते, भीमराव लवटे, माणिक काटे, शहाजी देशमुख, आप्पा सरगर, बाबुराव मोरे, विठ्ठल पवार, रूपाली लवटे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### डॉ. बोटे किडनी केअर सेंटरमध्ये १५४ रुग्णांची मोफत तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० जुलै-**

येथील डॉ. बोटे किडनी केअर सेंटर येथे द्वितीय वर्धापन दिनानिमित्त मोफत मूत्र रोग तपासणी, लठ्ठपणा व मधुमेहासाठी आहार मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी सुमारे १५४ रुग्णांची मुतखडा ,प्रोस्टेट व लघवीच्या आजारांसंबंधात तपासणी करण्यात आली व उपचार मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये ९८ पुरुष रुग्ण, ४७ स्त्री रुग्ण व ९ लहान मुले यांचा समावेश होता.

लघवीचे आजार असणाऱ्या ५८ रुग्णांची युरोफ्लोमेट्री तपासणी मोफत करण्यात आली. प्रोस्टेटचे आजार असणाऱ्या ४७ पुरुष रुग्णांची पीएसए टेस्ट मोफत करण्यात आली. १५ रुग्णांना लठ्ठपणा व डायबिटीस साठी डॉ नलिनी बोटे, आहार तज्ञ यांनी जीवन शैलीमध्ये बदल व आहार यासाठी मार्गदर्शन केले. शिबिरासाठी डॉ. बोटे किडनी केअर सेंटरच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

शिबिरामधील रुग्णांची तपासणी डॉ. सचिन बोटे (एमसीएच युरो सर्जन) यांनी केली. या उपक्रमाद्वारे ग्रामीण व शहरी भागातील रुग्णांना तज्ज्ञांचा सल्ला आणि तपासणी मोफत मिळाल्याने समाजोपयोगी आरोग्य सेवा देण्याचे कार्य या वर्धापन दिनानिमित्त प्रभावीपणे पार पडले.

### जेऊर-पुणे मार्गासाठी सीझन तिकिटे सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

मध्य रेल्वेने सोलापूर विभागातील जेऊर आणि पुणे स्टेशन दरम्यान नियमित प्रवाशांना परवडेल असा उपक्रम हाती घेतला आहे. १ ऑगस्ट २०२५ पासून ते ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सहा महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर जेऊर-पुणे मार्गासाठी सीझन तिकिटे सुरू केली आहेत. दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मागणी पूर्ण झाली असून ज्यामुळे त्यांना किफायतशीर आणि त्रासमुक्त प्रवास पर्याय उपलब्ध झाला आहे. सीझन तिकिटे दैनंदिन प्रवास खर्चात लक्षणीयरीत्या घट करतात, जलद तिकीट सुविधा सुनिश्चित करतात आणि काम, शिक्षण किंवा इतर दैनंदिन गरजांसाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अधिक फायद्याचे ठरते. हि तिकिटे रेल्वे स्थानकावरून काढून घेता येतील. तसेच जेऊर मधील प्रवाशांना आता या सुविधेचा लाभ घेता येईल. तरी या मार्गिकेवर दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांची याच लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

### डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विविध कर्यक्रम

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.३० जुलै-**

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त येथील साठे नगरमधील डॉ.अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाच्यावतीने शुक्रवार दि.१ ऑगस्टपासून मंगळवेढयात विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती अध्यक्ष आकाश अवघडे, मार्गदर्शक मल्हारी कांबळे व खंडू खंदारे यांनी दिली.



शुक्रवारी दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता साठेनगर येथे प्रतिमेचे पूजन आ.समाधान आवताडे यांच्या हस्ते, माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली होत असून यावेळी प्रांताधिकारी बी.आर.माळी, तहसीलदार मदन जाधव, मुख्याधिकारी चरण कोल्हे, तलाठी दिनेश सोनूने, श्री संत दामाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.औंदुबर जाधव, तालुका कृषी अधिकारी मनिषा मिसाळ-जाधव, दुय्यम निबंधक व्ही.बी. राऊळ, उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, जतचे गटविकास अधिकारी आनंद लोकरे, गटविकास अधिकारी जास्मिन शेख, पाणी पुरवठा विभागाचे उपविभागीय अधिकारी प्रसाद काटकर, गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता, विस्ताराधिकारी डॉ.बिभिषण रणदिवे आदी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११ वाजता साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे पुरस्कार वितरण सोहळा धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांच्या हस्ते व जकराया शुगर्सचे कार्यकारी संचालक सचिन जाधव यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी डॉ. शितल शहा, पत्रकार बाळासाहेब नागणे, शिवाजी सलगर, सोमा अवघडे, धोंडिबा साखरे,नामदेव अवघडे, सारिका सलगर, हैदर केंगार, हिरालाल तांबोळी, मारुती दवले, गैबी उर्फ आबा पाराध्ये तसेच वारी परिवार, मंगळवेढा यांना सन्मानित करण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.सुजीत कदम यांच्या हस्ते उद्योजक वैभव नागणे यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ७ वाजता तिप्पेहाळ्ळी (ता.सांगोला) चे संदिप मोहिते व आण्णा चव्हाण यांचे जुगलबंदी भारूडाचा कार्यक्रम होईल. हा कार्यक्रम भैरवनाथ शुगर्सचे व्हा. चेअरमन अनिल सावंत यांच्या हस्ते माजी पालकमंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली रतनचंद शहा सहकारी बँकेचे चेअरमन राहुल शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

शनिवार दि.२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता साहित्यरत्न डॉ. आण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन विठ्ठल शुगर्सचे माजी चेअरमन भगिरथ भालके यांच्या हस्ते, दामाजी शुगर्सचे चेअरमन शिवानंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, व्हा.चेअरमन तानाजी खरात यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. दुपारी ३ वाजता प्रतिमेची मिरवणूक निघणार असून खरेदी विक्री संघाचे चेअरमन सिध्देश्वर आवताडे यांच्या हस्ते उदघाटन होत असून अध्यक्षस्थानी सोमनाथ आवताडे तर प्रमुख अतिथी म्हणून सांगोल्याचे मा.उपनगराध्यक्ष प्रशांत धनवजीर उपस्थित राहणार आहेत. डी.जे,एम.के लाईट, पंढरपूर तसेच सांगलीचा सिध्दनाथ बँड हे मिरवणूकीचे प्रमुख आकर्षण आहे. साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव मंडळ, साठेनगर, मंगळवेढाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

## काशीची पुण्यप्राप्ती देणारे स्वयंभू तीर्थराज संगमेश्वर महादेव मंदिर

**श्रावण विशेष**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३० जुलै-**

प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या, नीलकंठा व भोगावती नद्यांच्या संगमावरती विराजमान असणारे , श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, काशीचे पुण्यप्राप्ती देणारे प्राचीन हेमाडपंथी स्वयंभू तीर्थराज संगमेश्वर महादेव मंदिर म्हणजे शिवभक्तांचे अलौकिक श्रद्धास्थान होय.

बार्शी तालुक्यातील घाणेगाव व साकत या दोन गावांच्या शिवेवरील संगमावरती विराजमान असणारे संगमेश्वर महादेव मंदिराचे अलौकिक वैशिष्ट्य म्हणजे काशी विश्वनाथ याप्रमाणे स्वयंभू महादेवाच्या मूर्ती समोर नंदी बरोबरच बुद्धीची देवता गणपतीची मूर्ती विराजमान आहे. हेमाडपंथी असणाऱ्या या मंदिराचा इतिहास सांगताना यादवकालीन मंदिर असल्याचे आख्यायिकातून बोलले जाते. प्रभू रामचंद्र वनवासात असताना या परिसर वास्तव्यास होते असे सांगितले जाते. मंदिराच्या सभोवताली पाच महादेवाच्या भव्य पिंडी आहेत. मंदिराची काही प्रमाणामध्ये पडझड झालेली आहे. पुरातत्व खात्याकडून या मंदिराकडे दुर्लक्ष असले तरी शिवभक्तगणाच्या सहकार्यातून मंदिर जीर्णोद्धाराचे काम



सध्या हाती घेण्यात आले आहे. उज्जैन ओंकारेश्वर येथून दरवर्षी गुरु पौर्णिमेला शिवभक्त कावड घेऊन पायी चालत येत नागपंचमीच्या पूर्वसंध्येला तीर्थक्षेत्र संगमेश्वर महादेवाचा जलाभिषेक केला जातो. श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी येथे मोठा उत्सव साजरा होतो. तर सायंकाळी संगमावरील नदी किनारी काशी क्षेत्र समान गंगारती करण्यात येते आहे. वर्षभर दर सोमवारी सायंकाळी सवाद्य शाही आरती व महाप्रसादाचे आयोजन शेकडो शिवभक्तांकडून केले जात आहे. या मंदिरातील शिव दर्शन पुण्यमहात्म्याची नोंद काशी, मथुरा, उज्जैन, त्र्यंबकेश्वर आदी ठिकाणी ऐकावयास मिळते आहे.

मंदिराचे पुजारी हे पंचदशहम आवाहन आखाडाचे शिष्य व संन्यासी सरस्वतीनंद पुरी महाराज हे या मंदिर परिसर निवासी असून संगमेश्वर महादेवाची पूजा विधी करण्याचे काम करत आहेत. हे प्राचीन मंदिर साकत येथील शेतकरी दत्ता मोरे व विलास मोरे यांच्या वडिलोपार्जित शेतातस्थित आहे.

ऋषिकेश घेवारे, दीपक खंदारे, सुमंत मोरे, दीपक बचुटे, शशिकांत मोरे, जयराम मोरे, लक्ष्मण मोरे, कैलास अडसूळ, भास्कर खटाळ, परमेश्वर वाघ, भारत बावकर हे नित्यनेमाने सेवेकरी शिवभक्त म्हणून काम पाहत आहेत.संगमावरील घाणेगाव, साकत व वैरागसह परिसरातील गावातील शिवभक्त या ठिकाणी दर्शनासाठी मोठी गर्दी करतात.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## डॉ झंवर यांचा अन्नछत्र मंडळातर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० जुलै**

सोलापुरातील वैद्यकीय क्षेत्रातील नामवंत जेष्ठ डॉक्टर प्रेम झंवर यांचा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिवसेना जिल्हा प्रमुख अमोल बापू शिंदे, शैलेश दादा पिसे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, संजय ऊर्फ लाला राठोड, शिरीष पाटील, स्वामीनाथ गुरव, मैनुद्दीन कोरबु व सत्कारमूर्ती श्री व सौ व डॉक्टर प्रेम झंवर उपस्थित होते.



## महत्त्वाचे



### पैठणचे आमदार भुमरे यांचा अन्नछत्र मंडळात सत्कार

**अक्कलकोट, दि. ३० जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून दररोज हजारो भक्तांना महाप्रसाद दिला जातो ही बाब उल्लेखनीय तर आहेच याबरोबच अन्नछत्र मंडळाचा संपूर्ण परिसर हा भक्ती, मंगलमय व प्रसन्नता असल्याचे मनोगत पैठणचे आमदार विलासबापू भुमरे यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या समवेत पिंटू भाऊ रोचकरी तुळजापूर आदीजन उपस्थित होते. यावेळी न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, सौरभ मोरे, वैभव मोरे, अतिश पवार, निखील पाटील, प्रवीण घाडगे, पिंटू दोडमनी, विजय माने, शुभम सावंत, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, सचिन स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, राहुल इंडे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण उपस्थित होते.

### श्रावण महिन्यानिमित्त उत्तरेश्वर मंदिर येथे 'भक्तिधारा'चे आयोजन

**बार्शी, दि. ३० जुलै-**



येथील श्री स्वामी समर्थ संगीत क्लासेस आणि श्री उत्रेश्वर देवस्थान ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने श्रावण महिन्यातील रविवार दि. ३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत श्री उत्रेश्वर मंदिर येथे 'भक्तिधारा' या सुमधूर अभंग आणि भक्तिगीतांच्या सुरेल मैफिलीचे आयोजन करण्यात आले असून संगीत सेवेचे हे २५ वे वर्ष असल्याची माहिती क्लासच्या संचालिका दिपाली सहस्त्रबुध्दे यांनी दिली. अभिजात शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी श्री स्वामी समर्थ संगीत क्लासेसच्या वतीने अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सर्व रसिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### राहुल गांधींना खूश करण्यासाठी प्रणिती शिंदे यांचे देशद्रोहीपणाचे वक्तव्य : केदार-सावंत

**सांगोला, दि. ३० जुलै-**



पहेलगाम हल्लयात अनेक भगिनींच्या कपाळावरील सिंदूर पुसण्यात आले. त्याला प्रत्युतर म्हणून भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर ही मोहिम हाती घेतली. या मोहिमेची माहिती सांगण्यासाठी सोफिया कुरेशी यांची लष्कराच्या वतीने नियुक्ती करण्यात आली. या भारतीय लष्काराने केलेल्या ऑपरेशन सिंदूर मोहिमेचे संपूर्ण देशाने समर्थन केले. भारतीय लष्कराच्या ऑपरेशन सिंदूरचे सर्वपक्षीयांकडून स्वागत करण्यात आले होते. केवळ राहुल गांधी यांना खूश करण्यासाठी, त्यांच्यासमोर चमकोगिरी करण्यासाठी प्रणिती शिंदे यांनी देशद्रोहीपणाचे वक्तव्य केले असल्याची टीका भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी केली. पहेलगाम प्रकरणावरून मंगळवारी संसदेत सोलापूरच्या खा.प्रणिती शिंदे यांनी भाषण केले. यावेळी त्यांनी ऑपरेशन सिंदूर हे नाव ऐकून देशभक्ती वाटते. पण, सरकारने माध्यम ांमध्ये केलेला तो एक तमाशा होता, असे वक्तव्य केले होते. चेतनसिंह केदार सावंत म्हणाले, प्रणिती शिंदे यांच्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील जनतेची मान शरमेने खाली गेली आहे. काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमध्ये हिम्मत नसल्यामुळे ते अशी विधाने नवख्या सदस्यांकडून वदवून घेतात. भारतीय सैन्याच्या शौर्याला भर संसदेत तमाशा म्हणणाऱ्या खा.प्रणिती शिंदे यांचे वक्तव्य देशद्रोहीपणाचे आहे. देशातील सर्व जनता भारतीय लष्कराच्या बळावर सुरक्षित आहे, त्यांच्याबाबत अशी उपेक्षात्मक भाषा करणाऱ्या प्रणिती शिंदे यांनी देशाच्या अस्मितेवरच घाव घातला असल्याची टीका चेतनसिंह केदार सावंत यांनी केली आहे.

### चक्कर येऊन पडल्याने १६ वर्षाच्या मुलीचा मृत्यू; कंदलगाव येथील घटना

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

खुर्चीत बसलेली १६ वर्षाची मुलगी अचानक चक्कर येऊन पडते. यानंतर डोक्याला मुकामार लागून बेशुध्द पडलेल्या १६ वर्षाच्या मुलीचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. ही मुलगी सोन्येवाडी कंदलगाव येथील आहे. सानिया हैदर शेख (वय १६, रा. सोन्येवाडी, कंदलगाव, सोलापूर) असे मुलीचे नाव आहे. सानिया ही मंगळवारी रात्री आठच्या सुमारास राहत्या घरात खुर्चीवर बसली होती. ती अचानक चक्कर येऊन खाली पडली. यात तिच्या डोक्याला मुकामार लागल्याने तिची शुध्द हरपली. या अवस्थेत तिला काका नजीर शेख यांनी उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वी ती मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# पंढरपुरातील संभाव्य पुराचा धोका तुर्तास तरी टळला

### शहरवासियांकडून सुटकेचा नि:श्वास

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३० जुलै-**

उजनी धरणातून भीमा नदी मध्ये सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात कपात करण्यात आल्यामुळे पंढरपूरातील संभाव्य पुराचा धोका तुर्तास तरी टळला आहे. त्यामुळे शहरवासियांकडून तसेच नदीकाठच्या गावांतील नागरिकांकडून सुटकेचा निश्वास सोडण्यात आला आहे.

मागील तीन, चार दिवसांपासून उजनी आणि वीर धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग केला जात आहे. उजनी धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे पंढरपूरातील चंद्रभागा (भीमा ) नदीला सध्या पूरसदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती.पंढरपूर तालुक्यातील भीमा नदीवरील सर्व बंधारे सध्या पाण्याखाली गेलेले



होते. त्यामुळे प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला होता. मात्र उजनी धरणातून बुधवारी (ता.३०) सुरु असलेल्या पाण्याच्या विसर्गात कपात करण्यात आली आहे. उजनी धरण सध्या ९७.१३ टक्के इतके भरलेले आहे. त्या अगोदर मंगळवारी उजनी धरणातून ७० हजार क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग करण्यात आलेला होता. मात्र बुधवारी सकाळी सहा वाजल्या पासून धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला असून तो आता ६० हजार क्युसेक्स इतका करण्यात आला आहे.

या बरोबरच विज निर्मितीसाठी १६०० क्युसेक्स इतका विसर्ग सुरु आहे. त्यामुळे सुमारे नऊ ते दहा हजार क्युसेक्सने विसर्ग कमी झाला. दरम्यान दुपारी एकच्या सुमारास धरणातून ५० हजार आणि विज निर्मितीसाठी १६०० असा एकुण ५१ हजार ६०० क्युसेक्स इतका पाण्याचा विसर्ग भीमा नदीत सुरु होता. या बरोबरच निरानरसिंहपूर अर्थात संगम येथून सकाळी सहाच्या सुमारास ९९ हजार ६२२ क्युसेक्सने विसर्ग भीमानदी मध्ये सुरु होता. तो सकाळी नऊच्या सुमारास कमी होवून ९४ हजार ४५३ क्युसेक्स तर दुपारी बाराच्या सुमारास ८९ हजार ८३५ क्युसेक्स इतका विसर्ग भीमा नदीत मिसळत होता.

दरम्यान पंढरपूरात चंद्रभागा नदी सकाळी सहाच्या सुमारास ८१ हजार ९११ क्युसेक्सने त्या नंतर सकाळी नऊ वाजता ८१ हजार २०४ क्युसेक्सने प्रवाहित झालेली होती. त्यामुळे विसर्ग कमी झाल्यामुळे पंढरपूरातील चंद्रभागा नदीला संभाव्य पुराचा जो धोका निर्माण झाला होता तो देखील तुर्तास तरी टळला आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

## श्रीपूरच्या राष्ट्रीय महामार्गावरील दिवे चोरीचे प्रमाण वाढले

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ३० जुलै-**

श्रीपूर पासून काही अंतरावरील ९६५ या राष्ट्रीय महामार्गावर भुयारी मार्ग व सर्व्हिस रोड आहेत. अपघाताची शक्यता असलेल्या ठीकाणी हायमास्ट दिवे आहेत. हे दिवे काढून नेण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे चोरट्यांना पकडून कारवाईची मागणी होत आहे.

पुण्यावरून इंदापूर, माळीनगर, महाळुंग, बोरगांववरून हा महामार्ग तोंडले बोडले वरून सोलापूर कडे जातो. यात माळीनगर ते तोंडले बोडले या भागात उड्डाणपूल आहे. त्यामुळे या परिसरात दुतर्फा मर्क्युरी लाईट बसविले गेले आहेत. तर भुयारी मार्गालगत हायमास्ट दिवे लावलेले आहेत. याचा वाहन धारक तसेच पायी फिरायला जाणाऱ्या नागरिकांना चांगला फायदा होत आहे. परंतू काही नतद्रष्ट मंडळी दिवे चोरण्याचे काम करीत आहेत. सर्विस रोडवर प्रकाश देणाऱ्या दिव्यांची उंची कमी असलेले काही ट्रक चालक ट्रकवर चढून हे दिवे चोरतात अशी शक्यता आहे. रस्त्यालगत असणाऱ्या दिव्यांची चोरी होत असतानाच आता अति उंच



असणाऱ्या हायमास्ट दिव्यांकडे चोरांनी आपला मोर्चा वळवला आहे. बुधवार दि. ३० रोजी पहाटे नागरिक फिरावयास गेल्यावर येथिल विवेक पन्हाळे यांना हायमास्ट पोलवरील दिवे खाली उतरविलेले दिसले त्यानंतर दिवे जळले आहेत म्हणून खाली घेण्यात आले आहेत काय याची विचारणा नॅशनल थॉरिटी असणारे अधिकारी घोडके यांचेशी संपर्क साधून केली असता त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून हायमास्टचे दिवे चोरून नेण्याच्या उद्देशाने खाली घेण्यात आले असून त्याची पूर्ण हायड्रोलिक सिस्टीम निकामी करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. या राष्ट्रीय महामार्गाचा उड्डाणपूल महाळुंग, श्रीपूर, बोरगांव या गावापासून दूर असल्याने चोरट्यांना मोकळे रान मिळत आहे. यावर उपाययोजना होणे गरजेचे आहे. कारण रात्री अंधारात अपघात घडू शकतात.

## टाकाऊ पासून टिकाऊ स्पर्धेत सर्वज्ञ शिंदे प्रथम; बनवली आराम खुर्ची

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० जुलै**

सोजर इंग्लिश स्कूल माध्यमिक विभागाच्यावतीने टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५ वी ते ७ वी या गटातून अनुक्रमे सर्वज्ञ शिंदे प्रथम, आरोही सुतार द्वितीय, सई नाईकनवरे तृतीय तर ८ वी ते १० वी या गटातून अनुक्रमे कृष्णा इंगळे, साद शेख आणि श्रुती पडवळ यांनी प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवले.

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने स्पर्धेत सहभाग नोंदवला. यामध्ये जुन्या टाकाऊ प्लॅस्टिक बाटल्या, नारळची साले, बांबू, कार्डबोर्ड, प्लॅस्टिक चमचे, जुने कपडे, जुने टायर यासारख्या अनेक टाकाऊ गोष्टींपासून आकर्षक व सुंदर वस्तू तयार करुन विद्यार्थ्यांनी स्वत:मधील एका सुप्त कलाकाराला साद घातली. स्पर्धेचे परीक्षण कलातज्ञ विनायक बोकेफोडे आणि प्रशालेचे मुख्याध्यापक संदीप पोळ यांनी केले. दोन्ही गटांमधून प्रत्येकी तीन क्रमांक काढण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केल्यामुळे मुलांनी या स्पर्धेचा आनंद घेतला. स्पर्धेचा निकाल शिक्षक मोरे यांनी जाहीर केला. विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांना



प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देण्यात आले. सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे व्यवस्थापन शिक्षक सचिन शिंदे व लंकेश्वर मॅडम यांनी केले.

## वेळापूर उड्डाणपुलावर गतिरोधकाचे बोर्ड बसवा

### नागरिकांची मागणी; गतिरोधकावर व्हाईट वॉश करा

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.३० जुलै-**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानंतर वेळापूर येथील पालखी मैदानाजवळील उड्डाण पुलावरून पुणे-पंढरपूर मार्गावरील वाहतूक सुरू करण्यात आली आहे. पुलावर दोन ठिकाणी गतिरोधक (स्पीड ब्रेकर) आहेत.



मात्र गतिरोधकांवर पांढऱ्या रंगाचा व्हाईट वॉश नाही तसेच उड्डाण पुलावर गतिरोधक असल्याची सूचना करणारे कोणतेही फलक (बोर्ड) रस्त्याच्या कडेला बसवण्यात आलेले नाहीत. फलक बसवून पांढऱ्या रंगाचे पट्टे मारण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. या महामार्गावरून दिवसेंदिवस वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून उड्डाणपुलावरून वाहने भरधाव वेगाने धावत आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने वाहतुकीचा वेग कमी करण्यासाठी गतिरोधक के परंतू ते स्पष्टपणे दिसत नाहीत. त्यामुळे वाहनचालकांना आधीच सतर्क राहण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे अनेक वेळा वाहनचालक अचानक ब्रेक मारतात व मागील वाहन धडकण्याचा धोका निर्माण होतो. अलीकडेच अशाच प्रकारे एका वाहनाने वेगात असताना अचानक ब्रेक मारल्याने मागून येणाऱ्या वाहनांची धडक होऊन अपघात झाला आहे. यामुळे नागरिकांमध्ये आणि वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. वाहतुकीचे सुरळीत नियोजन आणि अपघात टाळण्यासाठी संबंधित विभागाने उड्डाण पुलावर योग्य ठिकाणी गतिरोधकाचे बोर्ड लावावेत, तसेच अस्तित्वात असलेल्या गतिरोधकांवर व्हाईट वॉश करून त्यांना स्पष्टपणे दृश्यमान करावे, अशी मागणी वाहनचालक आणि नागरिकांकडून केली जात आहे.

> वेळापूर येथील उड्डाण पुलावर वाहनांचा वेग कमी होण्यासाठी जरी शासनाच्या वतीने दोन गतिरोधक बसविण्यात आले असले तरीही त्याबाबत वाहन चालकांना याची माहिती होण्यासाठी फलक लावणे अत्यंत गरजेचे आहे. जर हे बोर्ड नाही लागले तर किंवा गतिरोधकावर व्हाईट वॉश पेंट नाही मारला तर उड्डाणपुलावर अनेक अपघात होऊ शकतात याची गंभीर दखल राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी.
>
> **– रजनीश बनसोडे,** सरपंच, वेळापूर.

## आ.अभिजित पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माढ्यात आरोग्य शिबीर

**माढा, दि.३० जुलै-**

महिला पुरुष लहान मुले मुलींसाठी आरोग्य शिबीर घेण्यात येणार असून यामध्ये तज्ञ डॉक्टर मार्फत सर्व रोग निदान उपचार करण्यात येणार असल्याची माहिती विठ्ठल प्रतिष्ठानचे सदस्य नितीन सरडे यांनी दिली.



यामध्ये हाडाचे आजार, एक्सरे, वाचादोष, मोफत शस्त्रक्रिया, नेत्ररोग तपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शत्रक्रिया, दंतरोग, स्त्रीरोग व कॅन्सर तपासणी, हृदयरोग व मधुमेह रोग तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी केले जाणार आहेत. मोफत कॅन्सर तपासणी शस्त्रक्रिया मुख्यमंत्री सहायता निधीतून देण्यात येणार आहे डॉ. रणजीत चोपडे, डॉ. प्रशांत निकम, डॉ. सुयोग बुरकुटे, डॉ. अनिल कोरे, डॉ. सारंग बुरकुटे (जगदाळे मामा हॉस्पिटल बार्शी) गणेश इंदुरकर, डॉ. अनिल बांगर, डॉ. विठ्ठल लटके व टीम, डॉ. राहुल मांजरे पाटील साई संजीवनी हॉस्पिटल बार्शी कॅन्सर उपचार तज्ञ हे आरोग्य शिबीर १ ऑगस्ट रोजी १०ते सायंकाळी ५ ग्रामीण रुग्णालय माढा येथे बुधराणी हॉस्पिटल पुणे.व माढा शहर डॉक्टर असोसिएशन यांच्या सहकार्याने घेण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# कुंभेजमध्ये विद्यार्थ्यांनी केले महिलांचे प्रबोधन

### बागल विद्यालयात नागपंचमी निमित्त पोस्टर प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.३० जुलै**

कुंभेज (ता.करमाळा) येथील दिगंबर रावजी बागल विद्यालयात नागपंचमी निमित्त पोस्टर प्रदर्शन करून विविध ठिकाणच्या वारुळाजवळ जाऊन महिलांचे प्रबोधन केले. नागपंचमीचे औचित्य साधत भारतीय संस्कृती, सण-उत्सव आणि ते साजरे करताना त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट केला.

पर्यावरणप्रेमी शिक्षक कल्याणराव साळुंके यांचे मार्गदर्शनाखाली विद्यार्थी, विद्यार्थिनी स्नेहल शिंदे, प्रिती शिंदे, सायली भोसले, अनुष्का शिंदे, कल्याणी पोळ, वैष्णवी पवार, अमृता भोसले, पायल शिंदे, सिध्दी काळे, काजल सुरवसे, अपर्णा शिंदे, सार्थक कोळी, श्रेयस पवार या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



**सापांचे पर्यावरणीय महत्व :** सापांबद्दल समाजातील गैरसमजुती शत्रू समजून सापांचा जीव धोक्यात येतो. हा गैरसमज दूर करण्यासाठी बागल विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी विविध मुद्यांवर आधारीत पोस्टर तयार केले.

सापांचे वर्गीकरण, विषारी बिनविषारी साप, पर्यावरणीय महत्व, साप, शेती आणि अर्थकारण, सर्पदंश झाल्यास प्रथमोपचार व वैद्यकिय मदत आदिबाबत शास्त्रीय माहिती दिली. विद्यालयातील पक्षीमित्र शिक्षक कल्याणराव साळुंके यांनी मुख्याध्यापकांचे मार्गदर्शनानुसार उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. यावेळी शिक्षक सिताराम बनसोडे, संतोष शिंदे, विष्णू पोळ, दादा जाधव उपस्थित होते.

> आधुनिक युगात सण–उत्सव साजरे करताना त्यामागील शास्त्र व लोकभावना यांचा समतोल साधायला हवा. याचेच आदर्श उदाहरण म्हणजे करमाळा तालुक्यातील शेटफळ नागोबाचे हे सापांचे संवर्धन करणारे गाव म्हणून ओळखले जात आहे. आमच्या बागल विद्यालयातील विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक महत्वपूर्ण योगदान देत आहेत. कुंभेज ,पोफळजच्या शिक्षणप्रेमी ग्रामस्थांचे सहकार्य उत्साह वाढवणारे असून कौतुकास्पद आहे.
>
> **- रश्मी बागल-कोलते, संस्था सचिवा**

> इयत्ता नववी इंग्रजीच्या पाठात अँटिडोट हा शब्द व विषारी साप हा संदर्भ देऊन सरांनी चर्चा करायला सांगितली. इथे उपक्रमाची सुरुवात झाली. नागपंचमी सणाचे औचित्य असल्याने आम्ही सर्व मुला–मुलींनी सापांची सविस्तर शास्त्रीय माहिती घेतली. आमच्या कुटुंबातील सदस्यांना व गावातील आसपासच्या नागरिकांना ही माहिती दिली व लोकप्रबोधन केले. याचा आम्हाला अभिमान वाटतो. हा उपक्रम चिकित्सक वृत्तीने राबवल्याने आम्हाला नवीन दृष्टी मिळाली.
>
> **- कु. सायली भोसले, विद्यार्थिनी**

## महत्वाचे...



## अभिनंदन फाउंडेशनच्या वतीने मंगळागौर उत्सव

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

प्रभाग क्र. ६ येथे नागपंचमीनिमित्त अभिनंदन फाउंडेशनवतीने मंगळागौर उत्सव हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत खेळ, गाणी, झिम्मा-फुगडी आणि झुल्यावर झुलत महिलांनी मनसोक्त आनंद लुटला. या आनंददायी कार्यक्रमाच्या निमित्ताने अभिनंदा फाउंडेशन तर्फे नागरिकांना बसण्यासाठी परिसरात मोफत बाकड्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन अखिल भाविक वारकरी मंडळाचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी चेतन चौधरी, शंकर आयवाळे, सुजित खुर्द, माजीद बागवान, अभयसिंह भोसले, महानंदा भोसले, पूजा चव्हाण, अनिता गवळी आदी महिला व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## प्रशासनाधिकारी विठ्ठल ढेपे यांचा सेवानिवृत्त शिक्षकांच्या वतीने सत्कार

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडे जिल्हापरिषद माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे यांची महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रशासन अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांचा सत्कार महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडील सेवानिवृत्त शिक्षकाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. हाजी नबीलाल शेख यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अरुणकुमार हुच्चे, किसन माने,पांडुरंग वाघमारे, गोवर्धन वासुदेव, मुकुंद चंदनशिवे, शंकर गुरव, मठपती, सूर्यकांत कुडल आदी उपस्थित होते.



## जेऊर येथे माहेर कट्टा महिला ग्रुपच्या वतीने पारंपरिक खेळांचे आयोजन

**करमाळा, दि.३० जुलै-**

जेऊर तालुका करमाळा येथील माहेर कट्टा महिला ग्रुपच्या वतीने नागपंचमी निमित्त महीलांचे भारुड, पंचमीची गाणी, महीलांसाठी पारंपरिक खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. येथील डॉ. शारदा सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्यक्रम झाले. यामध्ये सुरवातीला नागाच्या आकाराचे फुगे आकाशात सोडत कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी नागाविषयीच्या अंधश्रद्धेविषयीची माहिती डॉ. सुराणा यांनी उपस्थित महिलांना दिली. महिलांसाठी विविध पारंपरिक खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. त्यानंतर महिलांचा भारुडांचा कार्यक्रम झाला. शेवटी फेर धरून नागपंचमीची विविध गाणी म्हणत कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाचे नियोजन तनिष्का गटाच्या प्रमुख अपर्णा पाथ्रुडकर यांनी केले होते. तर या कार्यक्रमाला कांचन राठोड, कल्पना आखाडे, मनिषा लोंढे, येवले बोराडे, मेहता मॅडम, ननवरे, घाडगेताई यांच्यासह बहुसंख्येने महिला सहभागी झाल्या होत्या.

## निधन वृत्त...

### राजेंद्र चिंता



**सोलापूर, दि.३० जुलै-**

पूर्व भागातील विणकर वसाहत येथील रहिवासी राजेंद्र नारायण चिंता (वय ६८) यांचे बुधवार, दि. ३० जुलै रोजी गिरनार येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, बहीण, भाऊ, चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. पद्मशाली युवक संघटनेचे माजी प्रेसिडेंट गोविंद चिंता यांचे ते वडील होत.


### शारदाबाई माने



**सोलापूर, दि.३० जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथील शारदाबाई लक्ष्मण माने (वय ६५) यांचे बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी व नातवंडे असा परिवार आहे.

### गंगाधर जळकोटे



**अणदूर, दि.३० जुलै-**

किलज (ता. तुळजापुर) येथील जेष्ठ नागरिक व प्रतिष्ठित व्यापारी गंगाधर राम जळकोटे (वय-८६) यांचे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार दि.३१ जुलै रोजी सकाळी १० वा. किलज येथील राहत्या घरापासुन निघणार आहे. त्यांच्या पश्चात पाच मुली, एक मुलगा, जावई,सुना नातवंडे असा परिवार आहे. दै.तरुण भारत किलज प्रतिनिधी राम जळकोटे यांचे ते आजोबा होत.

# गरजवंत विद्यार्थ्यांना विविध सेवा पुरविणार

### आयुक्त डॉ. ओम्बासे; महापालिकेत ३५७ विद्यार्थ्यांसाठी दृष्टी मूल्यमापन शिबीर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी दृष्टी मूल्यमापन करून त्यांच्या गरजेनुरूप विविध प्रकारातील सेवा, पुरविण्यात येणार आहे, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास ५ वर्ष पूर्ण झाल्या निमित्त सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभाग व शंकर शेठ साबळे आय हॉस्पिटल सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय शिक्षा समागम कार्यक्रमांतर्गत सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विशेष गरजा असणाऱ्या एकूण ३५७ विद्यार्थ्यांसाठी मनपा मुलांची उर्दू केंद्र शाळा कॅम्प सोलापूर या ठिकाणी दृष्टी मूल्यमापन शिबिर संपन्न झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

ा कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी केले. या कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी विठ्ठल ढेपे, एच. व्ही. देसाई हॉस्पिटलचे असोसिएट डायरेक्टर डॉ. सुधीर सुदाल , डॉ. व्ही.एम.स्मृती शासकीय मेडिकल कॉलेज येथील डॉ. निलेश बागुल व त्यांचे सहकारी नेत्ररोग विभागातील वैद्यकीय तज्ञ, शाळेच्या मुख्याध्यापिका तबसुम शेख, पर्यवेक्षक भगवान मुंढे, नीलोफर सय्यद, संतोष बुलबुले आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

डॉ. सचिन ओम्बासे म्हणाले, समग्र शिक्षा अंतर्गत समावेशित शिक्षण उपक्रमान्वये सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी दृष्टी मूल्यमापन करून त्यांच्या गरजेनुरूप विविध प्रकारातील सेवा पुरविण्यात येणार आहेत. ज्यामध्ये शस्त्रक्रिया ,चष्मे, या सेवा एच.व्ही.देसाई हॉस्पिटल यांच्यामार्फत मोफत स्वरूपात पुरविल्या जाणार आहेत. त्याचबरोबर लोविजन कीट, दिव्यांग प्रमाणपत्र, ठळक अक्षरातील पाठ्यपुस्तके इत्यादी सेवा समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रम ांतर्गत पुरविल्या जाणार आहेत. ज्या मुलांना चष्म्याची शिफारस झाली आहे ,अशा मुलांनी चष्मे प्राप्त झाल्यानंतर त्याचा नियमितपणे वापर करावा. चष्मा वापरण्याची लाज बाळगण्याची गरज नाही, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन विशेष शिक्षिका विद्या रोटे यांनी केले. अविनाश शिंदे यांनी आभार मानले.

### आनंद शिंदे आत्महत्या प्रकरण

## अरुण रोडगे यांस अटकपूर्व जामीन मंजूर

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

आनंद शिंदे यास आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अरुण प्रभाकर रोडगे (रा. सोलापूर) यांस प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला.

मयत आनंद हा दमाणीनगर येथे राहत होता. त्याचा जागेच्या देवाण घेवाणीचा व्यवसाय होता. मयत आनंद व सकलेस जाधव यांचेत सात रस्ता येथे भांडण झाले. त्यावेळी सकलेस याने मयत आनंद यांस मारहाण केली. तसेच सुमारे सहा महिन्यापूर्वी अरुण रोडगे व मयत आनंद यांच्यात जालेल्या भांडणात अरुण रोडगे यांनी मयतास मारहाण केली होती. त्यानंतर सकलेस जाधव व अरुण रोडगे हे दोघे मयत आनंद यास त्रास देत होते, असे मयताने आईस सांगितले. १५ जुलै २०२५ रोजी मयताची मावशी ही स्वयंपाकासाठी बाहेर गेली होती त्यावेळी आनंद हा घरी एकटाच होता. दुपारी सव्वा एक वाजता मावशी काम ावरून घरी आली त्यावेळेस आनंद हा गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यावेळी त्याच्या हातात दोन चिठ्ठ्या मिळाल्या,''मी असा नव्हतो, माझी इच्छा नव्हती फाशी घ्यायची मला घ्यायला भाग पाडले, माझा मोबाईल हॅक करून निराश केले - अरुण रोडगे,'' व दुसऱ्या चिठ्ठी मध्ये, ''सकलेस जाधव,'' व सही असे लिहिलेले होते. मयताची आई अंजना दादाराव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सकलेस जाधव व अरुण रोडगे यांच्यावर सलगरवस्ती पोलीसात गुन्हा नोंदला होता. अटक होऊ नये म्हणून रोडगे यांनी ॲड. मिलिंद थोबडे यांचेमार्फत अर्ज दाखल केला. त्यानुसार न्यायालयाने रोडगे याचा अटकपूर्व जामीन कायम केला. सरकारतर्फे ॲड. आनंद कुर्डूकर यांनी अर्जदारार्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड.दत्ता गुंड यांनी काम पाहिले.

## पोटदुखीच्या त्रासातून महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

पोटदुखीचा त्रास होत असल्याने उपचारास दाखल केलेल्या महिलेचा मृत्यू झाला. पोटदुखीचा त्रास १८ जुलैपासून सुरु होता.

अंजना अनिल साबळे (वय ४५, रा. मोहोळ) असे मृत पावलेल्या महिलेचे नाव आहे. अंजना यांना १५ जुलै रोजी सकाळी अकरा वाजता पोटदुखीचा त्रास सुरु झाला. त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने मंगळवारी मध्यरात्री १.२५ वाजता मुलगा दादा याने शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारादरम्यान सकाळी ९.३० वाजता त्यांचा मृत्यू झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## चतुरबाई श्राविका शाळेत सर्प मित्रांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक विद्यालयात नागपंचमीनिमित्त सर्पमित्र दीपक इंगळे व अजय खंडागळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक मुख्याध्यापिका देशमाने यांनी केले. अरिहंत माणिकशेट्टी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले त्यानंतर सर्पमित्रांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला सापा विषयी भीती न बाळगता योग्य माहिती व सावधगिरीने कसे वागावे याचे मार्गदर्शन केले.



सापाचे विषारी व बिनविषारी असे दोन प्रकार असतात. विषारी साप चावला तर लगेच दवाखान्यात जावे लागते तर बिनविषारी साप चावला तर घरामध्ये प्रथम ोपचार करून दवाखान्यात जाण्यास हरकत नाही असे सर्पमित्रांनी सांगितले.

नागपंचमीच्या वेळेस नागाची पूजा करून नागाला दूध, लाह्या ठेवाव्या असे मानले जाते परंतु ही अंधश्रद्धा असून साप दूध पीत नाहीत किंवा लाह्या खात नाहीत. तर ते त्यांचे अन्नच भक्षण करतात उंदीर किंवा बेडूक. निसर्गाच्या साखळीतील साप एक महत्त्वाचा घटक असल्याने त्याला न मारता सर्पमित्रांची मदत घ्यावी. त्यांच्या मदतीने त्याला नैसर्गिक अधिवासात सोडून द्यावे. अर्धवट मारलेला साप हा बदला घेतो किंवा नंतर घेऊन चालतो ही भ्रामक कल्पना आहे साप असे काहीही करत नाही.

सर्पमित्रांच्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी शाळेत झोका खेळण्याचा आनंद घेतला गाणी म्हटली, फेर धरला व नृत्य केले. कार्यक्रम ाच्या यशस्वितेसाठी प्रदीप डेरे, रोहन शहा, सुरज व्हसाळे आदींनी प्रयत्न केले.

## रस्त्यावर बेशुध्दावस्थेत आढळलेल्या तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

पार्क चौक ते सिध्देशवर पेठेदरम्यानच्या पासपोर्ट कार्यालया समोरील रस्त्यावर बेशुध्दावस्थेत आढळून आलेल्या तरुणाचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. ही घटना बुधवारी सकाळी दहा वाजता उघडकीस आली. सुरज देवानंद ख्जुरगी (वय ३१, रा. धोत्रेकर वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. पासपोर्ट कार्यालयासमोर बंदगी टी स्टॉल आहे. यासमोरील रस्त्यावर सुरज हा बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास बेशुध्दावस्थेत आढळून आला. त्याला सदर बझार पोलीस ठाण्यातील हवालदार सुरवसे यांनी उपचारास दाखल केले. परंतु तो उपचारापूर्वी मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## मंदीराच्या बांधकामासाठी जबरदस्तीने वर्गणी मागणाऱ्या मंदीराच्या अध्यक्षाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

मंदीराच्या बांधकामासाठी जबरदस्तीने वर्गणी मागणाऱ्या मंदीराच्या अध्यक्षाविरुध्द पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अमित आदिनाथ खाणे (वय ४०, रा. जैनवाडी, ता. पंढरपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजय देवाप्पा मैंढेगिरी (वय ३०, रा. जैनवाडी, ता. पंढरपूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जैनवाडी येथील जैन धर्माच्या जैन मंदीराच्या हॉलचे बांधकाम सुरु आहे. २९ जुलै रोजी सायंकाळी अमित खाणे हे नेहमीप्रमाणे भाळवणी येथील टेलरिंगचे दुकानाकडे कामासाठी दुचाकीवरून जात होते. त्यावेळी जैनवाडी येथील टॉवरजवळ जैन मंदीराचे अध्यक्ष विजय मैंढेगिरी यांनी अमित खाणे यांना आवाज देऊन थांबविले.

मैढेंगिरी यांनी मंदीराच्या हॉलचे बांधकाम सुरु असून त्याची वर्गणी दे असे खाणे यास सांगितले. त्यावेळी मी अगोदरच वर्गणी दिली आहे असे खाणे म्हणाले असता मैंढेगिरी यांनी खाणे यांना शिवीगाळ करून हाताने लाथाबुक्क्याने मारहाण करून ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच शेजारच्या वेल्डींगच्या दुकानातून लोखंडी रॉड आणून खाणे यांच्या कपाळावर मारून त्यांना जखमी केले. म्हणून पंढरपूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

## मार्कंडेय रथोत्सव मार्गावरील खड्डे बुजविण्याची मागणी

### पद्मशाली सखी संघातर्फे महापालिका अतिरिक्त आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

पद्मशाली समाजाचे कुलदैवत महर्षी मार्कंडेय महामुनींचा रथोत्सव येत्या ९ ऑगस्ट रोजी आहे. तत्पूर्वी या रथोत्सव मार्गावरील खड्डे बुजवावेत तसेच झाडांच्या फांद्या छाटण्यात याव्यात, अशा आशयाचे निवेदन पद्मशाली सखी संघातर्फे महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना महापालिकेला देण्यात आले.



शनिवार,दि. ९ ऑगस्ट रोजी मार्कंडेय रथोत्सव आहे. यानिमित्ताने सिध्देश्वर पेठेतील पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या श्री मार्कंडेय मंदिर येथे कुलदैवत महर्षी मार्कंडेय महामुनींचे दर्शन घेण्यासाठी व पहाटे ४ वाजल्यापासून विविध धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ होतो. कुलदैवत महर्षी मार्कंडेय महामुनींचे दर्शन घेण्यासाठी समाज बांधवांचे पहाटेपासूनच गर्दी होत असते.

श्री सिध्देश्वर पेठेतील श्री मार्कंडेय मंदिर येथून या मिरवणुकीची सुरुवात होते. विजापूर वेस, भारतीय चौक, श्री रत्न मारुती देवस्थान मार्गे (सुभाषचंद्र बोस उद्यान समोरुन), जमखंडी फूल, पद्मशाली चौक, कुचन नगर मार्गे, दत्तनगर, श्री मार्कंडेय सोलापूर रुग्णालय समोरुन, भद्रावती पेठ, जोडबसवण्णा चौक, मार्कंडेय चौक, राजेंद्र चौक, भुलाभाई चौक, जोडभावी पेठ (म्हेत्रे निवास) वळसा घालून, कन्ना चौक, औद्योगिक बँक, साखर पेठ, सोमवार पेठ, समाचार चौक, माणिक चौक, आजोबा गणपती समोरुन पुन्हा विजापूर वेस मार्गे सिध्देश्वर पेठेतील श्री मार्कंडेय मंदिर येथे मिरवणुकीची सांगता होते. यावेळी अध्यक्षा मेघा इट्टम, सल्लागार ममता मुदगुंडी व कल्पना अर्शनपल्ली आदी उपस्थित होते.

## मोबाईलने मारहाण केल्याने विवाहिता जखमी

### टाकळी येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

घरगुती कारणातून झालेल्या वादानंतर पतीने मोबाईलने मारहाण केल्याने विवाहिता जखमी झाली. ही भांडणे दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी येथे मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास झाली.

कोमल धानय्या वस्त्रद ( वय १७, रा. टाकळी ता द सोलापूर) असे मारहाण झालेल्या विवाहितेचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास कोमल या टाकळी येथे घरात असताना, पती धानय्याबरोबर घरगुती कारणातून त्यांचा वाद झाला. यातून चिडलेल्या धानय्या याने मोबाईल तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात त्रास होऊ लागल्याने मंद्रुप येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन बुधवारी सकाळी दहा वाजता कोमल स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# शिवदारे कॉलेजमध्ये सखी सावित्री शिबीर संपन्न

### जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सहकार्य; महिला सुरक्षेबाबत झाले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स व ज्युनिअर कॉलेज सोलापूर तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सखी सावित्री समिती अंतर्गत महिला सुरक्षितता विषयाबाबत एक दिवसीय शिबिर संपन्न झाले.



महिलावर दिवसेंदिवस अन्याय अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. कौटुंबिक सामाजिक या सर्व स्तरावर घटनेची वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे महिलांचे जीवनमान असुरक्षित झाले आहे. या समस्येवर उपाय कसा शोधायचा? महिला सुरक्षित कशा करायच्या? याबाबत शिबिराचे आयोजन केले गेले होते. शिबिर संपन्न करण्यासाठी जिल्हा न्यायालयातील ॲड. देवयानी किणगी, बार्शीच्या आयुष व्यसनमुक्ती केंद्राच्या ॲड. द्वारका देवळे, मानसोपचार तज्ञ मृणाली मोरे, मा. गोठीपामुल यांची उपस्थिती होती. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना ॲड. देवळे यांनी विद्यार्थिनीने शारीरिक कणखरता व मानसिक कणखरता या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. यासाठी शारीरिक कसरती करण्यासाठी मैदानात येऊन मैदानी खेळ खेळावेत असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस इयत्ता बारावीत व सीईटी परीक्षेते यश संपादन केलेल्यांचा सत्कार करण्यात आला. बारावतील प्रथम क्रमांक श्रद्धा आडगळे, द्वितीय क्रमांक साक्षी मलकपनवर, तृतीय क्रमांक जोया शेख यासह अकरावीतील प्रथम क्रमांक आर्यन व्हटकर, द्वितीय क्रमांक प्राजक्ता उपाध्ये, तृतीय क्रमांक श्रुती पाटील यांचा सत्कार झाला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती व अध्यक्ष म्हणून प्राचार्या श्रुती गायकवाड उपस्थित होत्या. कार्यक्रमास दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे चेअरमन राजशेखर शिवदारे तसेच मंडळाचे विश्वस्त बी. व्ही. शेटे, प्राचार्य डी एस सुत्रावे, डॉ. अनमोल वळसंगे यांनी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. व्ही. के. वराडे यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांची यादी वाचन डॉ.डी. डी. बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अक्सा सावराज यांनी केले तर आभार प्रा. श्रेयस राऊत यांनी मानले.

## सोमनाथ काका रगबले युथ फाउंडेशनतर्फे काशी, आयोध्या मोफत तीर्थयात्रा

### १५०० भाविकांना मिळणार लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

सोमनाथ काका रगबले युथ फाउंडेशनच्या वतीने अयोध्या, प्रयागराज व काशी येथे सात दिवसीय मोफत तीर्थयात्रा आयोजित करण्यात आली आहे. शेळगी आणि सोलापूर शहरातील १५०० भाविकांना धार्मिक दर्शन घडविण्यात येणार आहे, अशी माहिती माजी नगरसेवक चंद्रकांत रमणशेट्टी आणि सोमनाथ रगबले यांनी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शुक्रवार दि. १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता या तीर्थयात्रेस सोलापुरातून प्रारंभ होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. विजयकुमार देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे, पोलीस आयुक्त एम राजकुमार, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आ. दिलीपराव माने, माजी नगरसेवक किरण देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यात्रेच्या पहिल्या दिवशी प्रयागराजमध्ये पोहोचणार असून सकाळी त्रिवेणी संगम स्नान करून काशीला प्रस्थान करण्यात येणार आहे त्यानंतर काशी येथे मुक्काम होईल. दुसऱ्या दिवशी सकाळी महादेव विश्वनाथ देवांचे दर्शन घेण्यात येणार आहे. संध्याकाळी गंगा आरती करून आयोध्याला प्रस्थान होईल. तिसऱ्या दिवशी पहाटे रामलल्लाचे दर्शन करून संध्याकाळी शरयू नदी काठी आरती होणार आहे. त्यानंतर सोलापूरकडे परतीचा प्रवास होणार आहे. यावेळी अजय रगबले, शिवकुमार रगबले आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### भरत अरुण लखनौ सुपरचे गोलंदाजी प्रशिक्षक



**नवी दिल्ली** : इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) २०२६ च्या हंगामापूर्वी लखनौ सुपर जायण्ट्सने (एलएसजी) भारताचे माजी गोलंदाजी प्रशिक्षक भरत अरुण यांना आपले नवीन गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले आहे. अरुण एलएसजीमध्ये सहभागी झाले आहे. एलएसजी आयपीएल २०२५ मध्ये सातव्या स्थानावर राहिला होता. 'हो, अरुण एलएसजीमध्ये आमचे नवीन गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून सहभागी झाले, हे निश्चित झाले आहे. आयपीएल २०२५ संपल्यानंतर एलएसजी भारतीय क्रिकेट वर्तुळात जागतिक दर्जाच्या वेगवान गोलंदाजी प्रशिक्षकाचा शोध घेत होते आणि अखेर त्यांची इच्छा पूर्ण झाली आहे, असे सूत्रांनी बुधवारी सांगितले. अरुण भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली एलएसजीमध्ये जात आहे, याचा अर्थ कोलकाता नाईट रायडर्सच्या (केकेआर) गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून त्यांचा चार वर्षांचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. ते २०२२ च्या हंगामापूर्वी केकेआरमध्ये सहभगी झाले होते, जिथे ते फ्रॅन्चायझीच्या २०२४ च्या आयपीएल विजेत्या संघाचे सदस्य होते. फ्रॅन्चायझीने त्यांचे मुख्य प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांच्याशी वेगळे झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अरुण यांनी केकेआर सोडले. ■

### जागतिक जलतरणात शोन गांगुलीला ३८ वे स्थान

**सिंगापूर** : भारतीय जलतरणपटू शोन गांगुलीने बुधवारी येथे झालेल्या जागतिक जलतरण स्पर्धेच्या चौथ्या दिवशी पुरुषांच्या २०० मीटर मेडलेमध्ये ३८ वे स्थान पटकावले. कर्नाटकचा २० वर्षीय जलतरणपटू गांगुलीने २:०५.४० सेकंद वेळ नोंदवून आपल्या हीटमध्ये आठवे व एकूण ३८ वे स्थान पटकावले, परंतु १६ जलतरणपटूंच्या उपांत्य फेरीत पोहोचू शकला नाही. विद्यमान ऑलिम्पिक विजेता लिओन मार्चंड हीटमध्ये अव्वल स्थान पटकावले. २३ वर्षीय फ्रेंच खेळाडूने १:५७.६३ सेकंद वेळ नोंदवली, तर ऑस्ट्रेलियाचा डेव्हिड शिल्चट (१:५९.५०) उपांत्य फेरीत पोहोचणारा शेवटचा जलतरणपटू होता.

### पाकिस्तानच्या पर्वतावर जर्मन बायथलीटचा मृत्यू



**खापलू** : जर्मन डबल बायथलॉन चॅम्पियन लॉरा डहलमेयर हिचा बुधवारी पाकिस्तानी पर्वतरांगावर दगड कोसळल्याने गंभीर जखमी झाल्याने तिचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली. सोमवारी दुपारी सुमारे ५,७०० मीटर (१८,७०० फूट) उंचीवर काराकोरम पर्वतरांगातील लैला शिखरावर हा अपघात झाला. घटनास्थळाच्या धोकादायक स्वरूपामुळे तिचा बचाव प्रयत्न अयशस्वी झाले आणि बचाव कार्य स्थगित करण्यात आले, असे तिच्या टीमने बुधवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. डहलमेयरने सात जागतिक अजिंक्यपद सुवर्णपदके जिंकली आणि २०१८ च्या प्योंगचांग येथे झालेल्या हिवाळी ऑलिम्पिकमध्ये, ती एकाच खेळांमध्ये स्प्रिंट आणि पर्स्युट दोन्ही जिंकणारी पहिली महिला खेळाडू बनली. डहलमेयरचा गिर्यारोहण साथीदार सुरक्षित पोहोचल्यानंतर अलार्म वाजवू शकला. हेलिकॉप्टरने बचाव करणे शक्य नाही हे निश्चित झाले, असे ६,००० मीटरपेक्षा जास्त उंचीचा हा पर्वत असलेल्या घांचे जिल्ह्यातील वरिष्ठ स्थानिक अधिकारी अरीब अहमद मुख्तार यांनी सांगितले. ■

# भारताचे मालिका बरोबरीत राखण्याचे लक्ष्य



◆ **लंडन, ३० जुलै**

ॲण्डसरन व तेंडुलकर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत ओव्हल मैदानावर गुरुवारपासून भारत व इंग्लंड संघादरम्यान पाचवा आणि अखेरचा कसोटी क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. आधीच २-१ ने आघाडीवर असलेल्या इंग्लंड संघाचे लक्ष्य सामन्यासह मालिकेत वर्चस्व गाजविण्याचे आहे, तर भारतीय संघाचे मालकेत बरोबरीत साधण्याचे लक्ष्य आहे. मात्र त्याकरिता भारतीय संघाला नव्या दमाने खेळत आपले सर्वस्व पणाला लावावे लागणार आहे..त्यामुळे हा निर्णायक कसोटी सामना अतिशय चुरशीचा आणि अत्यंत पाहण्यायोग्य मालिकेचा योग्य शेवट होईल, अशी आशा आहे.

खचाखच भरलेल्या प्रेक्षकांसमोर खेळणारी ही मालिका कसोटी क्रिकेटसाठी एक परिपूर्ण जाहिरात ठरली आहे, कारण चारही सामने पाचव्या दिवशी शेवटच्या सत्रापर्यंत चालले आहेत.

शुभमन गिलने लॉर्ड्सवर झॅक क्रॉलीवर जाणूनबुजून वेळ वाया घालवणे व रवींद्र जडेजाने शेवटच्या दिवशी कामकाज रद्द करण्यास नकार देणे हे बेन स्टोक्सच्या नाराजीमुळे झाले आहे, लंडनमध्ये परिस्थिती आधीच जितकी गरम आहे तितकी उष्णतेची लाट अनुभवत आहे.

नेहमीच अडचणींना तोंड देण्यासाठी तयार असलेले मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी ओव्हलचे क्युरेटर ली फोर्टिस यांच्याशी शाब्दिक बाचाबाची केल्यामुळे हा वाद आणखी तीव्र झाला आहे. या पृष्ठभूमीवर जसप्रीत बुमराह संघाच्या पाठीशी उभा नसल्यामुळे गंभीरच्या संघासाठी हा तेजी किंवा अपयशाचा काळ आहे.

बेन स्टोक्ससारख्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली इंग्लंडने तरुण आणि मुक्त उत्साही भारतीय संघावर २-१ अशी आघाडी घेतली आहे, ज्याने नवीन कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली सर्व अपेक्षा ओलांडल्या आहेत.

**गिल गावस्करच्या विक्रमापासून ५२ धावा दूर**

मोठ्या संक्रमणातून जात असलेल्या संघाचा कर्णधार म्हणून पहिल्या मालिकेत शुभमन गिलने आघाडीवरून नेतृत्व केले व ७२२ धावा केल्या आहेत. सुनील गावस्करच्या एका मालिकेत भारतीय कर्णधाराच्या सर्वाधिक धावांच्या विक्रमापासून तो केवळ ५२ धावा दूर आहे. कसोटी मालिकेत (१९७८-७९ विरुद्ध वेस्ट इंडीज) गावस्करचा सर्वाधिक धावांचा (७३२) भारतीय कर्णधाराचा विक्रम मोडीत टाकण्यासाठी त्याला आणखी ११ धावांची आवश्यकता आहे.

२५ वर्षीय गिलने आतापर्यंत चार शतके झळकावली आहेत, यात ओल्ड ट्रॅफर्ड येथे झालेल्या गत कसोटीत एक द्विशतक व एक सामना वाचवणारा १०३ धावांचा समावेश आहे. तीन डावांमध्ये कमी परतावा मिळवल्यानंतर, गिलने मॅन्चेस्टरमध्ये आपल्या कारकिर्दीतील सर्वात निर्णायक खेळी खेळली आणि केवळ फलंदाज म्हणूनच नव्हे तर कर्णधार म्हणूनही आपली प्रतिष्ठा वाढवली.

जवळजवळ निराशाजनक परिस्थितीतून प्रसिद्ध ड्रॉ मिळवण्यात मोठी भूमिका बजावल्यानंतर, गिल व त्याचा संघ अंतिम फेरीत गती वाढवेल असी आशा आहे. गिलप्रमाणेच, स्टोक्सनेही उदाहरण देऊन नेतृत्व केले आहे आणि अनेक दुखापतींशी झुंजत असूनही, इंग्लंडचा हा कर्णधार आपल्या दुखापतग्रस्त शरीराला मर्यादेपर्यंत ढकलेल. त्यांचे वेगवान गोलंदाजही थकले असताना, इंग्लंडने जेमी ओव्हरटनला संघात समाविष्ट केले आहे. ५११ धावांसह के. एल. राहुल हा वरच्या क्रमात सातत्याचा आदर्श आहे, परंतु ओव्हलमध्ये सामान्यतः चांगली फलंदाजी करणाऱ्या यशस्वी जयस्वाल आणि तिसऱ्या क्रमांकावर साई सुदर्शनकडून अधिक अपेक्षा केल्या जातील. दुखापतग्रस्त ऋषभ पंतच्या अनुपस्थितीत वॉशिंग्टन सुंदर व रवींद्र जडेजा हे चौथ्या कसोटीत इंग्लंडला विजयापासून रोखणाऱ्या नाबाद शतकांमुळे अव्वल सहा जणांमध्ये स्थान मिळवतील अशी अपेक्षा आहे.

भारतीय संघ व्यवस्थापन आठव्या क्रमांकापर्यंत फलंदाजीचा पर्याय उपलब्ध ठेवण्यावर ठाम विश्वास ठेवते आणि त्यामुळे कुलदीप यादवला पुन्हा एकदा अंतिम अकरा क्रमांकातून वगळले जाऊ शकते, तरीही दीर्घ व कठीण मालिकेत त्याला स्थान मिळावे अशी मागणी होत आहे.

ध्रुव जुरेल यष्टिरक्षण करेल व पंतच्या अनुपस्थितीत सातव्या क्रमांकावर फलंदाजी करू शकेल. शार्दुल ठाकूर आपल्या कर्णधाराचा आत्मविश्वास पूर्णपणे अनुभवत नसला तरी आठव्या क्रमांकावर त्याचे स्थान कायम ठेवू शकेल.

पाचव्या कसोटीपूर्वी फलंदाजी प्रशिक्षक सितांशू कोटक यांच्या टिप्पण्या पाहता, भारत आतापर्यंत अनुसरण केलेला टेम्पलेट कायम ठेवेल.

**भारत-इंग्लंड पाचवा कसोटी सामना**

**स्थळ** : ओव्हल मैदान, लंडन
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : सोनी स्पोर्ट्सवर

**फलंदाजी, गोलंदाजीत संतुलन राखावे लागेल : कोटक**

भारताला सामना जिंकण्यासाठी फलंदाजी व गोलंदाजी दोन्हीचे संतुलन पहावे लागेल. भारताला २० बळी टिपावे लागतील. त्याचप्रमाणे, ५५०-६०० धावा करणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे, असे कोटक म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# आयुष शेट्टी उपांत्यपूर्व फेरीत

**मकाऊ ओपन बॅडमिंटन ● ध्रुव-तनिषाचीही आगेकूच**



◆ **मकाऊ, ३० जुलै**

सातव्या मानांकित आयुष शेट्टीने बुधवारी येथे चीन तैपेईच्या हुआंग यू काईवर सरळ गेममध्ये विजय मिळवत मकाऊ ओपन बीडब्ल्यूएफ सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

जागतिक क्रमवारीत ३१ व्या क्रमांकावर असलेल्या शेट्टीने ६६ व्या क्रमांकावर असलेल्या हुआंगवर अवघ्या ३१ मिनिटांत २१-१०, २१-११ असा विजय मिळवला.

मिश्र दुहेरीत पाचव्या मानांकित ध्रुव कपिला व जगातील १८ व्या क्रमांकावर असलेल्या तनिषा क्रॅस्टो या जोडीने थायलंडच्या रॅचापोल मक्कासासिथॉर्न व नट्टामोन लायसुआन या जोडीचा २६ मिनिटांच्या लढतीत २१-१०, २१-१५ असा पराभव केला.

तथापि, पुरुष एकेरीत सतीश कुमार करुणाकरनचे आव्हान संपुष्टात आले. सतीशला उप-उपांत्यपूर्व फेरीत मलेशियाच्या जस्टिन होहकडून ३७ मिनिटांत १९-२१, १२-२१ असा पराभव पत्करावा लागला. मिश्र दुहेरीतही भारताला पराभव पत्करावा लागला, रोहन कपूर व ऋत्विका शिवानी गड्डे या ३४ व्या क्रमांकाच्या जोडीला चीन तैपेईच्या वू गुआन झुन व ली चिया हसिन यांच्याकडून ३७ मिनिटांच्या आणखी एका लढतीत २०-२२, १७-२१ असा पराभव पत्करावा लागला. ◀(वृत्तसंस्था)

## बेन स्टोक्स खांद्याच्या दुखापतीमुळे कसोटीतून बाहेर

### ऑली पोपकडे संघाचे नेतृत्व

◆ **लंडन, ३० जुलै**

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने ओव्हल येथे भारताविरुद्ध होणाऱ्या ॲण्डरसन-तेंडुलकर चषकाच्या मालिकेतील निर्णायक पाचव्या कसोटीतून स्वतःला बाहेर काढले आहे, खांद्याची दुखापत वाढण्यास खूप मोठा धोका' असल्याचे सांगत त्याने सामन्यातून माघार घेतली आहे.

चार सामन्यांच्या मालिकेत इंग्लंड संघाचा कर्णधार ३४ वर्षीय अष्टपैलू बेन स्टोक्सने शेवटच्या कसोटी सामन्याच्या पूर्वसंध्येला घोषणा केली व त्याच्या अनुपस्थितीत उपकर्णधार ऑली पोप संघाचे नेतृत्व करेल याची पुष्टी केली.

मालिका संपवू न शकल्याने निराश झालो. माझ्या स्नायूंना चांगलीच दुखापत झाली आहे, जे मी स्पष्टपणे सांगू शकत नाही, असे स्टोक्सने सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेत सांगितले. मी आज सकाळी फलंदाजीत योगदान देण्यासाठी मार्ग शोधण्याचा प्रयत्न करत येथे आलो. वैद्यकीय पथकाशी चर्चा केल्यानंतर निर्णय घेण्यात आला. धोका खूपच जास्त होता. माझ्या जागी दुसरा कोणीही असा धोका पत्करेल अशी अपेक्षा मी केली नव्हती, असे बेन स्टोक्स म्हणाला.

स्टोक्सने मालिकेत इंग्लंडच्या लढतीत मध्यवर्ती भूमिका बजावली आहे, लॉर्ड्स आणि ओल्ड ट्रॅफर्ड दोन्ही ठिकाणी सामनावीर पुरस्कार मिळवला आहे. चार कसोटी सामन्यांमध्ये त्याने ४३.४२ च्या सरासरीने ३०४ धावा केल्या व १७ बळी घेतले.

# बुमराह अखेरच्या कसोटी सामन्याला मुकणार

### आकाश दीपला संधी मिळण्याची शक्यता

◆ **लंडन, ३० जुलै**

भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह गुरुवारपासून ओव्हल येथे सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या मालिकेतील निर्णायक पाचव्या कसोटी सामन्याला मुकणार आहे. त्याच्या जागी आकाश दीप घेण्याची शक्यता आहे, असे एका वृत्तात म्हटले आहे.

जगातील प्रथम क्रमांकाचा वेगवान गोलंदाज ३१ वर्षीय जसप्रीत बुमराह ओल्ड ट्रॅफर्ड येथे झालेल्या चौथ्या कसोटी सामन्यात रंगहीन दिसला. या सामन्यात त्याला आपल्या वेगवान गोलंदाजीसाठी संघर्ष करावा लागला आणि तो यशस्वी होऊ शकला नाही.

त्याच्या पाठीच्या रक्षणासाठी व दीर्घकालीन काळजी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे, असे बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने बुमराहला सांगितले आहे. कंबरेच्या दुखापतीमुळे चौथ्या कसोटी सामन्याला मुकलेला आकाश दीप बुमराहची जागा घेण्याची शक्यता आहे.



गौतम गंभीर व आकाश दीप

तत्पूर्वी, संघ रचनेबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही आणि बुमराहसह सर्व गोलंदाज तंदुरुस्त आहेत, असे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी सांगितले होते.

शेवटच्या कसोटीसाठी संघाच्या संयोजनाबाबत आमची कोणतीही चर्चा झालेली नाही, असे गंभीरने मॅन्चेस्टरमधील चौथ्या कसोटीनंतर सांगितले होते. बुमराह खेळेल की नाही याबद्दल अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. शेवटी, जो कोणी खेळेल तो देशासाठी काम करण्याचा प्रयत्न करेल, असेही ते म्हणाले.

भारताच्या ३५८ धावांच्या प्रत्युत्तरात इंग्लंडने ६६९ धावांचा मोठा डोंगर उभा केला व चौथ्या कसोटीत पहिल्या डावात ३११ धावांची आघाडी घेतली. तथापि, भारताने २ बाद १४३ षटकांत ० पासून उल्लेखनीय पुनरागमन केले. कर्णधार शुभमन गिल, वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजाच्या शतकांसह दुसऱ्या डावात १४३ षटकांत फलंदाजी करत नाट्यमय बरोबरी साधली. पाच सामन्यांच्या मालिकेत १-२ ने पिछाडीवर असतानाही भारताने मालिकेत आपले आव्हान कायम राखले.

बुमराहने चौथ्या कसोटीच्या पहिल्या डावात ३३ षटके टाकली - त्याने एकाच डावात सर्वाधिक गोलंदाजी केली, परंतु १०३ धावांत २ बळी घेतले, पहिल्यांदाच त्याने कसोटी डावात १०० पेक्षा जास्त धावा दिल्या.

मालिकेत त्याने १४० किमी प्रतितास पेक्षा जास्त वेगाने टाकलेल्या चेंडूंची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली.- हेडिंग्ले येथे ४२.७ टक्क्यांवरून लॉर्ड्स येथे २२.३ टक्के व ओल्ड ट्रॅफर्ड येथे केवळ ०.५ टक्के आहे. कार्यक्षमतेत घट झाली असली तरी, बुमराह मोहम्मद सिराजसह मालिकेत भारताकडून सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज राहिला आहे, त्याने १४ बळी घेतले आहेत. ◀(वृत्तसंस्था)

# खुल्या गटात स्वप्निल हदगल विजेता

▸ जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा
▸ १४ वर्षे वयोगटात मयुरेश स्वामी अजिंक्य

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा क्रमांक तीनम मध्ये खुल्या गटात स्वप्निल हदगल याने तर १४ वर्षे गटात मयुरेश स्वामी यांनी अजिंक्यपद पटकावले.

सुशील रसिक कार्यालयात ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेचा पारितोषक वितरण समारंभ सुशीलकुमार शिंदे भावी प्रशालेचे अध्यक्ष संतोष पैकेकरी, मुख्याध्यापिका पुनम पैकेकरी, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस सचिव असोसिएशन शरद नाईक, सॉफ्टवेअर इंजिनियर संतोष बुंदाले, प्राथमिक शिक्षक ईश्वर जांभळे, इरांना जमादार, सागर गांधी, स्वप्निल हदगल, सचिन चव्हाण, सागर व्हटकर, हरिओम नाईक यांचे हस्ते संपन्न झाला. रमा जगदीश संस्थेचे अध्यक्ष मधुकर नाईक व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अर्जुन कदम, संचालक शिरीष नाईक, शैलेंद्र नाईक,राजू राजपूत, नीता तांबोळकर,सरिता नाईक यांनी बक्षीस विजेत्या खेळाडूंचे कौतुक केले.

**अंतिम गुणानुक्रमे : खुला गट** : स्वप्निल हदगल, प्रज्वल कोरे, सागर गांधी, चंद्रशेखर बसर्गीकर, मंदार आपटे, दत्तात्रय गोरे, देवदत्त पटवर्धन, तनिष्क शहा, श्रेयस कुदळे, पंकज जिंदाम, अमर शिंदे, श्रीनिवास दंडगळ, श्रीनिधी शाबादे, सुप्रिया भोसले, अभिषेक क्षीरसागर.

**१७ वर्षे** : रणवीर पवार, वरद लिमकर, सानवी गोरे, प्रसन्न जगदाळे, अथी चाबुकस्वार, स्वराली हातवळणे. **१९ वर्षे** : श्रेया संदूपटला, नरसिंह सिंग्राल, सागर पवार, प्रांजल वाघमारे, किसन नागटिळक, श्रीराम जाधव. **१४ वर्षे** : मयुरेश स्वामी, वेद आगरकर, जय तुम्मा, जय आणेराव, हर्ष हलमल्ली, रुद्र फुले, आरुष कंदले, आदर्श कांबळे, अथर्व बसर्गीकर, आयुष उपाध्ये, चंदनशिवे शौर्य, श्रेयस कंदीकटला, ओम निरंजन, अर्चित कोनापुरे, स्वप्नजीत शितोळे.

**१३ वर्षे** : साईराज घोडके, ओंकार नसले, अजिंक्य पाटील, विराज गायकवाड, वैभव स्वामी, वेदांत चव्हाण, संकेत काटकर, सुकन्या बिराजदार. **१२ वर्षे** : प्रसेंनजित जांभळे, वेदांत मुसळे, यशोदा बिराजदार, अदिती इनानी, विहान पत्की, अथर्व पटाले, ओम विजापुरे, अथर्व देवकर. **११ वर्षे** : समरजीत देशमुख, विवान दासरी, आयुष गायकवाड, शाल्मली नरोटे, प्रतीक्षा चाबुकस्वार, देवांश मर्दा, आरोही दलाल, श्लोक बुंदले.

**१० वर्षे** : सृष्टी मुसळे, विहान कोंगारी, श्रीरंग पैकेकरी, शशांक जमादार, श्रेयस इंगळे, प्रज्वल वाघमारे, श्लोक चौधरी, सृष्टी क्षीरसागर

**९ वर्षे** : नैतिक होटकर, हर्ष मुसळे, आदित्य जानगवळी, प्रथम मुदगी, हिमांशू व्हनगावडे, शिवराज जाधव, समृद्धी कसबे, विराज धोंगडे

**८ वर्षे** : राजवर्धन देशमुख, आर्यन गांधी, आरुष लामकाने, नियन कंदिकटला, नमन रंगरेज, प्रग्नेश काबरा, विराज मस्के, रिषभ पमनानी.

**उत्तेजनार्थ** : श्रेया पैकेकरी, संचिता सोनवणे, हर्षिता भोसले, गोवर्धनी मिठ्ठा, कसबे आदित्य, विराज दोशी, जांभळे श्रावणी, आनंदी घुटे, सम्यक सावंत, प्रतीक हलमल्ली, प्रज्ञेश महाडकर, संदेश गायकवाड, विराट वाघमारे, स्वराज हंचाटे, ऋषिकेश कंदी, समिधा चंदनशिवे, अश्वजीत भडकुंबे.



# सोलापूरच्या संध्याराणी बंडगरला तिहेरी तर राजीव देसाईना दुहेरी मुकुट

● वरिष्ठांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा
● मिश्र दुहेरीत बंडगर व देसाई, पुरुष दुहेरीत देसाई व पंकज शहा, डॉ. कारंडे विजयी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ३० जुलै -**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली आयोजित केलेल्या वरिष्ठांच्या चौथ्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेच्या मिश्र दुहेरीच्या अंतिम सामन्यात ४५ वर्षापुढील गटात सोलापूरच्या संध्याराणी बंडगर व राजीव देसाई या जोडीने तेलंगाणाच्या ज्ञानमोटे श्री व पतकी प्रसाद या जोडीचा ६-१ ,६-२ असा पराभव करून मिश्र दुहेरीचे अजिंक्यपद पटकावले . ६0 वर्षापुढील पुरुषांच्या दुहेरीच्या अंतिम सामन्यात सोलापूरच्या बिगर मानांकित राजीव देसाई व पंकज शहा या जोडीने नाशिक प्रथम मानांकीत शिरीष नादुर्दीकर व डॉ दीपनकर चक्रवर्ती या जोडीचा ६-२,६-४ पराभव करून अजिंक्यपद पटकावले.




इतर निकाल खालीलप्रमाणे : ५५ वर्षांवरील पुरुष एकेरीत अंतिम फेरीत सुधीर गोठेने जेफरी बेलेशरचा ६-0, ६-१ असा सहज पराभव करून विजेतेपद पटकावले. याच गटात दुहेरीत अंतिम सामन्यात अव्वल मानांकित राजन बेरी व चंद्र भूषण यांनी सुधीर गोठे व पवन जैन यांचा ६-४, ६-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. ७0 वर्षांवरील पुरुष एकेरीत उपांत्य फेरीत अव्वल मानांकित जॉर्ज थॉमस पुथुपारंबिल याने एकनाथ किणीकरचा ६-३, ७-५ असा तर, दुसऱ्या मानांकित तुलसी सिद्धाराजूने महेंद्र कक्कडचा ६-१, ६-१ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

**आज झालेले निकाल:**

**४0 वर्षांवरील पुरुष एकेरी: अंतिम फेरी:** रमजान शेख३(भारत)वि.वि.विशाल बद्री२(भारत)७-६(४), ६-१; ४५ वर्षांवरील पुरुष एकेरी: अंतिम फेरी: नरेंद्रसिंग चौधरी१ (भारत)वि.वि.अमित टिळकर२(भारत) ६-२, ७-६(४);

**५५ वर्षांवरील पुरुष एकेरी: अंतिम फेरी:** सुधीर गोठे(भारत) वि.वि.जेफरी बेलेशर (भारत)६-0, ६-१; ५५ वर्षांवरील पुरुष दुहेरी: अंतिम फेरी: राजन बेरी/चंद्र भूषण१ (भारत) वि.वि.सुधीर गोठे/पवन जैन(भारत)६-४, ६-२;

**६0 वर्षांवरील पुरुष एकेरी: उपांत्य फेरी:** भूषण चंद्र१(भारत) पुढे चाल वि. लक्पा शेरपा (भारत) दीपंकर चक्रवर्ती६ (भारत) वि.वि.पवन जैन ३ (भारत) ६-३, २-१.

**६५ वर्षांवरील पुरुष एकेरी: उपांत्य फेरी:** अजित भारद्वाज १(भारत) वि.वि. अजय लखोटिया (भारत) ६-0, ६-२; प्रमोद दिक्षित(भारत)वि.वि.रवीन चौधरी(भारत)६-४, ६-२.

**७0 वर्षांवरील पुरुष एकेरी : उपांत्य फेरी:** जॉर्ज थॉमस पुथुपारंबिल १ (भारत) वि.वि. एकनाथ किणीकर (भारत)६-३, ७-५; तुलसी सिद्धाराजू २ (भारत)वि.वि.महेंद्र कक्कड (भारत)६-१, ६-१; **पुरुष दुहेरी: उपांत्य फेरी:** जॉर्ज थॉमस पुथुपरंबिल/एसजेएस रंधावा१(भारत) वि.वि.रत्नाकरराव ॲनी/पार्वथेसम गिनागम (भारत) ३-६, ६-३, १0-४; ताहिर अली/तुलसी सिद्धाराजू (भारत) वि.वि. महेंद्र कक्कड/राजेंद्रसिंग राठोड (भारत) ६-२, ६-३;

**७५ वर्षांवरील पुरुष एकेरी : उपांत्य फेरी:** वेंकटचलम स्वामीनाथन १ (भारत)वि.वि. अनंता तातावर्ती (भारत) ६-१, ७-५; गोविंद कुमार२ (भारत) वि.वि.मुकेश बजाज (भारत) ६-१, ४-६, १0-५; **पुरुष दुहेरी : उपांत्य फेरी:** गोविंद कुमार/धवल पटेल१(भारत) वि.वि.पारस छाजेड/दर्शन लाल मारिया(भारत)६-१, ६-१; ८0 वर्षांवरील पुरुष एकेरी: राउंड रॉबिन फेरी: जनार्दन कांबळे(भारत)वि.वि.सीताराम निर्गुणे(भारत)६-३, ६-२;



## हिंगुलांबिका शाळेत बुद्धिबळ खेळाडूंना शैक्षणिक साहित्य वाटप

**सोलापूर, दि. ३0 जुलै-**

साखर पेठ येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने शाळेतील हुशार व होतकरू बुद्धिबळ खेळाडूंना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी ३0 खेळाडू विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात शालोपयोगी वस्तू- पॅड, वही, पेन, स्केचपेन, पेन्सिल, कंपासपेटी इत्यादी साहित्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमास माजी नगरसेवक पांडुरंग दिड्डी, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर अभिजित शिंदे, आर्थिक सल्लागार अमोल चितळे, अरविंद चिन्नी, रमा जगदीश बहुउद्देशीय संस्थेचे सर्वे सर्वा शरद नाईक, सम्मेंद्र हुल्ले व मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रसाद वाले. अश्विन संगवे यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/


महत्वाचे...



## शाळेतील मुले लावणार साडेतीन लाख रोपे

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

सोलापूर शहरात व जिल्ह्यात माध्यमाच्या प्राथमिक माध्यम पोस्ट उच्च माध्यम कनिष्ठ माध्यम व अध्यापक विद्यालयामध्ये दि.२ ऑगस्ट रोजी विशेष वृक्षारोपण अभियान राबविण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेच्या किमान स्थानिक प्रजातीची रोपे लावून अमृतवेल मोबाईल ॲपमध्ये अपलोड करावी लागणार आहे जिल्ह्यातील सर्व शाळा मिळून सुमारे साडेतीन लाख रोपे लावण्याचे लक्ष आहे वृक्षारोपण अभियान यासाठी अमृत वृक्ष मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहे २६ जुलै ते २ ऑगस्टपर्यंत सर्व शिक्षण संस्थांना वृक्षारोपण अभियान राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत सर्व शाळा सहभाग घेणार आहेत प्रत्येक शाळेने ७० स्थानिक प्रजातीचे रोपे लावणार कोणत्या प्रजातीची किती रोपे जागा व कोणती च संरक्षण व संवर्धनासाठी उपाय या सविस्तर माहिती ॲपवर लोड करावे लागणार आहे. जिओ टॅग असल्यामुळे रोपांची वाढ सॅटॅलाइट द्वारे पाण्यात येणार आहे. वृक्षारोपण अभियाना टाळाटाळ चालणार नाही. जिओ टॅग द्वारे शाळेने लावलेली रोपाची पडताळणी होणार आहे. असे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.



## मंगळवेढ्यात काँग्रेसकडून खसदारांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक

**मंगळवेढा, दि. ३० जुलै-**

खा.प्रणिती शिंदे यांनी लोकसभेमध्ये ऑपरेशन सिंदूरबाबत प्रश्न विचारत भाजप सरकारची कोंडी करत सरकारला चांगलेच धारेवर धरल्यानंतर मंगळवेढा येथील भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी खा.प्रणितींविरुद्ध घोषणा देत दामाजी चौकात आंदोलन केले. दरम्यान या आंदोलनाचा निषेध म्हणून काँग्रेसच्या शहर व तालुका पदाधिकाऱ्यांनी खा. प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक केला. यावेळी शहराध्यक्ष ॲड.राहुल घुले, जिल्ह्याचे कार्याध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार, मतदारसंघाचे अध्यक्ष मारुती वाकडे, तालुका अध्यक्ष प्रशांत साळे, मंगळवेढा तालुका युवकचे अध्यक्ष ॲड.रविकिरण कोळेकर, सिद्धेशर धसाडे, आयेशा शेख, पंडित पाटील, मुबारक शेख, गणेश धोत्रे, बापू अवघडे, सुनिता अवघडे, शहाजी कांबळे, ज्ञानेश्वर सोरडीकर, पांडुरंग माळी, नाथा ऐवळे, अमिना पटेल, जगन्नाथ बोराडे, महिबूब मुजावर, शशी कोळी, संगाप्पा घोडके, अप्पू भोरकडे, सूर्यकांत जाधव, बाळासाहेब जाधव, शहाजहान पटेल, संतोष क्षिरसागर, विठ्ठल यादव, सैफन शेख, सत्तार इनामदार आदी पदाधिकार्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.






# कारगिल युद्धात मिळवलेला विजय अभूतपूर्व

### मान्यवरांचे मनोगत; शहीद कुटुंबीयांसह करमाळ्यात मान्यवरांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.३० जुलै-**

भारतीय सैनिकांनी कारगिल युद्धात मिळवलेला विजय अभूतपूर्व असून भारतीयांच्या अस्मितेला जागवणारा क्षण असल्याचे सांगून आपल्या शूर सैनिकांप्रती मान्यवरांनी आदर व्यक्त केला.

माजी सैनिक कल्याणकारी संघटना व यशकल्याणी सेवाभावी संस्थेतर्फे या समारंभाचे आयोजन केले होते. गायक प्रवीण अवचर यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. प्रास्ताविक सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष अक्रुर शिंदे यांनी केले. यशकल्याणी सेवाभवन येथे प्रा. गणेश करे-पाटील यांच्या सहकार्याने समारंभ झाला. अध्यक्षस्थानी ॲड. डॉ. बाबुराव हिरडे होते. यावेळी जेष्ठ पत्रकार विवेक येवले, काशिनाथ ताडे, डॉ. अजय तोरड, डॉ निलेश मोटे सुभेदार मेजर विलास नाईकनवरे, प्रा.बाळकृष्ण लावंड यांची उपस्थिती होती. आयोजक सैनिक कल्याणकारी मंडळाचे सदस्यांसह मेजर किरण ढेरे, प्रा. राम काळे, पक्षीमित्र कल्याणराव साळुंके, पत्रकार गजेंद्र पोळ, सुभेदार बिभीषण कन्हेरे, प्रशांत नाईकनवरे यांनी योगदान दिले. स्व. लिलाताई दिवेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

सूत्रसंचालन डॉ. कोळेकर व मेजर किरण ढेरे यांनी केले. माजी सैनिक रविंद्र सव्वाशे यांनी आभार मानले.

**यांचा झाला सन्मान**

रणजित निंबाळकर (कृषी तंत्रज्ञान संशोधन ) , काकासाहेब काकडे ( वृक्ष लागवड व संवर्धन ), अरविंद कोकाटे ( कारगिल योद्धा ), आनंद पवार (कारगिल योद्धा ), सुमित घाडगे ( बेस्ट कॅडेट, एन.सी.सी.), विठ्ठल रोडगे (आदर्श इंग्रजी शिक्षक), आशाताई चांदणे (पत्रकार), सिध्दार्थ वाघमारे (पत्रकार), फुलचंद मिसाळ (कारगिल योद्धा), नवनाथ नाईकनवरे ( विशेष युवा पुरस्कार), बाळासाहेब बोलभट (सैनिक कुटुंबीय सं. समिती सदस्यपदी निवड)

**माजी सैनिक परिवारासाठी सामाजिक योगदानाचे अभिवचन**

**ॲड. बाबुराव हिरडे :** वैयक्तिक न्यायिक प्रकरणांत विनाम ोबदला कायदेविषयक सेवा.

**डॉ. निलेश मोटे :** माजी सैनिक कुटुंबातील वय वर्ष १४ ते ४४ पर्यंतच्या माता व भगिनींसाठी स्त्रियांच्या आरोग्य विषयक सम स्यांसाठी शुल्काशिवाय वैद्यकीय सेवा.

**डॉ. अजय तोरड :** माजी सैनिक परिवारासाठी विनाशुल्क ओपीडी खुली

**कारगिल योद्धा सन्मान**

सैनिक कुटुंबीय संरक्षण समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल करमाळा सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष अक्रुर शिंदे यांचा यशकल्याणी सेवाभावी संस्थेच्या वतीने जिल्हाध्यक्ष प्रा..बाळकृष्ण लावंड व पक्षीमित्र कल्याणराव साळुंके यांचे हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

# पांगरीत महाराजस्व शिबीर; ४७९ लाभार्थी सहभागी

### अडचणीबाबत थेट संपर्क साधण्याचे तहसीलदारांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० जुलै-**

ग्रामीण भागातील लोकांना दाखले, उतारे, शिधा पत्रिका, संजय गांधी, निराधार आदी योजनांबाबत अडचणी उदभवू देऊ नका, लोकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्या अशा सूचना देण्याबरोबरच ज्यांच्या अडचणी असतील त्यांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा त्यांच्या अडचणीची सोडवणूक जलद गतीने केली जाईल असे प्रतिपादन तहसीलदार एफ.आर. शेख यांनी केले.

तालुक्यातील पांगरी येथे हनुमान मंदिर सभागृहात आज आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानात तहसीलदार बोलत होते. यावेळी नायब तहसीलदार संजीवन मुंढे, रवींद्र सानप, मंडळ अधिकारी आर. सी. मुंढे, सरपंच मनीषा धस, उपसरपंच प्रमिला नारायणकर, ग्रामपंचायत अधिकारी दर्शन मंडलीक, माजी उपसरपंच रियाज बागवान, शहाजी धस, विलास लाडे, धनंजय खवले, तहसीलचे अव्वल लिपीक गणेश यावलकर, पंचायत समिती विस्तार अधकारी नितीन वाघमारे, सतीश जाधव, तलाठी रेऊ पुजारी, महिला बालविकासचे शैलेश सदाफुले, सोसायटी चेअरमन बापू खबाले, व्हा. चेअरमन बाबुराव गोडसे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या शिबिरात एकूण ४७९ त्यापैकी महसूल विभागाचे ४३५ लाभार्थी व इतर आरोग्य व बालविकास व कृषी विभागाचे ४५ लाभार्थी यांनी शिबिराचा लाभ घेतला. शिबिरात पुरवठा विभाग, सेतू विभाग, आरोग्य आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. एस.पी. मांटे, आकाश गुळवे, अंकुश मुंढे, विष्णू घावटे, पिंटू कावळे, रमेश शिंदे ,अरुण गायकवाड, विजय नरगुंडे, कयूम मुजावर आदींनी परिश्रम घेतले.



# मेहंदीतील कलात्मक योगदान प्रेरणादायी

### संचालिका पवित्रा खेडगी : ८८ विद्यार्थिनींचा सहभाग; १२ ट्रॉफी बक्षीस वितरित

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३० जुलै-**

विद्यार्थिनींचे कलात्मक योगदान खरोखरच प्रेरणादायी असून मेहंदीची कला, परंपरा, संस्कृती आणि सर्जनशीलतेचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका पवित्रा खेडगी यांनी केले.

येथील सी. बी. खेडगी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नागपंचमी निमित्त आयोजित मेहंदी स्पर्धेतील विजेत्यांना संचालिका खेडगी यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी उपप्राचार्या वैदेही वैद्य हे होते. या स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालय, खेडगी प्रशाला व खेडगी इंटरनॅशनल स्कुलच्या एकूण ८८ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. विविध गटात एकूण १२ ट्रॉफीज बक्षीस विजेत्यांना वितरित करण्यात आल्या व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्या वैद्य यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांसह विजेत्यांचे अभिनंदन केले. प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. समन्वयक प्रा. सरिता बाणेगाव, सदस्या प्रा.रत्नप्रभा उप्पीन, प्रा. पूजा करांडे, प्रा. ललिता लवटे, प्रा. दीपा वलेकर, प्रा.दिपिका दिवटे, प्रा.विजया कोन्हाळी, सेवक कर्मचारी रमेश पुजारी यांनी परिश्रम घेतले. स्पर्धेत विविध वयोगटातील आणि शहरी-ग्रामीण स्तरांतील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. स्पर्धकांनी पारंपरिक आणि आधुनिक अशा दोन्ही प्रकारच्या मेहंदीच्या डिझाईन्स सादर केल्या. स्पर्धेमुळे मेहंदी कलेला प्रोत्साहन मिळाले.


## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः तालुका बार्शी पैकी शहर बार्शी हद्दीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील घर जागा याचा **सि.स.नं. १२३/३/१ याचे क्षेत्रफळ २१.४ चौ.मी.** याचे चौ. फुट २३०.२६ आहे. तसेच याचे लगत **सि.स.नं.१२३/अ/२** याचे क्षेत्रफळ ५८.९ चौ.मी. याचे चौ. फुट ६३३.७६ आहे. यासी चतुःसिमा सि.स.नं. १२३/ब, दक्षिणेस-सामाईक बोळ व रस्ता, पश्चिमेस- सि.स.नं. १२६/अ ची व बोळाची जागा व उत्तरेस - सि.स.नं. ३४ ची जागा, याची वागणूक व पाणी **पश्चिम व दक्षिण बाजूचे** रस्त्याने जाते व आहे. तसेच यात दगड, माती, वीटाचे वर पत्रे असलेले कच्चे बांधकाम त्यामध्ये चार खोल्या, संडास बाथरुम, नळ व वीज कनेक्शनसह, २० चौ.मी. पत्र्याचे शेडसह आतील सर्व तदंगभुत वस्तुसह, व वहिवाटीच्या हक्कासह.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकती हया **विजय चांगदेव तिकटे** रा. माळे गल्ली, बार्शी, ता. बार्शी यांचे स्वसंपादीत खरेदी मालकीच्या व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या असून सिटी सर्व्हे उताऱ्याच्या हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकती हया त्यांचे कौटूंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव करून इसारा दाखल रक्कम घेतलेली आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकती हया निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरच्या मिळकती हया निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळकतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्क अधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून आठ (०८) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकती हया निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदी देणार यांचे बरोबर इसार पावतीतील अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. ३१/०७/२०२५.

**सही/-**
**ॲड. एस.एस. ठोंबरे**
**बी. कॉम एलएल.बी**
**सुयश नगर, फुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर मो.नं. ९३७११६२४२५**
**खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

निशान नंः ५
दि.कि. अर्ज नं.६६/२०२५

**मा. रेवती पी. बागडे सो,**

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ ज्युनिअर डी. सो. यांचे कोर्टात**

**अमोल देविदास ढोरे वगैरे**
रा. यावली (दु), ता- बार्शी, जि. सोलापूर -- **अर्जदार**
वि.
**कोणी नाही** -- **सा.वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी या मे. कोर्टात अर्जदार नं १ व २ यांचे वडील व अर्जदार नं ३ यांचे पती व अर्जदार नं ४ यांचा मुलगा देविदास निवृत्ती ढोरे रा- यावली (दु), ता- बार्शी, जि- सोलापूर हे १३/२/२०२५ रोजी मौजे-यावली (दु), ता- बार्शी येथे मयत झाले असून येथेच त्यांचा अंत्यविधी झाला असून त्यांचे मृत्युनंतर यातील अर्जदार यांना ते मयत देविदास निवृत्ती ढोरे यांचे वारसदार असलेबाबतची शासकीय कार्यालयातून वेळोवेळी मागणी होत असल्याने अर्जदार हे मयत देविदास निवृत्ती ढोरे यांचे वारस आहेत असा दाखला मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याने तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर अर्जदार हे मयत देविदास निवृत्ती ढोरे यांचे वारस असलेबाबतचा वारस दाखला अर्जदार यांचे नावे देणेबाबत कोणाची काही तक्रार अथवा हरकत असल्यास वा अन्य कोणी कायदेशीर वारस असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील तारीख २५/८/२०२५ रोजी या मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे अथवा हरकती असल्यास दाखल कराव्यात. सदर मुदतीत कोणाची हरकत न आलेस मे. कोर्ट अर्जदाराचे अर्जास अनुसरून त्यांचे मागणीप्रमाणे अर्जदारांना वारस दाखला देतील मग नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही.

हे जाहीर प्रसिद्धीकरण केले असे. तारीख- २७/०७/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** **दिवाणी न्यायालय, बार्शी**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहाय्यक अधिक्षक** **दिवाणी न्यायालय, बार्शी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे-सुर्डी, ता. बार्शी येथील व त्या परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे- सुर्डी, ता. बार्शी येथील जमीनी, ग.नं. ४६६/२/अ, क्षेत्र ०१ हे. ६९ आर, आकार ०१ रू. ८५ पैसे, गट नं. ४६६/२/ब, क्षेत्र ०१ हे. ६८ आर, आकार ०१ रू. ८४ पैसे, या जमीनी आमचे अशिलांच्या वडिलार्जित मालकीच्या व कब्जेवहीवाटीच्या आहेत. सदर जमीनीशी संतनाथ गुरूलिंग झाडे व त्याचे भाऊ अजिनाथ, दत्तात्रय, मनोहर, तसेच बहिणी पुष्पावती गाभणे, उर्मीला आगळे वगैरे लोकांचा कसलाही हक्क, हितसंबंध कब्जा नव्हता व नाही.

सदर संतनाथ गुरूलिग झाडे वगैरे लोकांची, गट नं. ४६६/१ ही जमीन असून, सदर जमीनीत उत्तर व पश्चिम भागात, सन १९८४ साली, सुर्डी पाझर तलाव झालेला आहे. सदर तलावासाठी या गटातील ०० हे ७० आर क्षेत्र संपादीत केलेले आहे. त्यामुळे सदर गटात, सदर लोकांना, फक्त ०२ हे ६७ आर एवढे क्षेत्र शिल्लक राहिलेले आहे. त्याबाबत फेरफार नोंद नं. ४१३९ ही नोंद प्रमाणीत झालेली आहे.

सदर संतनाथ झाडे वगैरे लोकांनी, सदर नोंदीबाबत, सुमारे ३५/३८ वर्षानंतर, आर.टी.एस. अपील १५४/२०२१ दाखल करून, सदरचे संपादीत क्षेत्र, आमचे अशिल व सदर लोकांचे क्षेत्रातून, प्रत्येकी ०० हे ३५ आर क्षेत्र, कमी करणेबाबत निकाल घेतला. त्या निकालाविरुध्द, आमचे अशिलांनी मे. अप्पर जिल्हाधिकारी साहेब सोलापूर, यांचे कोर्टात रितसर दुसरे अपील केले आहे. ते त्या मे. कोर्टात प्रलंबीत आहे.

सदर संतनाथ झाडे वगैरे लोकांना, सदर गटात ०३ हे ०२ आर क्षेत्र असलेबाबतची झालेली नोंद ही पोकळ, बेकायदेशीर व रद्दबातल स्वरुपाची आहे. प्रत्यक्षात त्यांना त्या गटात फक्त ०२ हे ६७ आर एवढेच क्षेत्र मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस होती व आहे. सदर पोकळ नोंदीचा गैरफायदा घेवून सदरचे लोक, सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचे व रक्कम हडप करण्याच्या प्रयत्नात आहेत.

तेंव्हा सदर संतनाथ झाडे वगैरे लोकांच्या, गट नं. ४६६/१ या जमीनीतील क्षेत्राबाबतच्या, पोकळ नोंदी आधारे, कोणीही त्यांचे बरोबर, सदर मिळकतीबाबत, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, बक्षिसपत्र, खरेदी, वहीवाटीचे हक्क, फेडपत्र, तसेच अन्य हस्तांतरणाचे स्वरूपाचे व्यवहार आणि कर्ज बोजाचे स्वरूपाचे व्यवहार करू नयेत, केलेस ते बेकायदेशीर व रद्दबातल होतील. तसेच आमचे आशिलाचे हक्क हिस्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तशा स्वरूपाचे व्यवहार करणाऱ्यावर आमचे आशिल कायदेशीर कारवाई करतील. मग खर्चाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी त्यांचेवरच राहील. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली. कळावे

ता. २९/०७/२०२५

**सही/-**
**ॲड. श्री. गुंड एस.एम. (लाडोळेकर)**
**ॲड. श्री. गुंड ए. एस. (लाडोळेकर)**
ॲडव्होकेटस्, बार्शी सदानंद ७३०/२/३७ सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
नागनाथ मल्लीकार्जुन झाडे, प्रमोद नागनाथ झाडे, उमाकांत नागनाथ झाडे सर्व रा. सुर्डी, ता. बार्शी तर्फे ॲडव्होकेट्स

नोंदणी क्र. SUR/NSR/RSR/R/455/99

**आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर.**

'आर्यनंदी भवन', मंदार कॉम्प्लेक्स, १५४, गोल्डफिंच पेठ, सोलापूर. फोन नं.(०२१७) २७२३७३६, मो. ७७७४०८७०००
E mail : aryanandipathsansth1234@gmail.com
website : www.aryanandipariwar.com

## २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

**(फक्त सभासदांकरीता)**

**मा. सभासद,**

आपणांस कळविण्यात येते की, सन २०२४-२५, सव्वीसावी **वार्षिक सर्वसाधारण सभा, बुधवार दिनांक १३/०८/२०२५ रोजी सायंकाळी ४.३० वाजता** आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दि. १०/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वृत्तांत वाचून कायम करणे.
२) ३१/३/२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक इत्यादीचे वाचन करणे व वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेऊन त्यास मंजूरी देणे.
३) संचालक मंडळाच्या शिफारसीनुसार सन २०२४-२५ च्या नफ्याची विभागणी करणे.
४) सन २०२५-२६ या सालाचे अंदाजपत्रक मंजूर करणे
५) सन २०२५-२६ सालासाठी वैधानिक लेखापरीक्षक व अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
६) वैयक्तिक कर्ज मर्यादा रक्कम रुपये दोन लाख पर्यंत वाढविणेबाबत विचार विनिमय करणे.
७) संस्थेचे कार्यक्षेत्र सोलापूर जिल्हा करण्याबाबत विचार विनिमय करणे.
८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणे.

**दिनांक : ३०/०७/२०२५**
**स्थळ : हॉटेल रितेश**
सावरकर मैदान, गोल्डफिंच पेठ, सोलापूर

**डॉ. राजेश फडकुले**
**अध्यक्ष**

**विशेष सुचना :**

१) ज्या सभासदांना कामकाजाबाबत प्रश्न विचारावयाचे असतील ते त्यांनी दि. ०८/०८/२०२५ पूर्वी संस्थेच्या मुख्य कार्यालयात लेखी आणून द्यावेत. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे बंधनकारक असणार नाही.
२) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेतली जाईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता भासणार नाही.
३) संस्थेचा वार्षिक अहवाल, हिशोब पत्रक संस्थेमध्ये कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध आहेत.
४) ज्या सभासदांचे पत्ते बदललेले असतील त्यांनी आपले अर्ज मुख्य कार्यालयाकडे द्यावेत व आपले पत्ते बदलण्यासाठी संस्थेस सहकार्य करावे. तसेच ज्यांनी घधउ भरुन दिले नाहीत, त्यांनी तातडीने त्याची पूर्तता करुन द्यावी.
५) ज्या सभासदांचे शेअर्स रक्कम रुपये ५ हजार व त्या प्रमाणात नाहीत, त्यांनी सदरची पुर्तता दि. ०८/०८/२०२५ पूर्वी करावी.
६) १० वी, १२ वी परिक्षेत ८०% व त्यावरील गुण आणि डिप्लोमा पदवीधर, पदव्युत्तर परिक्षेत ६०% व त्यावरील गुण मिळविलेल्या सभासद पाल्यांचा यावेळी सत्कार करण्यात येईल. तरी कृपया दि. ०८/०८/२०२५ पर्यंत आपल्या पाल्याची नावे व गुणपत्रिका संस्थेत सादर करावीत. (ज्या पाल्यांचे आई अथवा वडील संस्थेचे सभासद असतील अशा पाल्यांचाच सत्कारात समावेश केला जाईल याची नोंद घ्यावी.)

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन - अभिलेख कक्ष**
दुरध्वनी नं.-०२१८१-२२०२३३ Email- tahakkalkotgmail.com

जा.क्र.२०२५/अभिलेख/कावि/ ३२/२०२५ दि.२८/७/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. अल्ताफ जीना शेख**
रा. बादोले बु. ता. अक्कलकोट -- **अर्जदार**
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, बादोले बु. ता. अक्कलकोट -- **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अल्ताफ जीना शेख रा. बादोले बु. ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांची मुलगी महेक अल्ताफ शेख हिचा जन्म दि. १९/१२/२०१२ रोजी मौजे बादोले बु. ता. अक्कलकोट येथे झाला आहे. परंतू माझ्या मुलीच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद महेक अल्ताफ शेख या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म -मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २३/१२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. २८/७/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार अक्कलकोट**

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन - अभिलेख कक्ष**
दुरध्वनी नं.-०२१८१-२२०२३३ Email- tahakkalkotgmail.com

जा.क्र.२०२५/अभिलेख/कावि/ ३३/२०२५ दि.२८/७/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. अल्ताफ जीना शेख**
रा. बादोले बु. ता. अक्कलकोट -- **अर्जदार**
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, बादोले बु. ता. अक्कलकोट -- **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अल्ताफ जीना शेख रा. बादोले बु. ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांची मुलगा मुजमील अल्ताफ शेख याचा जन्म दि.०३/०३/२०१६ रोजी मौजे बादोले बु ता. अक्कलकोट येथे झाला आहे, परंतू माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही, त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद मुजमील अल्ताफ शेख या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म -मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.२३/१२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे, मुदतीत कोणचाही काही हरकर अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि.२८/०७/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार अक्कलकोट**

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन - अभिलेख कक्ष**
दुरध्वनी नं.-०२१८१-२२०२३३ Email- tahakkalkotgmail.com

जा.क्र.२०२५/अभिलेख/कावि/ ३३/२०२५ दि.२८/७/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्रीम. राजानी अहमद बिराजदार**
रा. कोर्सेगांव ता. अक्कलकोट -- **अर्जदार**
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, कोर्सेगांव ता अक्कलकोट -- **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील राजाबी अहमद बिराजदार ता. अक्कलकोट जि. सोलापूर यानी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.०१/०१/१९७६ रोजी मौजे कोर्से गांव ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्याच्या जन्माची नोंद करुन राजाबी अहमद बिराजदार या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोटच्या न्यायालयात दि. २३/०४/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे, मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १०/०७/२०२४ रोजी आमचे सहीने च कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का
**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार अक्कलकोट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...

### सुशीलकुमार शिंदेंसह खा. प्रणिती शिंदे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीवर

**सोलापूर, दि. ३० जुलै-**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी प्रदेश कार्यकारणीची घोषणा करण्यात आली आहे. या प्रदेश कार्यकारणी समितीमध्ये माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार निवड झाली. उपाध्यक्षपदी माजी आमदार राम हरी रुपनवर यांची निवड झाली. जनरल सेक्रेटरीपदी माजी महापौर अलका राठोड, माजी नगरसेवक विनोद भोसले यांची निवड करण्यात आली आहे. सेक्रेटरीपदी शाहीन शेख, राहुल वर्धा, श्रीशैल रणधिरे, रविकिरण कोळेकर, सुरेश हावळे यांची तर सोलापूर जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी सातलिंग शटगार यांची निवड करण्यात आली.



### राज्य मजूर सहकारी संघाच्या संचालकपदी मुन्ना साठे बिनविरोध

**माढा, दि.३० जुलै-**

महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संघाच्या संचालकपदी शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख मनोज साठेची बिनविरोध निवड झाली. मजूर सहकारी संघाची बैठक मुंबईत संघाचे अध्यक्ष संजीव कुसाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत एकमताने मनोज उर्फ मुन्ना साठेची निमंत्रित संचालक म्हणुन निवड घोषित करण्यात आली. संघाच्या अध्यक्षासह पदाधिकारी यांच्या उपस्थितीत साठेना नियुक्ती पत्र देण्यात आले. संघाचे कार्य ध्यानी घेऊन त्याप्रमाणे कार्यभार चालविला जाणार असल्याचा विश्वास मनोज साठेनी निवडीनंतर व्यक्त केला. शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत यांनी शिवसैनिकांसमवेत साठेंचा सत्कार करुन वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी मानसिंग साठे, ऋतुराज सावंत, संजय टोणपे, अरविंद पवार, अशोक खाडे, युसूफ दाळवाले, डॉ.शशिकांत त्रिंबके, समाधान दास, संजय अस्वरे, संजय साठे, धर्मराज मुकणे, विक्रम शिंदे, उदय कदम, सम्मेद सावळे, शंकर मुळूक, महेश मोहळे, बालाजी बारबोले, सचिन कदम, अशोक सुळे, योगेश जाधव, अनिल क्षिरसागर, संजय ढेरे, शाहु कोकाटे, सिमा मोरे, लतिफ मुलाणी, दिपक शिंदे, शिवराज पवार, अभयसिंह मोरे, बालाजी जाधव उपस्थित होते.

### पाळण्याचा रॉड तुटल्याने २० जण अडकले; रेस्क्यू ऑपरेशनमुळे वाचले

**बार्शी, दि.३० जुलै-**

येथील भगवंत मैदानात आषाढी एकादशीनंतर सुरु असलेल्या वार्षिक यात्रेदरम्यान मंगळवारी दुपारी एका पाळण्याचे रॉड तुटल्याने पाळणा हवेतच अडकला. या घटनेत २० हून अधिक नागरिक अडकले होते. बार्शी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली, अग्निशमन दल आणि क्रेन ऑपरेटरच्या तत्पर रेस्क्यू ऑपरेशनमुळे सर्व प्रवाशांना सुखरुप खाली उतरवण्यात यश आले. या घटनेमुळे भगवंत मैदानावर काही काळ भीती पसरली, परंतु प्रशासनाच्या त्वरित कारवाईने मोठी दुर्घटना टळली. मंगळवारी संध्याकाळी श्री भगवंत मैदानातील यात्रेत करमणुकीच्या साधनांपैकी एका मोठ्या पाळण्याचे रॉड तुटले, ज्यामुळे पाळणा हवेत थांबला. त्यात बसलेले २० हून अधिक महिला व पुरुष अडकले होते. पाळण्यात बसलेल्या लोकांच्या मदतीसाठी आरडाओरड केली, तर काहींनी मोबाइलवरुन नातेवाइकांना संपर्क साधला. स्थानिकांनी तातडीने पोलीस आणि अग्निशमन दलाला कळवले. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अग्निशमन दल आणि क्रेन ऑपरेटरशी समन्वय साधत रेस्क्यू ऑपरेशन सुरु केले. अग्निशमन दलाने पाळण्यात बसलेल्या नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले आणि क्रेनच्या सहाय्याने पाळण्याची ट्रॉली हळूहळू खाली उतरवली. सुमारे एक तास चाललेल्या या ऑपरेशनमुळे सर्व पाळण्यात बसलेले नागरिक सुखरुप खाली आले. कोणालाही दुखापत झाली नाही. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी सांगितले, प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य होते. आमच्या पथकाने आणि अग्निशमन दलाने तत्परतेने काम केले. अग्निशमन दलाचे प्रमुखांनी सांगितले की, क्रेनच्या सहाय्याने ऑपरेशन यशस्वी झाले. बार्शी नगरपरिषदेने सर्व करमणुकीच्या साधनांची तपासणी करण्याचे आदेश देण्यात यावेत, पाळण्याच्या ऑपरेटरवर सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याचा संशय आहे. याबाबत चौकशी सुरु करावी. नागरिकांनी प्रशासनाच्या तत्परतेचे कौतुक केले, परंतु यात्रेतील पाळण्यांच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित केले. एका नागरिकाने सांगितले, यात्रा आनंदाची आहे, पण अशा घटना टाळण्यासाठी कडक नियम हवेत.



### एक राखी सैनिक बांधवांसाठी; सह्याद्री फाउंडेशनचा उपक्रम

**सोलापूर, दि. २६ जुलै:**

कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधून सह्याद्री फाउंडेशनतर्फे एक राखी सैनिक बांधवांसाठी हा प्रेरणादायी उपक्रम आजपासून सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींनी आपल्या प्रेमाच्या, अभिमानाच्या आणि कृतज्ञतेच्या भावना व्यक्त करत हातांनी बनवलेल्या राख्या थेट सीमेवर लढणाऱ्या आपल्या वीर जवानांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत. सह्याद्री फाउंडेशनचे अध्यक्ष मा. नेताजी भाऊ खंडागळे यांनी या उपक्रमाची घोषणा करत सर्व शाळांतील विद्यार्थिनींना राखी पाठवण्यास आवाहन केले. राखी पाठविण्याची अंतिम तारीखः १ ऑगस्ट २०२५, शुक्रवार विद्यार्थिनी, पालक व शिक्षक यांना विनंती करण्यात येते की स्थानिक सह्याद्री फाउंडेशन प्रतिनिधींशी संपर्क साधावा.


## राजकारणात राहून आबासाहेब पारमार्थिक जीवन जगले : हभप ज्ञानेश्वर माऊली पठारे

**स्व.आ.गणपतराव देशमुख यांना पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३० जुलै-**

आबासाहेब यांचा ज्यांनी ज्यांनी हात धरला त्यांचे कल्याण झाले असून राजकारणात राहून आबासाहेब परमार्थाचे जीवन जगले आहेत. निष्कलंक जीवन, चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व म्हणजे आबासाहेब. आबासाहेब निष्कलंक जीवन जगले त्यामुळे आबासाहेबांचे नाव आजही संपूर्ण राज्यभरात मोठ्या स्वाभीमानाने व आदराने घेतले जात असल्याचे उद्गार कर्जत जामखेड येथील किर्तनकार हभप. ज्ञानेश्वर माऊली महाराज पठारे यांनी व्यक्त केले.

ते स्व.आ. गणपतराव देशमुख यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त सांगोला सुतगिरणी येथील समाधीस्थळावर भजन, कीर्तन व पुष्पवृष्टी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बोलत होते. याप्रसंगी आबासाहेबांच्या पत्नी रतनबाई देशमुख, कन्या शोभा पाटील, चंद्रकांतदादा देशमुख, नातू आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉ.अनिकेत देशमुख, सून सरोजनी देशमुख, सुरेखा देशमुख तसेच डॉ.निकीता देशमुख, डॉ.आस्था देशमुख, सुप्रिया देशमुख उपस्थित होते. पुढे बोलताना पठारे महाराज म्हणाले, सर्वांना आदर्श असणारे व्यक्तीमत्व म्हणजे आबासाहेब. आबासाहेबांनी सर्वांना सोबत घेऊन तालुक्यात क्रांती घडविली. आबासाहेबांमुळे तालुक्यात आजही शांतता अबाधित आहे. आबासाहेब यांनी तालुक्यालाच आपले कुटुंब समजले होते. त्यामुळे आजही संपूर्ण तालुका आबासाहेबांना आपले आदर्श मानत असल्याचे त्यांनी सांगत आबासाहेबांनी दिलेले विचार पुढे घेऊन जावेत असे सांगितले.



याप्रसंगी मंत्री जयकुमार गोरे, आ.रणजितसिंह मोहिते–पाटील, माजी आ.प्रशांत परिचारक, रामहरी रुपनवर, अजिंक्यराणा पाटील, जीवन जानकर, ब्रह्मानंद पडळकर, प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, राणीताई माने, चेतनसिंह केदार–सावंत, श्रीकांतदादा देशमुख, सागर पाटील, यशराजे साळुंखे पाटील, भरत शेळके, चेतन नरोटे, प्रांताधिकारी भैरवनाथ माळी, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, तहसीलदार संतोष कणसे, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, डॉ.प्रभाकर माळी, माजी नगराध्यक्ष मारुतीआबा बनकर, उद्योगपती बाळासाहेब एरंडे, विठ्ठलराव शिंदे, दादाशेठ बाबर, इंजि.रमेश जाधव, अरुण पाटील, समाधान पाटील, बाळासाहेब काटकर, अमोल खरात, मायाप्पा यमगर, प्रमोद साळुंखे–पाटील, माऊली हळणवर, सोमनाथ आवताडे, नागेश फाटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी यावेळी स्व.गणपतराव देशमुख यांना अभिवादन केले.

## महिला बालकल्याणचे कामकाज ऑनलाईन

- गिरणी, मिरची कांडपासाठी ऑनलाइन अर्ज
- लाभार्थ्यांना मिळणार लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचे कामकाज आता ऑनलाइन होणार आहे. त्यामुळे पिठाची गिरणी, मिरची कांडप मिशनसह इतर सर्व योजनेसाठी आता ऑनलाइन अर्ज करावा लागणार आहे. ऑनलाइन अर्ज केल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे.



महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने जिल्ह्यात अनेक योजना ऑफलाईन पद्धतीने राबविण्यात येत होत्या. मात्र, त्याचे काम काज आता ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना आता विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करावा लागणार आहे. महिला बालकल्याण विभागातील विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी ऑफलाईन अर्ज घेऊन अर्ज करत होते. मात्र, आता ऑगष्ट महिन्यांपासून गिरणी, मिरची कांडप, सायकल वाटपासह इतर सर्व योजनांचा लाभ ऑनलाइन अर्ज करून घ्यावा लागणार आहे.

**कागदपत्रांसाठी क्युआर कोड**

क्युआर कोडच्या माध्यमातून अर्जदारांनी अर्जाची कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक करण्यात येणार आहे. त्या कागदपत्रांची पडताळणी गटविकास अधिकारी यांच्यामार्फत होणार आहे. पंचायत समितीने मंजुरी दिल्यानंतर अंतिम मंजुरीसाठी महिला व बालकल्याण विभागाकडे अर्ज येणार आहे. त्यानंतर अर्जदारांना योजनांचा लाभ मिळणार आहे.

**घरी बसून भरता येणार अर्ज**

ऑनलाइन योजना राबविताना क्यूआरची कोडची प्रसिद्धी करण्यात येणार आहे. शिवाय अंगणवाडी कर्मचारीमार्फत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यामुळे ऑफलाईनला देण्यात येणारे कागदपत्रे घरी बसून ऑनलाइन पद्धतीने भरता येणार आहे. त्यामुळे घरी बसून विविध योजनेसाठी अर्ज करता येणार आहे.

लाभार्थ्यांनी साहित्य खरेदी केल्यानंतर जिओ टॅगिंगद्वारे पंचनामा करण्यात येणार आहे. त्यामुळे बोगस खरेदीला आळा बसणार आहे. यासाठी विभागाकडून क्युआर कोडची सर्वत्र प्रसिद्धी केली जाणार आहे. बोगसगिरीला आळा बसल्याने गरजू लाभार्थ्यांपर्यंत विविध योजनेचा लाभ पोहोचण्यास मदत होणार आहे.

**–प्रसाद मिरकले,** जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालकल्याण



राष्ट्रपती पदक



दीपक चव्हाण



बाळासाहेब जाधव

## पोलीस उपअधीक्षक चव्हाण व सपोनि जाधव यांना राष्ट्रपती पदक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० जुलै -**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील पोलिस उपअधिक्षक पोलीस उपअधीक्षक दीपक चव्हाण व सहायक पोलिस निरीक्षक बाळासाहेब जाधव यांना मुंबई येथे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रपती पदक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

भारत देशातील सुरक्षा दलाामध्ये काम करणारे अधिकारी व अंमलदार यांना त्यांच्या सेवा कालावधीत केलेल्या व उल्लेखनिय कार्याबद्दल भारत देशाचे राष्ट्रपती यांचेकडून वेगवेगळे पदक देवून सन्मानीत ग्यात येते. जाहीर झालेल्या राष्ट्रपती पदकांचा प्रदान सोहळा २९ जुलै रोजी राजभवन मुंबई येथे पार पडला. पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर राष्ट्रपती पदक प्राप्त अधिकारी दीपक चव्हाण, बाळासाहेब जाधव यांचे अभिनंदन केले.

## प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांचा पदभार काढण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षण विभागाची पटसंख्या गतवर्षीच्या तुलनेत १४ टक्क्यानी घटली असून याला गटशिक्षणाधिकारी हेच जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांच्याकडील प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांचा पदभार काढण्याचे निवेदन मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी यांनी दिले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेमध्येही अक्कलकोट तालुक्यातील झेडपी शाळेच्या मुलांची घसरण झाली आहे. सन २०२३-२४ मध्ये अक्कलकोट तालुक्याच्या पहिली ते आठवीची पटसंख्या २१ हजार ३३ इतकी होती. यावर्षी पटसंख्या २० हजार १३९ इतकी झाली आहे. त्यामुळे एक हजार विद्यार्थ्यांची संख्या घटली आहे.

म्हणजेच १४ टक्के पटसंख्या झेडपी शाळेतील घट झाली आहे. त्यामुळे अक्कलकोट तालुक्यातील झेडपी शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या असो की, गुणवत्ता याला जबाबदार गटशिक्षणाधिकारी हेच आहेत. तरी प्रभारी गटशिक्षणाधिकरी यांच्याकडील पदभार काढण्याची मागणी कट्टीमनी यांनी निवेदनाव्दारे केली आहे.

## दादा गणपती मंडळाच्या अध्यक्षपदी अरुण लातुरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**



बलिदान चौक तरुण मंडळ दादा गणपतीच्या अध्यक्षपदी अरुण लातुरे यांची निवड झाली. मंडळाच्या सर्वसाधारण सभेत ही निवज करण्यात आली. अन्य पदाधिकारी असे उपाध्यक्षः राज नरवडे, खजिनदारः रोहन लातूरे, रवींद्र होनराव. मिरवणूक प्रमुखः रतन नरवडे, धनराज चडचणकर, आशुतोष पूर्वंत. सल्लागार समितीः अशोक चडचणकर, गिरीश अक्कलकोटे, संजय लातूरे, नागनाथ कलशेट्टी, मुन्ना ओझा, मनोज मलकुनाईक, संतोष काटगावकर.

## मनुष्याने अंतिम श्वासापर्यंत सत्कर्म करण्याची गरज : उत्तमजी महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० जुलै-**

आपल्या सत्कर्माने गरजू व्यक्तीचा पर्यायाने समाजाचा उद्धार होतो. त्यामुळे मनुष्याने अंतिम श्वासापर्यंत सत्कर्म करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उत्तमजी महाराज यांनी केले. मारवाडी युवा मंच मिडटाउन महिला शाखा आणि राजश्री लड्डा परिवारातर्फे श्रावण मासानिमित्त तुळजापूर वेस येथील माहेश्वरी सांस्कृतिक भवनात आयोजित संगीतमय भव्य महाशिवपुराण कथेमध्ये उत्तमजी महाराज यांनी मार्गदर्शन केले.



यावेळी उत्तमजी महाराज यांनी महाशिवपुराण कथेतील शंखचूड या प्रकरणावर विवेचन केले. उत्तम जी महाराज यांनी प्रारंभी शंखचूड राक्षस आणि तुलसी यांच्या विवाहाची कथा सांगितली. तसेच नंदी - महादेव संवाद, भैरव जन्म कथा, भक्त प्रल्हाद, नरसिंह अवतार कथा, एकादश रुद्र अवतार, हनुमान अवतार आदी कथांवर विवेचन केले. याप्रसंगी अध्यक्षा राणी होलाणी, कार्यक्रम प्रमुख ज्योती चंडक, सुनिता बजाज, नंदा लाहोटी, शोभा मालू, विजया भैय्या, राजश्री लड्डा, रामेश्वर करवा, गोविंद लाहोटी, गोविंद चंडक, श्रीकांत बजाज, विलास बजाज, श्रीकांत लड्डा, लक्ष्मीकांत लड्डा, मयुरी लड्डा आदी उपस्थित होते.

**संगीतमय महाशिवपुराण कथेचा आज समारोप**

संगीतमय महाशिवपुराण कथेचा आज (गुरुवारी) समारोप होणार आहे. सकाळी १० वाजता होमहवन आणि कथा होणार. भाविकांनी याप्रसंगी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## दानशूरांमुळे संस्थांना मिळते बळ : ॲड. फडके

- हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय सुवर्ण महोत्सव सांगता समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० जुलै-**

विद्यादानासाठी समाजातून पुढे आलेल्या दानशूरामुळे शिक्षण संस्थांना उभारी घेण्यासाठी बळ मिळते. १९१८ मध्ये दिलेल्या २५ हजारांच्या देणगीमुळे संस्थेने अनेकांना स्वत:शी जोडत आपली प्रगती केल्याचे प्रतिपादन ॲड. सदानंद फडके यांनी केले.

सोलापूर येथील हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाचा सांगता समारंभ पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळी पुणेचे अध्यक्ष ॲड. सदानंद फडके तर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण प्रसारक हरिभाई मंडळाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. सोहनलालजी जैन उपस्थित होते.



कार्यक्रमासाठी हरीशेठ म्हणजे हिराचंद गांधी यांचे उपस्थित असलेले नातू सुनील गांधी यांचा सत्कार फडके यांनी केला व गांधी परिवाराबद्दल ऋण व्यक्त केले. त्याग करणारा खूप मोठा असतो हेच हरीभाई देवकरण फॅमिली यांनी दाखवून दिले शिक्षणाच्या प्रसारासाठी गांधींनी दिलेल्या देणगीचे आभार सोहनलाल जैन यांनी मांडले. मा. दामोदर भंडारी व पराग ठाकूर, सदस्य नियमक मंडळ पुणे यांनी सुवर्ण महोत्सवानिमित्त शिक्षकांनी ज्या विविध स्पर्धा घेतल्या विविध उपक्रम राबवले व सुवर्ण महोत्सव साजरा केला त्याबद्दल शिक्षकांचे कौतुक केले व पुढे असेच हीरक महोत्सव अमृत महोत्सव, शताब्दी महोत्सव साजरा करूया व ते करत असताना शिक्षण प्रसारक मंडळी आपल्या पाठीशी असेल असे आश्वासन दिले आपले विचार व्यक्त करताना शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी प्रथम आलेल्या सर्व पाहुण्यांचे शाळा समिती प्रमुख या नात्याने स्वागत केले व मी या शाळेचा शाळा समिती अध्यक्ष होण्याचे भाग्य मला लाभले याबद्दल मी संस्थेचा ऋणी आहे तसेच संस्था कायम पाठीशी राहिल्याने वर्षभर विविध उपक्रम साजरे करत असताना आनंदोत्सव करण्याचे समाधान आम्हा सर्वांना लाभले असे मत व्यक्त केले. अन्नदानाबरोबर विद्यादान देखील तितकेच महत्त्वाचे आहे असे मत कॉलेजच्या प्राचार्या फाटक यांनी व्यक्त केले. तसेच काही माजी शिक्षक ढाकणे व उपाध्ये यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशालेचे जेष्ठ पर्यवेक्षक हनमंत मोतीबने यांनी प्रास्ताविक केले तर परिचय डॉ. दिलीप फुटाणे यांनी केला स्मरणिकेच्या प्रकाशनाचे निवेदन प्राध्यापक धन्यकुमार बिराजदार यांनी केले तर आभार कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे यांनी मांडले. कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक कुंभार, पर्यवेक्षक राऊत उपस्थित होते. सूत्रसंचालन प्राध्यापक वैभव दुध्याल यांनी केले. प्रा.सावनी कुलकर्णी यांनी पसायदनाने कार्यक्रमाची सांगता केली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)